
साप्ताहिक

१४ जून ८६ / दोन रुपये

# माणूस




या आणि अशा अनेक रसरशित, विचारप्रवर्तक
विशेषांकांच्या मालिकेतील 'आणखी'

# दोन विशेषांक?

# माणूस

## नवजागर विशेषांक

**प्रसिद्धी : २ ऑगस्ट ८६**

**१६ ऑगस्ट ८६**

**या विशेषांकात...**

आठ कोटी लोकांना, मजुरांना, तंत्रज्ञांना वीस वर्षे अव्याहत काम पुरवणारा, शहरातील गर्दी कमी करू शकणारा, महाराष्ट्र-मध्य प्रदेश-गुजराथ-आंध्र-तामिळनाडू या राज्यातील दुष्काळ कायमचा हटवणारा, उत्तर-दक्षिण भारत जोडणारा भव्य प्रकल्प–
नव्या भगिरथांना खुणावणारे नवे भारत-स्वप्न ?

**गंगा – कावेरी – संगम**

या प्रकल्पाची ओळख...

प्रिय श्री. माजगावकर
सप्रेम नमस्कार
' माणूस ' चा ताजा अंक ( ७ जून, १९८६ ) आजच हाती आला आणि बराचसा वाचला. डॉ. गं ना जोगळेकर यांचा महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नुकत्याच पार पडलेल्या विभागीय साहित्य संमेलनाचा उत्तम परामर्श घेणारा लेख प्रथमच वाचण्यात आला. हा लेख संदर्भ साहित्य म्हणून जपून ठेवण्यासारखा आहे.
' माणूस ' चा प्रत्येक अंक मी उत्सुकतेने आणि आवडीने वाचतो. जी काही अगदी थोडी दर्जेदार साप्ताहिके मराठीत आहेत, त्यामध्ये ' माणूस ' समाविष्ट आहेच. सांस्कृतिक जाणिवा प्रगल्भ करण्याचे आणि अभिरुचीला वळण लावण्याचे काम ' माणूस ' नेहमीच करीत आलेला आहे. आणि त्यामुळे त्यामधील छापील अक्षरांबद्दल विश्वासार्हता प्रत्येकाला वाटणे साहजिक आहे. ही विश्वासार्हता कमी होऊ नये म्हणून मी मुद्दाम आशा कर्दळे यांच्या ' शब्दांचं अंगण ' या सदरातील लेखामधल्या काही चुका आपल्या निदर्शनास आणीत आहे.
' तराळ अंतराळ ' हे शंकरराव खरात यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशक श्रीविद्या प्रकाशन नसून कॉन्टिनेन्टल प्रकाशन आहे. तसेच ' आठवणींचे पक्षी ' हे पुस्तक बाबूराव बागूल यांचे नसून प्र. ई. सोनकांबळे यांचे आहे. याची कृपया नोंद घ्यावी. त्यांच्या लेखातील दृष्टिकोनाविषयी मला काहीच म्हणावयाचे नाही. फक्त संदर्भाच्या चुका असू नयेत म्हणून हे पत्र.

स्नेहांकित
**वि. शं. पारगावकर**

**[ चूक व्हायला नको होती. क्षमस्व– सं. ]**

स. न.
माणूसमध्ये आपण ' मार्ग ' या संस्थेचे ' आव्हान आणि आवाहन ' प्रसिद्ध केलेत. (माणूस दि. ३ मे ८६. मध्यप्रदेशातील नर्मदेकाठच्या काही आदिवासी गावांचे सर्वेक्षण करण्याबद्दलचे.) या आवाहनाला छानच प्रतिसाद मिळाला. चार जणांची तुकडी २० मेला (मध्यप्रदेशात) नर्मदेकाठी पोचली. पुढच्या प्रकल्पासाठी नव्या कल्पनाही मिळाल्या. एकंदरीत महाराष्ट्रात धडाडीने पुढे येऊ इच्छिणारे तरुण आहेत हे कळून खूप बरे वाटले.
२५ मे ८६

**वसुधा धागमवार**
C/o मार्ग
सफदरजंग एन्क्लेव्ह, नवी दिल्ली


साप्ताहिक

# माणूस

**वर्ष : सव्विसावे**
**अंक : दुसरा**
**१४ जून १९८६**
**किमत : दोन रुपये**
वार्षिक वर्गणी
**साठ रुपये**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
**मेधा राजहंस**

मुखपृष्ठ :
**श्याम देशपांडे**


**पत्ता :**
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०
दूरध्वनी : ४४३४५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.



# मुंबापुरी

### □ कॉंग्रेस– तेरी गंगा मैली

ह्या त्रिपाठींना काही म्हणजे अगदी काहीच कळत नाही. परवाच्या आमच्या अनावृत्त पत्राला जवाब दिला नाही ते एक सोडा; पण राजीव गांधींना लिहिलेला खलिता जाहीर करण्याची गरज काय होती ? या वयात नसते ताप कशाला लावून घ्यायचे ?

बरं, नुस्तं पत्र लिहून कमलापतीजी थांबले असते तरी ठीक होतं; पण परवा आम्हाला एक वेगळीच बातमी कळली. ती ही की, तारीख अठरा जून रोजी पंडित कमलापती त्रिपाठी आपल्या निवडक अनुयायांसह त्रिवेणीवर सचैल स्नान करून लगेच दुसऱ्या दिवशी—जून एकोणिसला राजीव गांधीवर जाहीर हमला पुकारणार.

आता अठरा जूनला निर्जला एकादशी आहे. दुसऱ्या दिवशी सावित्री व्रतारंभ आहे. वा: वा. पंडितजी क्या सुयोग है. कांग्रेस-पक्ष आणि आपण जणू काय प्राणसूत्रात गुंफून गेला आहात. आपण सावित्री तर कांग्रेसपक्ष म्हंजे सत्यवान. आता सत्यवानासाठी सावित्री यमराजाकडे साकडं मागते हे आपण जाणताच. पण ह्या यमराज कोण हे सांगाल काय ?

गंगेत आंघोळ करून कांग्रेस पक्षातला मैला साफ करण्यासाठी सज्ज होणं याला वेगळंच महत्त्व आहे. वसंत कानेटकर आणि सेन्सॉर बोर्ड याचे जसे आगळे–वेगळे संबंध आहेत, तसं पंडित त्रिपाठी आणि गंगेचं आहे.

राजीव गांधींना त्रिपाठीजींनी लिहून टाकलं की, कांग्रेस पक्ष साफ खराब झालाय, तेव्हा आम्हाला 'राम तेरी गंगा मैली हो गयी' या अवीट गोड गाण्याची याद आली. आता काही टारगट असं जरूर विचारतील की राजीव गांधींची ही कांग्रेस– गंगा मैली का झाली. त्रिपाठीसारखे भगतगण होते म्हणूनच ना; पण पंडितजी अशा वाह्यात टीकेकडे आपण वेल्याल करा.

आपल ध्येय उदात्त आहे आपल व्रत सावित्रीचं आहे. आपल्या नैतिक सामर्थ्याने आपण सत्यवानाला जिवंत करा. एकोणिस जूनला आपण हेच करा. गंगा स्वच्छ करा. आता प्रश्न असा आहे की गंगेच्या पात्रात उभं राहून आपण गंगा साफ करणार की गंगेतलं ओंजळभर पाणी घेऊन आपली वेगळी गंगा सुरू करणार. पंडितजी, इन दॅट केस, तुमची गंगा मैलीच राहणार. तुमची काय अन् त्या राजीवजींची काय. गंगा मैली ती मैलीच.

### □ मुखर्जींची हकालपट्टी

इलस्ट्रेटेड विकलीच्या २७ एप्रिलच्या अंकात प्रणब मुखर्जी ह्यांची प्रदीर्घ मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. ह्या मुलाखतीनंतर मुखर्जी महाशयांची पक्षातून तातडीने हकालपट्टी करण्यात आली. आता ते कांग्रेस (पी) म्हणजे प्रियदर्शनी कांग्रेस असा नवा पक्ष काढीत आहेत. हाडाच्या कांग्रेसजनांचा एक विशेष आहे. ते पक्षात असताना नेहरू घराण्याच्या नावाचा जितका वापर करतात तितकाच पक्षातून बाहेर काढल्यावरही करतात.

मुखर्जींच्या ह्या मुलाखतीवर विकलीच्या १८ मे च्या अंकात तुघलकचे संपादक चो रामस्वामी ह्यांनी भाष्य केले आहे. चो रामस्वामी ह्यांची शैली मुळातच प्रसन्न आहे. त्यातून त्यांनी ज्याप्रकारे ह्या मुलाखतीचे विश्लेषण केले आहे तो खरोखरच वाचनीय आहे. ह्या मुलाखतीच्या रूपाने एकूण सर्वच कांग्रेसजनांच्या मनोभूमिकेवर उत्तम प्रकाश पडत असल्याने आम्ही ह्या सदरात त्याचा उल्लेख करीत आहोत. मुखर्जी ह्यांनी पुढील सहा वर्षे टाइम्स गटातील कोणतेही मासिक वा वृत्तपत्र ह्यांना हात न लावण्याचा निर्धार केला असल्याने, मुंबापुरीतून तरी रामस्वामी ह्यांचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचतील अशी आमची अपेक्षा आहे.

मुलाखतीत मुखर्जींनी देशाच्या भवितव्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे इंदिरा गांधींबद्दल बोलताना ते म्हणतात की, त्या असताना त्यांच्या सभोवतालचे आम्ही सर्वच फार छोटे दिसत असू. आता त्या गेल्यामुळे ह्या सर्व छोट्यांना आपण फार मोठे असल्याचा भास व्हायला लागला आहे.

मुखर्जींचे काही उद्गार फार लक्षणीय आहेत. ते म्हणतात ' I was only doing a job for her... बंगाल मधला मी एक छोटा कांग्रेस कार्यकर्ता होतो. माझ्याबद्दल कुणाला फारशी माहिती नव्हती. इंदिरा गांधींनी मला संधी दिली आणि नव्या नव्या जबाबदाऱ्या सोपवायला सुरुवात केली. प्रयत्न करीत, चुका करीत माझे काम मी शिकत होतो. अशा जबाबदाऱ्या मिळाल्याने इतराप्रमाणे मीही त्यांच्याशी एकनिष्ठ होतो '

चो रामस्वामी म्हणतात मुखर्जींची इंदिरा गांधींवरील निष्ठा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे किंवा त्यांच्या ध्येयधोरणांशी ते सहमत असल्यामुळे नव्हती, तर केवळ इंदिरा गांधींनी त्यांना संधी प्राप्त करून दिली म्हणून होती. इंदिरा गांधींच्या घरातील चपराशाने मी त्यांच्यासाठी काम करतो असे समजण्यासारखे आहे. परंतु देशाचे अर्थखाते सांभाळणाऱ्या मंत्र्याच्या तोंडात ' I was doing a job for her ' हे उद्गार शोभणारे नव्हेत.

प्रणब मुखर्जी जर चुकत शिकले तर ह्या चुकांचा भूर्दंड इंदिरा गांधींना नव्हे तर देशाला भरावा लागला. प्रणब मुखर्जी, गुंडू राव, जगन्नाथ मिश्रा, विद्याचरण शुक्ला, अंतुले ह्या साऱ्यांचेच प्रश्न आणि दु:खे ही व्यक्तिगत आहेत. त्यांना इंदिरा गांधींनी जी संधी दिली ती आता राजीव गांधी देत नाहीत. परंतु ह्यांना संधी देण्याचा मक्ता काही नेहरू घराण्याने घेतलेला नव्हता. आईने ज्या आश्रितांना लाडाने मोठे केले, त्यांच्या भाग्योदयाची जबाबदारी मुलाने घेण्याचे काहीच कारण नाही. देशापुढे प्रश्न आज आहेत तसे पूर्वीही होते.

यांना मात्र स्वत.चे प्रश्न हे देशाचे प्रश्न असल्याचा भास होत रहातो. एवढया एका कारणामुळेही फुटीर कॉंग्रेसजन एकत्र येणे कठीण होत आहे. यातल्या कुणालाही चुचकारले तर बडाचा झेंडा गुडाळून ते दिंडीत सामील होतील.

आसामच्या निवडणुकीनतर 'कॉंग्रेसचा पराभव झाला तरी लोकशाहीचा मात्र जय झाला.' अशा प्रकारची जी घोषणा केली गेली त्यावर मुखर्जींनी सडकून टीका केली आहे. सत्तेवर असेपर्यंत मुखर्जीची धारणा ही लोकशाही म्हणजे कॉंग्रेस– कॉंग्रेस म्हणजे इदिरा– आणि इंदिरा म्हणजे इडिया अशीच असल्याने त्याच्यापासून वेगळ्या विचारांची अपेक्षा नाही. प्रियदर्शनीच्या नावाची शिदोरी त्यांनी बरोबर घेतलेली आहेच, ती सहा वर्षांच्या खडतर वाटचालीत त्यांना कितपत उपयोगी पडते ते पहायचे.

— विष्णु जयदेव

## पुणे वार्ता

### □ 'मिटकॉन' प्रदर्शन

मे महिनाभर पुण्यात सांस्कृतिक धामधूम होती. वसत व्याख्यानमाला, मॅजेस्टिक गप्पा यांच्यासह छोटया–मोठया बऱ्याच व्याख्यानमाला पार पडल्या. पुस्तक प्रदर्शने झाली. विभागीय साहित्य समेलनही संपन्न झाल. जयंत्या–पुण्यतिथ्याही साजऱ्या झाल्या. एकूणच सास्कृतिक चहल–पहल जोरात होती.

आता जून बरोबरच वरूणराजही अवतरले गेले चार-पाच दिवस त्यांनी पुणेकराना बऱ्यापैकी झोडपले. जनजीवन विस्कळीत वगैरे बातम्या वर्तमानपत्रानी छापल्या. झालच तर पाण्याने वहाणारे रस्ते आणि बंद पडलेली वाहने याचे फोटोही छापले. तसा पुण्यातला पाऊस म्हणजे फारसं कौतुकास्पद काहीच नाही. सगळया चार महिन्यात तो आधेमधे असा कोसळतो. एवढेच. बाकी छत्र्या, रेनकोट, गमबुटासारखे अवजड पदार्थ अगावर वागवण्याचे कष्ट तो कमी वेळा देतो. महाबळेश्वर, माथेरानसारखा हा पाऊस काही रम्य नाही. पुणेकराना मात्र आपलं उगाच कौतुक, वेळ घालवण्यासाठी पावसाची चर्चा वगैरे. बाकी सार वर्णन म्हणजे शाळेत लिहिलेल्या 'पावसाळयातील एक दिवस' या निबंधासारखे.

गेला महिनाभर चालू असलेली सांस्कृतिक चहल पहल मात्र या पावसाने विस्कळीत झाली. जूनचा हा पहिला हप्ता पाऊस एके पाऊस या कार्यक्रमाचाच होता. तेवढाच सध्याकाळच्या पुण्यात गारवा !

सांस्कृतिक चहल–पहल थंडावली असली तरी औद्योगिक पुण्याच दर्शन मात्र सध्या घडतय. गरवारे महाविद्यालयाच्या मैदानावर रोटरी क्लब आणि 'मिटकॉन' याच्या वतीने हे प्रदर्शन भरवल गेलय. पुण्याचा औद्योगिक परिसर झपाटयाने वाढला आहे. चहू अंगास तो विखुरलेला आहे या परिसरात उत्पन्न होणाऱ्या उत्पादनाचं दर्शन या प्रदर्शनात घडल.

पुणे परिसरातील मोठे तसेच लघुउद्योजक या प्रदर्शनात सहभागी झाले आहेत. एकूण ८० दालनामधून औद्योगिक तसेच गृहोपयोगी उपकरणे माडण्यात आली आहेत. प्रात्यक्षिके, व्हिडीओ टेप्स, ड्रॉईंग्ज वगैरे माध्यमातून प्रेक्षकाना माहिती देण्याची सोय केली आहे.

'मिटकॉन' ही उद्योगाना तज्ज्ञ सल्ला देणारी सस्था. रोटरी क्लबच्या सहयोगाने हे प्रदर्शन त्यानी आयोजित केले. 'मिटकॉन' चे तज्ज्ञ या प्रदर्शनात नव्या उद्योजकाना आणि जिज्ञासूना मार्गदर्शन करताना आढळले. विविध स्वरुपाची उत्पादने या प्रदर्शनात आढळली. कॉम्प्यूटर, वॉशिंग मशीन आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादने, त्याना लागणारी उपकरणे प्रदर्शनातून मांडण्यात आली.

सर्वसामान्य पुणेकराला आपल्या अवती भवतीच्या 'औद्योगिक पुण्याची' ओळख या प्रदर्शनातून घडली असे म्हणावयास हरकत नाही.

### □ स्टीव्हन स्पीलबर्गचा E. T.

स्टीव्हन स्पीलबर्ग हा सध्या हॉलिवूडचा 'स्टार' आहे. खरं तर त्याच्या विषयी किंवा त्याच्या E T. विषयी लिहिण्याची ही जागा नाही. पण त्याचा E. T. पुण्यात नुकताच प्रदर्शित झाला आहे. हा E. T. अगाने ओबडधोबड पण तरीही नितांत सुदर आहे म्हणूनच लिहिण्याचा मोह.

स्टीव्हन स्पीलबर्ग हा दिग्दर्शक त्याच्या फॅन्टसीजबद्दल प्रसिद्ध आहे. (आठवा : जॉज, क्लोज एन्काउन्टर ऑफ थर्ड काइन्ड, रेडर्स ऑफ द लॉस्ट आर्क वगैरे ) स्टीव्हन स्पीलबर्गने हॉलिवूडमध्ये फॅन्टसीची नवी परंपरा सुरू केली आहे त्याच्या पावलावर पाऊल टाकूनच जॉर्ज ल्युकास, ज्यो डान्टे वगैरे मंडळींनी स्टार वॉर्स सिरीज, ग्रेमलीन वगैरे सारखे काही भन्नाट चित्रपट निर्माण केले.

स्टीव्हन स्पीलबर्ग असा फॅन्टसीबद्दल प्रसिद्ध असला तरी E. T. भावतो तो त्याच्या सजीवतेमुळे E. T. इतका सजीव होतो की सहज वास्तव बनून जातो. E. T. ला या माणसाने चक्क भाषभाषनात गुतवले आहे यात्रिक करामतीतून एवढी सजीवता निर्माण करण्याचे कसब अफलातून आहे.

तीस लाख प्रकाश योजने दूर असलेल्या आपल्या घरापासून हा E T. एका अतराळयानातून पृथ्वीवर आला आहे त्याचे यान निघून जाते आणि तो एकटा पृथ्वीवर चुकून रहातो. आपल्या घरापासून तीस लाख प्रकाश योजने दूर ! इथे पृथ्वीवर E. T. ा छोटा एलीयन भेटतो. सुरुवातीला दोघेही दचकतात मग कुतुहलापोटी जवळ येतात. एलीयन E. T ला आपल्या घरात नेतो आणि हळूहळू त्याची ओळख आपल्या मोठया भावाशी आणि छोटया बहिणीशी करतो. ही सारी बच्चे मडळी E. T मध्ये गुततात. E. T. पृथ्वीवरची भाषा शिकतो आणि त्याला कळतं होम म्हणजे घर. E. T. ला घराची ओढ लागते आणि तो एकच शब्द उच्चारतो. 'Home !' E. T. चे छोटे दोस्त त्याला त्याचे घर मिळवून देतात. आणि शेवटी विरह व्याकूळ E. T. आणि त्याचे दोस्त याची ताटातूट होते

ही सारी कथा स्पीलबर्गने नितात सुदर केली आहे E. T. ला त्याने अशा प्रकारे खेळवले आहे की हा यांत्रिक प्राणी प्रत्येक प्रेक्षकाच्या हृदयात घर करतो ( त्याचे स्वत चे घर अनत योजने दूर असले तरी ) त्याची घराची ओढ, संशोधकाच्या तावडीत सापडल्यावर झालेली कुतरओढ, नवनव्या वस्तूबद्दलचे कुतूहल वगैरे सारेच लाजवाब !

गेल्या काही दिवसात पुण्यात बऱ्यापैकी फॅन्टसीज् येऊन गेल्यात. स्प्लॅश, लेडीहॉक् वगैरे. परंतु E. T शी त्याची तोड नाही. हा चित्रपट फॅन्टसीपलीकडे घेऊन जाणारा आहे. मुबई पाठोपाठ तो पुण्यात प्रदर्शित झाला आहे. आवर्जून पहावा असा !

— मनोहर सोनवणे

सास्कृतिक डोंबिवली

# रसवंती गृहे

अजूनपर्यंत माझ्या पाहण्यात एकटी स्त्री–अर्थात् जाणती–बिनधास्तपणे चहा पिण्यासाठी किंवा काही खाण्यासाठी हॉटेलात शिरली आहे असे दृश्य नाही. डोंबिवलीत वेगवेगळ्या कार्यालयातून – क. म न पा, टपाल, बँक इ अनेकजणी नोकरी करतात; पण त्याही मैत्रिणीबरोबर जाऊनच हॉटेलला उदार आश्रय देतात पण बाजारात भाजी, रेशन, किराणा माल इ आणण्यासाठी बाहेर पडणारी एकटी स्त्री ऊन असो वा नसो, श्रम झालेले असोत वा नसोत जरा विसाव्यासाठी, कोरडा झालेला घसा ओला आणि थडगार करण्यासाठी अगदी न लाजता ह्या ' पानं ' गृहात शिरते. त्यामुळेच एकजण म्हणाला 'बियर बार' 'परमिट रुम' ही पुरुषाची 'पान' गृहे आहेत तर ऊसाची गुऱ्हाळे ही महिला 'पान' गृहे आहेत. डोंबिवलीच्या रसवती गृहात सकाळपासून रात्रीपर्यंत स्त्रियाची, कुटुबवत्सलाची आणि म्हणून तरुण–तरुणीची सतत गर्दी असते.

इतर कोणत्याही इतकी लोकसख्या असणाऱ्या शहरात इतक्या सख्येने गुऱ्हाळे असतील असे वाटत नाही डोंबिवलीच्या कोणत्याही रस्त्याने फिरा, कोणत्याही नाक्यावर उभे रहा, आजूबाजूला एखादे तरी गुऱ्हाळ तुमच्या नजरेस पडेलच पडेल. डोंबिवलीत फिरताना जी अनेक वैशिष्ट्ये दिसतात, त्यापैकी विपुल गुऱ्हाळे हे एक ठळक वैशिष्ट्य मानावे लागेल. त्यामुळे जागे झालेले कुतूहल शमविण्यासाठी अनेक ठिकाणी 'जय कानिफनाथ रसवती गृह' नावाचे फलक पाहिले असल्यामुळे त्याच्या मालकाला श्री. भानुदास ऊर्फ दादा फडतरे ह्याना भेटलो त्याच्याकडून व इतराकडून मिळालेली माहिती ह्या वेगळ्या रसमय विषयावर पुरेसा प्रकाश पडणारी ठरली. हवेत अजूनही चागलाच तापदायक तडाखा–उन्हाचा–जाणवतो आहे त्यावर हा थडगार शिडकावा देण्याचा प्रयत्न

. 'मी इ. स. १९६३ च्या दसऱ्याला गुऱ्हाळ सुरू करेपर्यंत डोंबिवलीत एखादेच गुऱ्हाळ (लोकमान्य चौकातील भाजीबाजारात) होते. आज डोंबिवलीत पंचाहत्तरहून अधिक आणि आमची फडतरे बधूंची 'जय कानिफनाथ रसवती गृहे अठरा आहेत.' मी श्री. दादा फडतरे ह्याच्याजवळ चौकशी सुरू केली तेव्हा ते सागू लागले. ते पुढे म्हणाले, 'ह्या आमच्या गुऱ्हाळातून जवळ जवळ नव्वदजण कामाला आहेत. अर्थात् ही सर्व गुऱ्हाळे माझ्या एकट्याच्या मालकीची नाहीत माझी फक्त दोन आहेत. एक माझा मुलगा सोपान चालवतो. एखाद्या उद्योजकाने भरपूर भाडवल घालून कारखाना सुरू केल्यानतरही तो सुमारे शभरजणाना नोकरी देऊ शकेल का ? तो कारखाना असा विनातक्रार चालू शकेल का ? त्याचे बोलणे चालू असताना माझ्या मनात आलेला विचार. 'आम्ही फडतरे पुण्याजवळील वापगावचे. आमच्या गावचे अनेकजण एस्. टी. स्टँडवर गुऱ्हाळे चालविण्याचा व्यवसाय अनेक वर्षे करीत आहेत. मी स्वत: इथे येण्यापूर्वी कल्याणला आठ–दहा वर्षे एका गुऱ्हाळात नोकरी करीत होतो. मालकाशी काही कारणावरून बिनसल्यामुळे ती नोकरी सोडली. एके दिवशी संध्याकाळी डोंबिवलीला उतरलो. फिरत फिरत बागेजवळ आलो. ती चागल्या कपड्यातील, सुशिक्षित छाप पाडणारी माणसे पाहून हे गाव आपल्या व्यवसायाला चागले आहे असे वाटले.' फडतरे सागता सागता एका व्यापाऱ्याने सांगितलेले आठवले. आपला व्यवसाय चालत नसल्यामुळे बद करून दुसऱ्या बाहेरच्या व्यापाऱ्याच्या गळ्यात मारण्यासाठी इथले व्यापारी बाहेरच्या माणसाला नेमके सायकाळी पाच साडेपाचनतरच बोलावतात. तो बाहेरचा व्यापारी बाजारपेठेतील ती हजारो माणसे विविध वस्तू खरेदी करताना पाहतो. तो भलताच खूष होतो (नंतर अधिक खूष होतो किंवा कपाळावर हात मारून घेतो ) आणि त्याच खुशीत व्यवहार पार पडतो. अर्थात् फडतरे 'अधिक खूष' मध्ये सामावले गेले. मी त्याना ऊस कोठून आणता, व्यवसाय कसा चालतो इ बद्दल विचारले. तेव्हा ते सागू लागले, 'आम्ही सारा ऊस आमच्या गावानच मागवतो. त्यामुळे चागला, खात्रीशीर आणि स्वस्तात मिळतो. गुऱ्हाळातील रसासाठी वापरला जाणारा ऊस साखरेसाठी वापरला जाणारा नसतो. तो गुळासाठी वापरला जाणारा असतो. आमचा हा धंदा मेहनतीचा, कष्टाचा आहे. सुरुवातीला पाच–सहा वर्षे हाताने चालविले जाणारे गुऱ्हाळ, चरक होते. आता आम्ही विजेवर चालणारे चरक, यंत्र बसविले आहे हाताने चालविणे हे काम पहिलवानाचे आहे. तशी मुले, तगडे तरुण आता ह्या कामासाठी मिळत नाहीत. आम्ही खूष आहोत ह्या धद्यावर. आमची गिऱ्हाईकेही चागली आहेत. अगदी सुरुवातीपासून येणारी आहेत. सहकुटुब, सहपरिवार ती येतात. गर्दी असली तर पुन्हा एखादी फेरी मारून येतात पण रस प्यायल्याशिवाय घरी जात नाहीत. आम्हाला गुडाचा, दारुड्यांचा त्रास होत नाही. इथले सारे वातावरणच कौटुबिक माणसाला हवेसे वाटणारे असते.'

## दुधाची तहान ताकावर

डोंबिवलीच्या फडके आणि टिळक रस्त्याच्या नाक्यावर असणाऱ्या ह्या पहिल्या रसवती गृहातून मी डोंबिवलीतील दुसऱ्या प्रचड गर्दीच्या वाहत्या रस्त्यावरील फडतऱ्याच्याच दुकानात गेलो. तेथे भेटले श्री. तुकारामभाऊ फडतरे. ते सागू लागले 'आज इतके स्वस्त, शरीराला चागले, चवदार पेय दुसरे नाहीच. गावातील काहीजणानी पन्नास पैशाचा अर्धा ग्लास रस देणे बद करा असे सागितले त्यानी त्याच्या दुकानातून 'अर्धा ग्लास' बद केला. पण आमचा त्याला अजून विरोध आहे गावात पैसेवाले जसे आहेत, तसे गरीबही आहेत. त्याना पन्नास पैसेच परवडतात. त्याच्यासाठी तरी आम्हाला अर्धा ग्लास देणे आवश्यक वाटते.' सामाजिक जाणीव, कळवळा इ शब्द त्याना ठाऊक नसले तरी त्याची कृती आणि उक्ती तेच प्रकट करते आहे 'आमचा शुक्रवार हा सक्तीचा विश्रातीचा दिवस असतो' ते सागू लागले 'कारण त्यादिवशी सकाळपासून सध्याकाळपर्यंत वीजच नसते' जवळच 'वीज नाही म्हणून रस नाही' चा एक फलक पडलेला दिसत होता 'आम्ही नाथपथी आहोत. आमच्या गावी कानिफनाथाचे देऊळ आहे मोठे जागृत देवस्थान आहे ते. म्हणून आमच्या गुऱ्हाळाचे नाव 'कानिफनाथ'

आहे. आम्हाला फसविणारी गिऱ्हाईके नाहीत. पैसे नसले, सुटे नसले तर दुसऱ्या दिवशी आठवणीने आणून देणारी ही माणसे आहेत. त्यांच्याकडून वा त्यांच्याबद्दल कसल्या तक्रारी. 'गॅस्ट्रो वगैरे सारख्या साथी आल्या की मुंबईत तरी पहिली धाड ('गुऱ्हाळे बंद करा'ची) येते गुऱ्हाळावर. तुमचा काय अनुभव ? मी विचारले. 'तसा प्रसंग ह्या तेवीस वर्षांत अजून तरी आला नाही. आम्ही काटेकोरपणे स्वच्छता पाळतो, बनवाबनवी करीत नाही. पोट बिघडल्याची एकही तक्रार नाही. काविळ झाली की ऊस घेण्यासाठी, साधा रस घेण्यासाठी अनेकजण येतात. ह्याच्यासारखा चांगल्या चांगल्या माणसाशी संबंध येणारा दुसरा कोणताच व्यवसाय नाही' गप्पांचा समारोप करताना श्री. तुकारामभाऊ म्हणाले.

गावातील इतर काही गुऱ्हाळ मालकाशी बोललो. त्यांच्याही बोलण्यावरून ह्या साऱ्यालाच दुजोरा मिळाला. कोणी आहे त्यात समाधान मानणारा भेटला,तर कोणी मनुष्यबळ नसल्यामुळे दुसरे गुऱ्हाळ सुरू करता करता येत नाही असे म्हणाले. तर कोणी मोक्याची जागा आता घेणे परवडत नाही म्हणून दुसरे गुऱ्हाळ टाकता येत नाही असे सांगू लागला. पण एक मात्र खरे, योग्य ठिकाणी असणारे गुऱ्हाळ चालत नाही असे ह्या गावात घडत नाही. त्यामुळे बंद केलेले, त्या ठिकाणी अन्य व्यवसाय सुरू झाल्याचे दिसत नाही.

'कॉफी हाऊस' हे पूर्वी चलती असणाऱ्या लेखक कलावंताचे भेटण्याचे, गप्पा मारण्याचे ठिकाण असे. मुंबईतील इराण्याची हॉटेल्स ही साहित्य, नाट्य, चित्र, शिल्प इ. कलाक्षेत्रात धडपडू पहाणाऱ्या पण रिकामा खिसा असणाऱ्यांची, दोघात एक चहा आणि सिगरेट पिणाऱ्याची, भेटण्याची, तासन् तास गप्पांचा अड्डा जमविणाऱ्याची ठिकाणे होती. आज मात्र अशी ठिकाणे संपुष्टात येऊ लागली आहेत. शहरांतून, नगर, महानगरातून वाढलेली भयानक गर्दी, जीवनाला आलेला जीवघेणा वेग त्यामुळे निवांतपणे गप्पा मारीत चहाचे घुटके घेत बसण्याची ठिकाणे नाहीशी झाली आहेत. बदलत्या गतीमान जीवनात आपण कळत नकळत कितीतरी गोष्टी बाजूला टाकतो आहोत, विसरून जातो आहोत. अशी रसवती गृहे पाहिली की उरल्या सुरल्या खुणांची आठवण त्यामुळे येते. बदलत्या काळातला अनुरुप असा बदल होतो. त्याचप्रमाणे स्त्रीमुक्तीच्या कितीही चळवळी चालू असल्या, पुरुषी वर्चस्व कमी व्हावे असे वाटले तरी अजूनही एकट्या स्त्रीला हॉटेलात जावेसे वाटत नाही. वाटत असले तरी ती जात नाही. दुधाची तहान ताकावर त्याप्रमाणे चहाची तल्लफ रसावर भागविण्यासाठी तर ही एकटी स्त्री निःसंकोचपणे गुऱ्हाळाच्या पायऱ्या चढत नाही ना? की थकल्याभागल्या जीवाला विरंगुळा म्हणून, एकटे बसण्याचे, संसाराच्या विवंचनेतून जरा दूर जाण्याचे स्वातंत्र्य घेण्यासाठी तर ती गुऱ्हाळात जात नाही ना? अर्थात आपल्या पतीला, मुलाबाळांना घेऊनही कौटुंबिक पानाचा आनंद लुटण्यासाठीही ती येते. पण एकटी स्त्री गुऱ्हाळात शिरताना वा बाहेर पडताना पहातो तेव्हा तिच्या मनात नेमका विचार कोणता असेल, हा प्रश्न वारंवार उभा राहतोच.

– चंद्रशेखर राजे

## सांस्कृतिक नागपूर

### ☐ नागपूरची पत्रकारिता कोणीकडे ?

नागपूर टाईम्सचे वृत्तसंपादक श्री. व्ही. एल. देशपांडे यांची बदली रद्द करावी या आणि नवसमाजमधील कर्मचाऱ्यांच्या अनेक वर्षांपासून रेंगाळत पडलेल्या न्याय्य मागण्या नवसमाज व्यवस्थापनाने मान्य कराव्यात याकरिता नवसमाज श्रमिक संघाने आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघाने ३१ मे पासून आंदोलन सुरू केले होते. आणि श्री देशपांडे आणि त्यांचे काही सहकारी आमरण उपोषणाला बसले होते. त्या आंदोलनाची शेवटी यशस्वी सांगता झाली. व्यवस्थापनाने कर्मचाऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्या विजयी सभेमध्ये व्यवस्थापकातर्फे प्रबंध संचालक श्री. नरेश गद्रेही सामील झाले त्यांचे भाषण नेहमीच्या भाषणापेक्षा वेगळे ठरले. ते म्हणाले, 'ज्याच्या धमन्यातून सळसळते रक्त वाहते अशी माणसेच मला विदर्भात दिसत नाहीत. सारेजण कसे थंड प्रकृतीचे! पण मुळात अन्याय झाला नसूनही तो झालाच आहे या समजुतीने पेटून उठून पत्रकार संघटनेने जो आक्रमक पवित्रा घेतला तो मला सुखावून गेला. मी स्वतः नेहमीच अन्यायाविरुद्ध दंड थोपटून उभा असतो. आज मला माझ्यासारखे लढवय्ये भेटले माझ्या दृष्टीने पत्रकार संघटना परीक्षेत पास झाली!' आता या भाषणातले खरे किती आणि खोटे किती हे सांगणे कठीण असले, तरी नागपूर टाईम्समधला कर्मचाऱ्यांचा संप मिटला ही नागपूर–विदर्भातल्या सामान्य माणसाच्या दृष्टीने तरी समाधानाची गोष्ट ठरली. कारण संप किंवा उपोषण हे जास्त दिवस चालणे हे सामाजिक आरोग्याच्या दृष्टीने योग्य नव्हते.

परंतु ह्या निमित्ताने नागपूरच्या वृत्तसृष्टीबद्दल सामान्य माणसाच्या मनात जे विचार खदखदत आहेत ते ह्या ठिकाणी नमूद केल्याशिवाय आम्हाला राहवत नाही. नागपूरात लोकमत, नागपूर–पत्रिका आणि तरुण भारत ही तीन प्रमुख मराठी वृत्तपत्रे आहेत, तर हितवाद व नागपूर टाईम्स ही दोन इंग्रजी वृत्तपत्रे आहेत. यातील नागपूर–टाईम्स व नागपूर–पत्रिका यांनी जवाहरलाल दर्डा यांच्या 'लोकमत' विरुद्ध आघाडी उभारलेली आहे. लोकमत आणि नागपूर–पत्रिका यांनी एकमेकाविरुद्ध प्रचाराचा असा धुमधडाका उडविलेला आहे की त्यात खरे काय आणि खोटे काय असा सामान्य वाचकाला प्रश्न पडलेला आहे. त्यातच नागपूर पत्रिकेने नागपूर विद्यापीठाविरुद्ध आघाडी उघडून अन्यायाची अनेक प्रकरणे वेशीवर आणलेली आहेत. हितवाद साधारणपणे नागपूर विद्यापीठाला पाठिंबा देत आहे. सामान्य माणसाला 'हितवाद' वाचले की नागपूर विद्यापीठाची बाजू खरी वाटू लागते तर नागपूर पत्रिका वाचली की नागपूर विद्यापीठाबद्दल तिटकारा वाटू लागतो! एकदा भांडण सुरू झाले की पहिला बळी सत्याचा जातो! अन्यायाविरुद्ध दंड थोपटून उभे रहाणे हे वृत्तपत्राचे कामच आहे. परंतु ते कार्य करीत असताना सत्याचा बळी जाणार नाही याची काळजी घेतली पाहिजे आणि अशी काळजी घेतली जात नाही असे नागपूर–विदर्भातल्या सामान्य माणसांना वाटू लागले आहे. त्यातल्या त्यात नागपूरातल्या 'तरुणभारत'

ह्या वृत्तपत्राने कोणत्याही प्रश्नावर जास्त भडक भूमिका स्वीकारलेली नाही ही सामान्य माणसाना दिलासा देणारी गोष्ट आहे !

### ☐ कॉलेज–प्रवेशाचे दिवस

१२ वी आणि १० वी च्या रिझल्टस्च्या तारखा जाहीर झाल्यामुळे आता महाविद्यालये प्रवेशाकरिता गर्दी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थिनींनी पुन्हा गजबजणार. ह्या दोन महिन्यात निरनिराळया शाळाचे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य अतिशय 'बिझी' होणार ! त्याच्यावर प्रवेशाकरिता निरनिराळया विद्यार्थी सघटना, राजकीय पुढारी, समाजातील प्रतिष्ठीत नागरीक यांचे 'प्रेशर' येणार ! मागल्या वर्षी तर नागपुरातल्या एका महाविद्यालयात तिथल्या विद्यार्थी युनियननेच अॅडमिशनचे कार्य आपल्या हाती घेतले आणि वारवार नापास होणाऱ्या 'दादा' विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवून दिला ! आता यावर उपाय काय याचा सबंधीत विचार करतीलच मला त्याबद्दल लिहावयाचे नाही मला लिहावयाचे आहे ते प्राचार्य या पदाबद्दल ! ह्या पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला किती 'प्रेशर्स' सहन करावी लागतात ! विद्यार्थ्यांना दड केला, लागलीच विद्यार्थी फार मोठया संख्येने त्याच्या चेम्बरमध्ये घुसतात ! तुम्ही सोशल गॅदरिंग करू देत नाही काय लागलीच 'मुर्दाबाद'च्या घोषणा सुरू होतात गॅदरिंगमध्ये गुडगिरी होऊ नये म्हणून चार चार रात्री प्राचार्यांना जागून काढाव्या लागतात ! वर कोणी नाराज होऊन सुरा काढतो किंवा काय याची भीती असतेच ! दारू पिऊन गॅदरिंगला येणाऱ्या विद्यार्थ्यांचा बदोबस्त कसा करावा हा प्रश्न प्राचार्यांसमोर सतत असतोच. एखाद्या तात्पुरत्या प्राध्यापकाला नोकरीतून कमी केले तर लागलीच आंदोलन उभे रहाते. तृतीय श्रेणी आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याचे शामियाने नेहमीच कॉलेजसमोर पडलेले असतात ! आम्ही तर नेहमीच विनोदाने म्हणत असतो की कॉलेजात इनके 'बेंचेस' आहेत की 'हायकोर्ट बेंच' सुद्धा कायमचाच कॉलेजात का आणू नये ? म्हणजे लागलीच तिथेच ताबडतोब 'रिट पिटिशन्स' करता येतील. ह्या शिवाय सस्थेचे अध्यक्ष, सेक्रेटरी आणि प्राचार्य याच्यातील ताणतणाव नेहमी चालू असतात. मंत्र्याना सतत २४ तास पोलिसाचे संरक्षण असते. त्याना फार क्वचित वेळा गर्दीला किंवा घेरावाला तोड द्यावे लागते. त्यातही त्याच्याकडे येणारी माणसे Adults असतात. प्राचार्यांकडे येणारी सर्व मडळी विद्यार्थी असतात. त्याचे रक्त गरम असते ! ते केव्हा काय करतील याचा नेम नसतो. परंतु 'अॅकेडेमिक क्षेत्र' असल्याने त्या प्राचार्याला पोलिसाचीही मदत घेताना हजार वेळा विचार करावा लागतो याचा परिणाम काय होतो ? नुकतेच एकाने या बाबतीत सर्वेक्षण केले बहुताश प्राचार्यांना रक्तदाबाचा विकार जडतो असा त्याने निष्कर्ष नोदवून ठेवला. ह्या शिवाय मनावर सतत दडपण असणे, अपुरी झोप, चिडचिड, अगावर ओरडणे इत्यादी विकार उद्भवतात असेही त्याला आढळून आले

परन्तु तरीही प्राचार्य पदाकरिता लोक का धडपडतात ? ह्या प्रश्नाचे मला तरी समाधानकारक उत्तर सापडलेले नाही !

### ☐ 'समग्र वीर वामनराव'

एक थोर देशभक्त स्वातंत्र्य सेनानी आणि एक जबरदस्त नाटककार कै. वीर वामनराव जोशी ह्याना महाराष्ट्रात कोण ओळखत नाही ? नागपूर–विदर्भाचे ते एक थोर सुपुत्र होते. महाराष्ट्र राज्य साहित्य सस्कृती मडळाच्या वतीने 'समग्र वीर वामनराव' या मधुकर आष्टीकर संपादित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच अमरावतीला स्थानिक नगर वाचनालयात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पी. के. उर्फ अण्णासाहेब देशमुख उपस्थित होते. अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. का. गो. देशमुख यानी ग्रथाचे प्रकाशन केले. वीर वामनरावाच्या नागपूर–विदर्भातील चाहत्याना ह्या ग्रथ प्रकाशनाचा आनद वाटणे साहजिकच आहे कारण नागपूर-विदर्भाच्या पिढया वीर वामनराव जोशी आणि डॉ. मुजे यांनीच घडविल्या आहेत वीर वामनराव जोशी यांचे 'राक्षसी महत्त्वाकाक्षा' आणि 'रणदुदुमी' ही नाटके कोण विसरू शकणार? ओघवती भाषा, पूरक नाटयतत्र, स्फोटक सवाद आणि रूपकलात्मक कथासूत्र ही त्याच्या नाटकाची खास वैशिष्टये होती.

### ☐ शंभर झाडू द्या !

आजकाल मन्त्र्याकडे दारूचे परवाने द्या, रेशन दुकानाचे लायसेन्स द्या, सिमेंटचे परवाने द्या इत्यादी मागण्यांकरिता शेकडो लोक सारखे येत जात असतात परंतु नागपूरला वॉर्ड न. १३ चे भाजपाचे नगरसेवक श्री. रामभाऊ भाटवडेकर यानी आपल्या वार्डा करिता महापौराजवळ १०० झाडू मागितले आहेत. महापौराना पाठविलेल्या पत्रात श्री. भाटवडेकर लिहितात, 'माझ्या वार्डात अर्धा भाग असा आहे की ज्या ठिकाणी सफाई कामगार पोहोचत नाही. महापालिकेची आर्थिक स्थिती ठीक नसल्याने जास्त सफाई कामगार नेमले जात नाहीत. पण महापौरजी माझ्या वार्डातील नागरिक समजूतदार आहेत ते म्हणाले, 'तुम्ही आम्हाला झाडू आणून द्या म्हणजे आम्ही घरासमोरील कचरा झाडून टाकू !' म्हणून महापौरजी मला तुम्ही १०० झाडू आणून द्या म्हणजे माझ्या वार्डातील जनतेचे मी समाधान करू शकेन !'

ब्रेव्हो, भाटवडेकर !

— शरच्चंद्र

---

अहो येता जाता

## 'सब ठिक हो जायेगा !'

फिरोझ रानडे

मुंबईत बसमध्ये कोणी बाई कोणा अनोळखी पुरुषाशी भडाभडा बोलत नाही; पण ती माझ्याशी बोलली. एवढच नाही तर मला जिथं जायच होत त्या घराच्या अगदी जवळ आणून सोडलं होतं.

मी सहार व्हिलेज म्हणजे सहार विमानतळाजवळचा जो भाग आहे तेथे चाललो होतो. आमच्या घराजवळून जी बस जायची ती सहार व्हिलेजच्या जवळपास जायची. तेथे एका गृहस्थाना भेटायचे होते. काही दिवसापूर्वी त्याची गाळा विकण्याबाबतची जाहिरात आली होती. त्याबाबत काही बोलणी करायला जायच होतं. मी त्या गृहस्थांना दोनदा भेटलो होतो. त्यामुळे जागा नक्की कुठे आहे ते मला माहीत होते.

पण त्या दोन्ही वेळी कुटुंब बरोबर असल्यामुळे रिक्षाने गेलो होतो.

ह्या वेळी सडा होतो. तर उगाच रिक्षाला पैसे का खर्च करावे ? ह्या हेतूने बसने निघालो होतो. बसने कसे जायचे हे पक्के माहित नव्हते. ती जागा सिव्हिल एव्हिएशनच्या क्वार्टर्सच्या जवळ आहे हे माहित होते. त्या अनुरोधाने गेल व थोडी शोधाशोध केली की जागा सापडणार होती थोडं चालायला लागणार होतं एव्हढच.

तशी ती जागा आमच्या घरापासून लाब नव्हती. प्रथम कुपर इस्पितळाचा स्टॉप, नंतर नानावटी इस्पितळाचा, नतर सब-वे ने गेल की विले पार्लेचा पूर्वभाग येणार होता. तेथल्या हाय-वे जवळच्या थांब्यावर उतरल की जवळच ती जागा होती.

नेहमीप्रमाणे बस भरली होती. थांब्या-थांब्यावर लोक चढत होते उतरत होते. हे सगळ नेहमीच होत मी खिडकीशी बसून बाहेरची गमत पहात होतो. गमत म्हणजे मुबईची गर्दी-येणाऱ्याची व जाणाऱ्याची. मुबईत बाहेर बघण्यासारखे पुष्कळ असते.

नानावटी इस्पितळाचा थाबा गेला. तशी एक बाई-बाई कसली एक २७-२८ वर्षाची तरुणी माझ्याजवळ येऊन बसली. तिच्या बरोबर पाच-सहा वर्षाची मुलगी होती. आईच्या माडीवर बसून जितक बाहेरच पहाता येईल तेवढ ती मुलगी पहात होती. ते बघून मी तिला विचारल, 'तुला खिडकीजवळ बसायचं आहे का ?' म्हणून.

आता खिडकीजवळ बसायला मोठी माणसं सुद्धा फार उत्सुक असतात, तर त्या लहानग्या मुलीचं काय ? ती आनंदली. मी तिला थोडी जागा करून दिली व सीटवर उभं केल. 'नाव काय तुझ ?' मी मुलीला विचारल. पण मुलीनं काही उत्तर दिले नाही तेव्हा मी परत विचारल, 'नाव काय ग तुझ ? की तुला बोलताच येत नाही ?' तरीही मुलगी बोलेना.

'आज तिचा मूड नाही आहे' मुलीऐवजी आईनच उत्तर दिल. 'आत्ताच इंजेक्शन घेऊन आली आहे. चिक्कार रडली.'

'इजेक्शन ? मी मनाशी विचार केला. मुलगी चागली गुटगुटीत होती. आजारीपणाची काही खूण नव्हती.

'चांगली तर दिसते आहे ठकी. झालंय काय हिला ?' मी आईला विचारले.

*माझा अदाज काहीतरी सर्दी-पडस असं* असेल असा होता ताप वगैरे असता तर मला जाणवल असतं. कारण तिला धरूनच बसलो होतो.

'अहो तिच्यात रक्त-दोष आहे. दर दोन *दिवसानी अस इंजेक्शन घ्यायला लागत.*' हे सागता सागता त्या बाईच्या डोळ्याला अगदी पाणी आल.

त्या मुलीला असा काही गभीर आजार असेल ह्याची मला कल्पना नव्हती. मला खूप अवघडल्यासारखे झाले. पण काहीतरी बोलणं भाग होतं म्हणून मी विचारल, 'मग तुम्ही नानावटीत जाता ?'

'हो, माझे मिस्टर सिव्हिल-एव्हियेशनमध्ये आहेत. सरकारी नोकराकरता सि. जी. एच. एस आहे ना, त्या तर्फे नानावटीत पाठवतात.' वगैरे तिने सागायला सुरवात केली मी पूर्वाश्रमीचा सरकारी नोकर असल्यामुळे मला हे सि. जि. एच एस. वगैरे काय प्रकरण आहे ते माहीत होते ते सगळे सांगून ती परत मुलीच्या आजारापर्यंत आली. आजाराची गभीरताही सागितली.

त्यावर माझ्या तोडात अगदी सहजतेने आले की, 'काही काळजी करू नका, सगळे ठीक होईल.'

खरं म्हणजे माझ्या ह्या म्हणण्याला काही अर्थ नव्हता. तिला काय झाले आहे त्याची मला पुसटशीही कल्पना आली नव्हती. जिथे रोगाचीच कल्पना नव्हती तिथे त्यावर होणाऱ्या उपचाराची कुठून असणार ? पण सहज भोळेपणाने व चागल्या हेतूने मी 'सगळ काही ठीक होईल' अस म्हणून गेलो होतो.

हिंदी सिनेमातून हे 'सब ठीक हो जायेगा' वेळोवेळी ऐकलं होतं. इकडे नायक फाशी चालला असतो वा नायिकेच कोणा दुष्ट खलनायकाशी लग्न होत असतं तरी कोणी म्हातारा मामा किंवा मावशी 'सब ठीक हो जायगा' चा मत्र घोकत असतात. ह्या सगळ्या गोष्टीची व भोळेपणाची मी आतापर्यंत पुष्कळवेळा चेष्टा केली होती आणि आता त्या वाक्याचच मराठी भाषातर ऐकवत होतो की 'सगळे ठीक होईल'

जितक्या भोळेपणाने मी हे म्हटले होते तितक्याच भोळेपणाने ते त्या बाईने ऐकले होते. बसमध्ये एका अनोळखी वयस्क माणसाने '*सगळं ठीक होईल*' म्हटल्याचं ऐकून तिला फार हायस वाटल होतं. कदाचित तिला तो कोणीतरी माझ्या रूपाने दिलेला आशीर्वादच वाटला असावा ते काही असो तिचा चेहरा एकदम उजळला

मग तिने मी कुठे जातो ह्याची चौकशी केली 'मी उतरते त्या थांब्यावरच उतरा' म्हणून मला सागितल

थाबा आला तसा मी उतरलो. ती पण उतरली मी पुढे जाऊ लागलो तर मला गाठून तिने मला कुठे जायचे आहे म्हणून विचारले. मुबईत एखाद वेळी कोणी बाई पुरुषाशी बसमध्ये बोलली तरी खाली उतरल्यावर कोणी बोलत नाहीत येथे इतक्या तऱ्हेचे बरे-वाईट लोक असतात तेव्हा तशी सावधगिरी बाळगणे योग्यच असते

पण त्या बाईचा माझ्यावर पक्का विश्वास बसला होता मी कुठे जायचे आहे सागताच 'मी त्या बाजूलाच जात आहे' असे सागून मला जवळ जवळ जथे जायचे होते त्या जागेपर्यंत आणून सोडल. आणि हे सगळे '*सगळे काही ठीक होईल*' ह्या वाक्याने झाले होते. बुडणाऱ्याला काडीचा आधार अस म्हणतात. पण बुडणाऱ्या मनाला काही शब्दसुद्धा पुरतात नाही ? □



प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्याचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलाची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# हारजीत



ॲड. रघुवीर जोशी

रविवारचा सुटीचा दिवस होता. माझ्या ऑफिसमध्ये चार–पाच खेडुत पक्षकार बसले होते. त्यांच्याशी बोलून त्यांचे काम मी संपविले होते. तरी पण ते बसूनच होते. आपल्या गावाकडे परत जाण्याची त्यांना फारशी घाई नसावी. एकदा सांगितलेल्या गोष्टी मी पुन्हा पुन्हा अधिकाधिक ठामपणाने सांगाव्यात अशा अपेक्षेने ते बसले होते. पानसुपारीचा बारदाना ठेवून, खुर्च्यांवर मांडी घालून ते निवांतपणे बसले होते. आपल्या वकीलाबरोबरचा सहवास जास्तीत जास्त वाढवावा असा त्यांचा प्रयत्न होता. त्यांनी केलेली पानसुपारीची ऑफर सौजन्याने नाकारून मी दुसऱ्या कामाचे कागदपत्र वाचण्यास सुरुवात केली. तरीपण त्यांचेवर त्याचा काहीच परिणाम झाल्याचे दिसले नाही.

जिन्यावर बांगड्यांचा व पावलांचा आवाज झाला. ऑफिसच्या दारात एक वृद्ध खेडुत स्त्री आली. तिच्या मागोमाग दुसरीही एखादी स्त्री असावी. ती जिन्यातच थबकून उभी राहिली असावी. त्या वृद्ध स्त्रीने 'अगं ये, भिऊ नकोस, वकीलसायेब आपलेत हैत,' असे दोनतीनदा सांगितल्यावर ती पुढे आली. त्या दोघी जणी आत येऊन एका बाजूच्या बाकावर बसल्या. मागाहून आलेली स्त्री विशीच्या घरातील होती. तिचा वेश खेडुत शेतकरी स्त्रीसारखाच साधासुधा होता. तिने आपल्या साडीवरून जरी पांढऱ्या कापडाची 'भुति' पांघरली होती तरी तिचा प्रमाणबद्ध, शेलाटा बांधा, गव्हाळ रंग व रेखीव चेहरा एकदम लक्ष वेधून घेणारा होता. खेडोपाडी सहसा न दिसणारे ते सौंदर्य होते. ती खाली मान घालून अवघडून बसली होती. इतर पक्षकार उत्कटतेने तिच्याकडे पहात होते. ती वृद्ध स्त्री माझी जुनी पक्षकार होती.

'काय गोपिकाबाई ? आता आणखी काय उद्भवलंय ? गेल्या वर्षीच तुम्हाला कबजा मिळाला ना ? पुन्हा काही भानगड झाली का ? ' मी गोपिकाबाईस विचारले.

'नाही वकीलसाहेब, माझे कोर्टाचे खेटें संपले. लई बेस झालं. आता ह्या माझ्या भाचीचे काम हाय म्हूनशान आले. सांग बाई तूच सांग समदं खुलं खुलं. वकील अन् डाग्दर यानला खरं खरं सांगितलं पायजे. हाय की न्हाई वकीलसाहेब ?'

'हो. हे बरीक खरं, वकीलाला समदं खुलं खुलं सांगितलं पायजे. अन् आपले वकीलसाहेब म्हंजे अख्ख्या तालुक्यात पयला नंबर. मी तर कोनतं बी काम या वकीलसायबांच्या बिगर करीतच न्हाई–' एका जादा अनुभवी पक्षकाराने मधे बोलून माझ्यावर व त्या दोघींच्यावर भाव मारण्याचा प्रयत्न केला.

'ते जाऊ द्या गोपिकाबाई काय काम आहे ते सांगा.' मी त्या पक्षकाराच्या शिष्टाईकडे दुर्लक्ष करीत म्हणालो.

'ए लोचे, बोल बाई, ज्येचं त्येनंच सांगितलेलं बरं. ' गोपिकाबाईने तिच्या दंडाला हात लावून सांगितले.

लोचनाने एकवार टपोऱ्या डोळ्यांनी माझ्याकडे व बसलेल्या पक्षकारांच्याकडे पाहिले. पुन्हा खाली पाहून तिने जागच्या जागीच चुळबुळ केली. तिची अडचण ओळखून बाकीच्या पक्षकारांना मी सांगितलेल्या कागदपत्रांची जुळवाजुळव करून पुन्हा येण्यास सांगितले. त्यांनी नाराजीनेच आपले रुमाल, पानाचा बारदाना आवरता घेतला व त्या नवागत तरुणीकडे नजर टाकीत ते निघून गेले.

वकीलाच्या ऑफिसात ती प्रथमच येत असावी. प्रत्येकाकडे संशयाने पाहणाऱ्या माझ्या व्यावसायिक सराईत दृष्टीलाही साजुकपणाचे नाटक करणाऱ्या इतर स्त्रियांप्रमाणेच ती नसावी असे वाटत होते. लोचनाने बावरलेल्या नजरेने माझ्याकडे पाहिले. घरंदाजपणा लज्जा,भीती, दीनवाणेपणा यांचे मिश्रण तिच्या नजरेत होते. तिने काही न बोलता एक पाकीट गोपिकाबाईंच्या हातात दिले. गोपिकाबाईने ते माझ्याकडे

दिले. त्या पाकिटातून लोचनाला तिच्या नवऱ्याने वकीलामार्फत नोटीस पाठविली होती. त्याने लोचनाविरुद्ध बदफैलीपणाचे स्पष्ट आरोप करून सोडचिठ्ठीची मागणी केलेली होती. अनेक प्रश्न विचारूनच मला लोचनाकडून माहिती घ्यावी लागली.

लोचना लहानपणीच पोरकी झाली होती. तिच्या लोभी चुलत्याने लोचनाच्या श्रीमत नवऱ्याकडून भरपूर पैसे घेऊन दोन वर्षापूर्वी तिचे लग्न करून दिले होते. तिचा नवरा सपत खेड्यातील बहुतेक सुखवस्तु तरुणांप्रमाणे बाई, बाटली, जुगार याच्या आहारी गेला होता. देखणी बायको व दारुची नशा यामुळे त्याचा अगोदरचाच सशयी स्वभाव अधिकच सशयी झाला होता. कोडून ठेवणे, बेदम मारहाण करणे हे नित्याचेच झाले. शेवटी सहा महिन्यापूर्वी तिला सपतने गुरासारखी मारहाण करून घराबाहेर हाकून दिले. लोचना आपली मावशी गोपिकाबाई हिच्या आसऱ्याला गेली. मजुरी करून कशी तरी पोट भरू लागली. लोचनासारख्या तरुण, सुदर मुलीला मजुरी करणेही अवघड व्हाटू लागले. म्हणून गोपिकाबाईने सपतकडे लोचनासाठी पोटगीची मागणी केली. संपत अधिकच चिडून बेफामपणे वागू लागला. आपल्या मित्राच्या सल्ल्यावरून त्याने लोचनाच्या पोटगीच्या मागणीस शह देण्याच्या हेतूने घाई करून आपणच अगोदर नोटीस दिली होती. त्या नोटिशीला खमग उत्तर देऊन मी लोचनासाठी पोटगीचा दावा करावा असे गोपिकाबाईने सुचविले

'म ऽऽ ग, करायचाय का पोटगीचा दावा ?' मी लोचनाची तयारी अजमावण्याचा प्रयत्न केला.

'कोर्ट कचेरीत अब्रुचे धिडवडे निघणार. त्या परीस मेलेल बर.' लोचनाने पदराने डोळे कोरडे केले.

'अगं तुझा आख्खा जन्म जायचा. माझं वय झालय. मी जिती हाय तवरच तुझ्या पोटापाण्याची सोय केली पायजे, वकीलसायेब, हिचं काय ऐकता ? करा पोटगीचा दावा लगीच.'

मी लोचनाचा निर्णय कळण्यासाठी स्वस्थ राहिलो, गोपिकाबाईने पुन्हा लोचनाला सुनावले—

'अगं असं गपगार बसून तुज निभणार नाही.'

'तुम्ही सुचल तसं करा' लोचनाने निर्णय आमच्यावरच सोपविला.

त्यानतर मी लवकरच संपतविरुद्ध मॅजिस्ट्रेट कोर्टात पोटगी मिळण्यासाठी खटला दाखल केला कोर्टात खेटे घालणारे इतर पक्षकार, त्यांचे मदतनीस पैरवीकार, साक्षीदार, वकील कारकून–शिपाई पोलीस खात्यातील लोक यानी भरलेल्या जंगलातून ही भेदरलेली हरिणी हा दीर्घप्रवास कसा करणार याची भीति मला वाटत होती.

लोचनाच्या खटल्याच्या तारखा सुरू झाल्या. कोर्ट कचेरीच्या एकदम नवख्या, विचित्र, गुदमरवून टाकणाऱ्या वातावरणास ती कशी तोंड देते या उत्कंठेने मी तिच्याकडे दुरून लक्ष ठेवून होतो. प्रत्येक *तारखेदिवशी बायकाच्या शेडमध्ये एका* कोपऱ्यात ती एकटीच अवघडून बसलेली असे. कोर्टात येणाऱ्या इतर बायका कोर्टाच्या वातावरणास सरावलेल्या होत्या. त्या इकडून तिकडे मजेत हिंडत. हॉटेलात चहा, फराळ करीत. पान तबाखू खाऊन पचापचा थुकण्यात पराक्रम मानीत. कोर्टातील कारकून, शिपाई, वकील त्याचे कारकून, पक्षकार, साक्षीदार वगैरे लोकांशी हसत खिदळत गप्पा गोष्टी करीत. कैफियत, कमिशनर, दरखास्त वगैरे शब्द वापरून कोर्टात नवीन येणारावर छाप मारीत, हे वेगळं आयुष्य त्याच्या अगवळणी पडल होतं. घरी, शेतात काबाडकष्ट करण्यापेक्षा ह्या नवीन चैनीच्या जीवनावर त्या खूष होत्या. कित्येक बायका तर दररोज कोर्टात येत स्वत: केज्जेदलाली करण्याची कलाही कित्येकीनी आत्मसात केलेली होती अशा विचित्र सस्कृतीच्या कळपातील बायकानी लोचनाभोवती गराडा घातला होता. हे माझ्या नजरेला खटकले होते कोर्टात येणाऱ्या सर्वच लोकाचे लक्ष लोचनाकडे वेधले गेले होते.

कोर्टाच्या आवारात लोचनाचा नवरा चावट माणसांना जमवून तिची बीभत्स टवाळी करीत असे लोचना मोडून पडावी म्हणून तिचा नवरा वारवार शिवीगाळ करीत असे. तिला अपमानित करीत असे. तिचा असह्य कोंडमारा मी जाणू शकत होतो.

वकिलाच्या विश्रातीच्या खोलीत दुपारी गरम चहाबरोबर गरमागरम थट्टामस्करीस उधाण येई. लोचनासारखी पक्षकार तर नेहमीच चर्चेचा विषय होई. ती माझी पक्षकार आहे आणि तिच्या नवऱ्याने तिच्यावर बदफैलीपणाचे आरोप केले आहेत हे सर्वच वकिलांना ताबडतोब समजले होते. हे ज्ञानप्रसाराचे काम लोचनाच्या नवऱ्याच्या वकिलानी मोठ्या तत्परतेने केले होते. वकिलाचे वेगवेगळे कंपू खाजगी आवाजात लोचनाचा विषय चविष्टपणे चघळीत असत आपला पक्षकार सपूर्णपणे खरा व उलट बाजू सपूर्ण खोटी असे समजण्याइतका मी भावडा राहिलो नव्हतो. त्यामुळे वकिलांच्या खोलीतील कुजबुज व कोर्टाच्या आवारातील चर्चा याचे मला काही वाटत नसे. परंतु लोचनाबद्दलची अशी चर्चा मला तिच्यावर *अन्याय करणारी वाटत असे.* लोचना तसल्या बायकाच्या कळपात जाणार नाही, त्या कळपाशी तो एकाकी झुज देईल, अशी आशा मी टेवून होतो.

काही महिने उलटले. लोचनाच्या खटल्याचा निकाल लवकर व्हावा असा माझा प्रयत्न होता. परंतु तिच्या नवऱ्याचे वकील काही ना काही कारणाने मुदती घेत. कोर्टातही अधिक जुनी प्रकरणे तुंबून राहिली होती. त्यामुळे लोचनाचे काम बरेच रेंगाळले. लोचनाचा बदफैलीपणा शाबीत करण्यासाठी सपत प्रत्येक तारखेला नवीन नवीन माणसे साक्षीदार म्हणून हजर ठेवण्याचे नाटक करीत होता. 'खटल्याचा निर्णय माझ्या बाजूने झाल्यासारखाच आहे. त्याची सारी व्यवस्था मी केलेली आहे.' अशा धमक्या सपत हस्ते परहस्ते लोचनास देत होता. ती अधिकाधिक खचत चालली होती.

शेवटी एकदाचा जाबजबाबाचा दिवस उगवला. सकाळपासून मी लोचनाला तिच्या जबानीसाठी सूचना देत होतो. ती भीतीने अर्धमेली झालेली होती. उलटतपासणीच्या दिव्यातून ती कशी बाहेर पडते याबद्दल मलाही धास्ती वाटत होती. माझी नेहमीची व्यावसायिक अलिप्तता या खटल्याच्या बाबतीत कमी होऊन माझे मन हळवे झाले की काय, अशी शका मला अस्वस्थ करीत होती.

शिपायाने लोचनाचा खटला पुकारला

तेव्हा कोर्टहॉल वकील, कारकून, इतर बघे लोकानी ठासून भरलेला होता. त्या गर्दीतून कशी तरी वाट काढीत लोचना पिंजऱ्यात उभी राहिली. जमलेल्या लोकाच्या नजरा लवलवत तिच्या शरीरावरून फिरत होत्या. काही तरी चविष्ट ऐकण्यासाठी त्याचे कान आतुर होते. लोचना थरथर कापत खाली मान घालून उभी होती पिंजऱ्याच्या कठड्याला तिने घट्ट धरले होते. सरतपासणीतील माझ्या साध्या सरळ प्रश्नानाही तिने कशीबशी चाचरतच उत्तरे दिली. लोचनाच्या नवऱ्याचे वकील तिची उलटतपासणी करण्यासाठी उभे राहिले. थरथरणाऱ्या वेलीला पार उध्वस्त करणाऱ्या बेफाम वाऱ्याच्या आविर्भावात त्यानी प्रश्नांचा भडिमार केला.

'नवऱ्याचे घर सोडून किती दिवस झाले?'

'दीड वरीस.'

'किसन पाटलाच्या शेतात नेहमी कामाला जाता?'

'व्हय.'

'किसन तुम्हाला दुसऱ्या बायकांपेक्षा जास्त रोजगार देतो?'

'व्हय. पर'–खुलासा करण्याचा लोचनाचा अयशस्वी प्रयत्न.

'होय किंवा नाही एवढेच सागा. जास्त नको.

'व्हय.'

'त्याची, तुमची ओळख केव्हापासूनची?'

'नवऱ्यान घराबाहेर काढल्यावर वळख झाली.'

'ओळख होऊन चार–पाच वर्षे झाली?'

'व्हय.'–लोचनाचे ढिले, बेसावध उत्तर व तिच्या नवऱ्याच्या वकिलाची चौफेर विजयी नजर.

'तुमचा व किसनचा चार–पाच वर्षापासून सबंध आहे?'

लोचनाच्या तोंडातून शब्दच फुटेना. तो सर्व ताण तिला असह्य झाला. तिने आपले डोके दोन्ही हातानी गच्च धरले व ती पिंजऱ्यातच मटकन खाली बसली.

सत्य पुढे आल्यामुळे ती मुद्दाम हे सर्व नाटक करीत आहे अशा आविर्भावात तिचा नवरा व त्याचे वकील पहात होते.

'माझ्या पक्षकारास मानसिक धक्का बसलेला आहे. आज जबाब देण्याच्या परिस्थितीत ती नाही आजची सुनावणी तहकूब करावी.' –मी मॅजिस्ट्रेट साहेबांना विनती केली. मॅजिस्ट्रेट साहेब अनुभवी, समतोल वृत्तीचे होते. त्यानी उलट बाजूची हरकत फेटाळून पधरा दिवस सुनावणी तहकूब केली.

पुढील सुनावणीच्या दिवशी लोचना सकाळी माझ्या ऑफिसमध्ये आली ती थेट समोरच्या खुर्चीवर येऊन बसली. ऑफिसमध्ये बसलेल्या इतर पक्षकाराची तिने दखलसुद्धा घेतली नाही. तिच्या नजरेत व हालचालीत नवीनच आवेश, आत्मविश्वास व करारीपणा जाणवत होता पधरा दिवसापूर्वीच साक्षीदाराच्या पिंजऱ्यात कोसळणारी लोचना ती हीच का असा सभ्रम पडत होता.

'वकीलसाहेब, माझी अब्रू आता त्येनी चव्हाटयावर आणलीया आता मी भीत नाही. काय बी इचारू द्या त्येनी, समद्या लोकांपुढे माझी द्रौपदीवाणी बेअब्रू केली. आता मी बी त्याला सुखानं घास खाऊं देणार नाही. कसाबी त्याचा सूड उगवल्याबिगर रहाणार नाही'–खुर्चीवर पुरुषी थाटाने मांडा ठोकीत लोचना म्हणाली.

'बरं पण तुझ्या नवऱ्याच्या उत्पन्नाबद्दल एखादा साक्षीदार मिळेल का तुला?'

तिच्याच गावचा एक पक्षकार ऑफिसमध्ये बसला होता. त्याच्याकडे वळून लोचना आर्जवी नजरेने म्हणाली–

'अवं मास्तर, व्हा की तुमीच साक्षदार. समदं ठावं हायच तुम्हाला.'

'मला समद माहीत आहे. पण संपत लई तापट डोक्याचा हाय. मी विरुद्ध साक्षदार म्हणून मलाबी धोका करील तो.' मास्तरचे हिकमती उत्तर. मास्तर अशा सधीची वाटच पहात असावा. परतु चालून आलेल्या प्रसंगाचा पुरेपूर फायदा उठवण्यासाठी त्याने कावेबाज उत्तर दिले असावे.

'न्हाई म्हणु नका मास्तर. ह्यो उपकार करा माझ्यावर.' – सूडबुद्धीने हट्टाला पेटलेल्या लोचनाची याचना.

'तू एवढी म्हणतीस तर होतो साक्षदार. तसा मी बी भीत नाही.'

त्या हिकमती मास्तरबद्दल माझे मत काही चांगले नव्हते. लोचनाच्या खटल्यातील तारखाच्या दिवशी कोर्टात व माझ्या ऑफिसातही त्याची वर्दळ अधिक वाढली होती हे आता माझ्या ध्यानात आले. कावेबाज मास्तरच्या जाळ्यामध्ये ती अडकू नये म्हणून मी म्हटल–'ह्या केसमध्ये आपल्याला साक्षीदाराची फार गरज आहे असं नाही. साक्षीदार नसला तरी तुला पोटगी मिळेल. फक्त पोटगी किती मिळायची हा प्रश्न आहे. म्हणून साक्षदार नसला तरी काही फारसे बिघडणार नाही.'

'अशी झक्कास साक्ष देतो की, लोचना जितलीच पायजे' मास्तरही काही कच्च्या गुरुचा चेला नव्हता.

'व्हय. व्हयृ, वकीलसाहेब, घ्याच मास्तरची साक्ष त्या लोकास्नी वाटत असंल, मी एकली बाईमाणूस काय करणार. अरं पन म्हनावं खवळल्याली गाय बी हुदडून दिल्याबिगर न्हात न्हाई चागली जन्माची खोड मोडीन त्याची तवाच न्हाईन.'

कोर्टात पुढील उलटतपासणीचेवेळी लोचनाने बेडरपणाने व्यवस्थित उत्तरे दिली. मास्तरनेही तिला पोषक जबानी दिली. सपतने साक्षदाराची प्लटण उभी केली. आता लोचना गोपिकाबाईला बरोबर आणीत नसे. तिच्याबरोबर प्रत्येक तारखेला मास्तर येई. सपतचे काही साक्षदार मास्तरने फोडून तिच्यावरील आपला उपकाराचा बोजा अधिकच वाढविला. शेवटी खटल्याचा निकाल होऊन लोचनाला सपतने भरपूर पोटगी देण्याचा हुकुम झाला.

खटल्याचा निकाल झाल्यावर त्यादिवशी व नतरही कोर्टाच्या आवारात मास्तर व लोचना विजयी वीराप्रमाणे वावरत होते. एकमेकाच्या हातावर टाळ्या देऊन, चढ्या आवाजात बोलून ते संपतला हिणवीत होते. ती दोघेही हॉटेलात जाऊन बसत, पान खाऊन पचापचा थुकत.

पात्रसात चिमणी वळचणीला अंग चोरून बसते, तशी कोर्टाच्या आवारात स्वतःच्या स्त्रीत्वाला, संस्कृतीला, शीलाला जपणारी लोचनाची पूर्वीची आकृती माझ्या डोळ्यापुढे येत होती. कोर्टात मी केस जिंकली होती, परंतु नवीन वाऱ्यावर स्वत.ला झोकून दिलेली लोचना पाहून मला पराभूतपणाची भावना अस्वस्थ करीत होती.

निकालानतर पोटगीच्या वसुलीसाठी मास्तर व लोचनाची जोडी वारवार येत होती. मास्तरच्या मदतीमुळेच आपण खटला जिंकला अशी तिची मास्तरने समजूत करून दिली होती. मास्तरशिवाय तिचे पान हलेनासे झाले. नवऱ्याला चागली अद्दल घडवायची या लोचनाच्या सूडभावनेवर तो धूर्त माणूस सतत खुबीने फुंकर घालीत होता.

पोटगीची वसुली होण्यासही फार विलंब होऊ लागला वसुली वॉरंटे काही ना काही कारणामुळे परत येऊ लागली. हट्टाला पेटलेली लोचना मास्तरच्या सल्ल्यावरून पोलीस ठाण्यातही हेलपाटे घालू लागली. कित्येक वेळा माझ्या सल्ल्यापेक्षा मास्तरचा सल्ला तिला पटू लागला. एकेक विजय मिळवून

नवऱ्याला धडा शिकविण्याची नशा लोचनाला सतत पुढे ढकलीत होती. कोर्टातील कारकुन शिपाई पोलीस यांच्या सहवासाची तिला सवयच लागली. आपले काम झट्कन व परिणामकारकपणे व्हावे म्हणून लोचना आटापिटा करीत होती. त्यासाठी कोणतीही किंमत देण्याची तिची तयारी असावी. अलीकडे तिची राहणी चैनीची व भपकेबाज वाटत होती. बोलणे नाटकी व नखरेल होऊ लागले. घरापेक्षा कोर्टकचेरीत अधिक वेळ घालविणे तिला आवडू लागले. नवऱ्याकडे पोलीस नेऊन पोटगीची वसुली करताना तिला आसुरी आनंद होत होता.

संपतने मॅजिस्ट्रेटच्या निकालाविरुद्ध सेशन्स कोर्टात अपील केले. अपीलाची नोटीस घेऊन लोचना व मास्तर माझ्या ऑफिसात आले. जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन लॉजमध्ये राहून चैन करण्याच्या इराद्याने जिल्ह्याच्या ठिकाणी ती दोघे चालली होती हे ओळखायला मला वेळ लागला नाही.

मी लोचनाला म्हटले– 'तुला समक्ष जिल्हा कोर्टात जाण्याची जरुरी नाही. आपण पोस्टाने तिथल्या वकीलांच्याकडे काम पाठवू.'

'नाही पण. आपण समक्ष गेलेलं केव्हाही चांगलंच की –' चाणाक्ष मास्तराने आपले जाळे आवळले.

'पण तुम्ही दोघे असे तेथे गेलात म्हणजे ते दिसायलाही बरे दिसणार नाही. तुझा नवरा ह्या गोष्टीचा जास्तच फायदा घेईल.'

'वाघ म्हणलं तरी खातो. वाघोबा म्हणलं तरी खातो. किती बोंबलू द्या त्येला. आता मी न्हाई कशाची पर्वा करीत.' माझ्यासाठी गावातून आणलेली पेरूची करंडी माझ्यासमोर ठेवीत ती म्हणाली.

मी पुढे काही बोलण्याची वाट न पाहाताच त्या दोघांची उतावीळ पावले जिन्याच्या पायऱ्या उतरूनही गेली होती. नवीन वेगळ्या संस्कृतीचे वारे लागलेली लोचना मागे फिरायला तयार नव्हती. लोचनाने ठेवलेल्या पेरूच्या करंडीकडे मी पाहात होतो. लोचनाची ही जीत होती की हार होती, या विचाराचो वावटळ माझ्या सुन्न डोक्यात फिरत होती... □

---

# वेशीबाहेरचे एक पान

सुट्टीत यंदा गावाकडं जाता येणार नाही. नवशिक्षणाचा कोर्स आहे हे सांगावं, पाडव्याच्या पोळ्या खाव्यात, रातच्याला दोन पोळ्या घेऊन याव्यात या हिशेबानं गाव गाठलं.

मोटार अड्ड्यापासून घर कासराभर अंतरावर. घरापुढं गुढी उभी होतो; पण घराला कुलूप होतं. शेजाऱ्याकडनं समजलं. 'हिर–फोडायचं काम चालू हाय.'

आता वेशीबाहेरनं रानाकडली वाट. ऊन जाळत होतं. रानं भाजून गेल्याली पायवाटवर इस्तू पसरल्याला. शेत भेगानं चिरून गेल्यालं. रान जवळ आलं. खोपीत जाऊन पिशवी अडकवली. खोप दांडगी. जानकी म्हस बसल्याली उभी राहिली. ही देवीच्या नावानं सोडल्याली. दुधाला आटल्याली. इकायला बंदी असल्याली. मूठभर खपलीचं काड तिच्या समोर टाकली हिरीकडं गेलो.

वरनं बघितलं. हिर लई खोल. तळात पारा मारायचं काम चालू होतं पारीच्या आवाजानं लक्षात आलं, अजून कातळ आहे. साऱ्या हिरीच्या बुडात अजून वलावा नव्हता सगळंच कोरडं होतं. हिरीत उतरलो. पारी, टिकाव, खोरी, पाट्या थांबल्या. सारी बसली. कुणाचा तरी बटवा सुटला. तंबाखू मळला. चिमट दाढंजवळ सोडत म्हणाला, 'मास्तर तकडंबी दुष्काळ हाय का ?'

'आहे की. तो जवळ जवळ साऱ्या महाराष्ट्रात आहे.' मी म्हणालो.

'आवं. दुष्काळ आवंदा तुमच्याकडं दुष्काळ असल. इत तर पाच साल झालं दुष्काळ पडलाय.'

हे सुद्धा मला चांगलं ठाऊक आहे. काय बोलायचं म्हणून गप्प बसलो. मग घरचे बोलाय लागले 'पाणक्यानं सांगितलंय आणि दहा हात पार मारा पाणी जित्तं हाय, लागल.' काहीच बोललो नाही. असं कैक पाणक्यानी सांगितलं होतं. पाच वर्षे अपुरा पाऊस रानातच पाणी नाही. हिरीला कुठलं येणार ?

जमिनीचं दोन तुकडं. हिरीसाठी एक तुकडा इकला होता. भूविकासचं कर्ज. जनावराची दावण रिकामी झाली होती सारा पैका संपला होता गळ्यातला कवा न काढणारा चिताक आईनं घाणवट टाकायला दिला होता. सारं सारं केलंय पर पाणी नाही. म्हाताऱ्या वडलाना अजून वाटतंय. आमच्या हिरीला पाणी लागंल.

मी काय बोलणार ? शब्दाचा दुष्काळ झालाय नुसतं ऐकायचं. हू म्हणायचं वडलांच्याकडं बघून सहन करायचं. हिरीवर आलो खोपीत मातीची कळशी बघून तहान अधिकच लागली, कळशीवरचा मोगा घेतला. कळशी वाकडी केली. तसं वळवळ करत घागरीच्या बुडातनं साप आला. हातातला मोगा गळून पडला. मी तडक हिरीकडं गेलो. हिरीच्या काठावरनं साद घातली. 'कोणातरी वर या खोपीत लांबडं निघालंय.' तसं आमचे वयस्कर वडीलच वर यायला निघाले. बाकीचे कोण हिरीतनं वर येत नाहीत हे बघून आश्चर्य वाटलं.

मी पुनः ओरडलो 'आणि कोणतरी वर या' वडील पायऱ्या चढत चढत म्हणाले 'कोण नगं मी एकटाच येतो चल.' मला काहीच कळेना हे असं का ?

वडील धापा टाकत वर आले इचारलं 'कळशीखाली दिसलं नव्हं ?'

'व्हय, आता ते कुठं गेलंय कुणाला ठावं, आणि तुम्ही एकटेच वर आलात, बाकीचे का आले नाहीत ?'

'सांगतो चल लेका, लांबडं, कुठं बी जात नाही. ते आता म्हशीच्या मागं असल.'

'म्हंजे' मी म्हणालो.

'लेका, गेली चार महिनं झालं हिर फोडताना बिळातनं बाहिर पडलंय आणि खोपीत शिरलंय तवापासनं ते तथंच हाय मातीच्या कळशीतलं झिरपत्यालं पाणी पितंय आणि गारव्याला तथंच राहतंय... आता त्याला प्यायला पाणीसुद्धा नाही... झिरपत्यालं पाणी हाय म्हणून राहिलंय.'

'मग खातंय काय ?'

'काय खातंय, म्हशीच्या मागं शेण पडतंय, शेण वाळाय लागलं की किडं होत्यात तेच खातंय.'

'पण बाबा............'

'कसलं पण आणि बिन् लावलायस लेका, असल्या दुष्काळात एकाला दोन मुकी जित्रापं जगवल्याती ते काय थोडं झालं व्हय ? ह्योच आशीरवाद तुमासनी पोरानू'

दुष्काळाच्या भर उनात बाप नावाचा अखंड झरा मला न्हाऊ घालत होता.

घटकाभरानं नवशिक्षणाच्या कोर्ससाठी मी निरोप घेत होतो. वेशीच्या बाहेरच मन थंड झालं होतं.

बापू जाधव
किर्लोस्करवाडी

# माया तिवारीला न्याय मिळाला....

मुंबई हायकोर्टाच्या नागपूर बेंचच्या जज्ज श्री. मोहता आणि श्री. देव यांच्यासमोर माया आशिष तिवारीचा रिट अर्ज सुनावणीसाठी आला.

१९-८-८५ ला माया तिवारीने दाखल केलेल्या या अर्जावर कोर्टाने अंतिम निर्णय होईपर्यंत 'एक जागा राखीव' ठेवण्याचा आदेश महाराष्ट्र सरकार आणि सिव्हिल सर्जन, चंद्रपूर यांना दिला.

सिव्हिल सर्जन यांनीही मायाला अंतिम निकाल लागेपर्यंत ट्रेनिंग चालू ठेवायला उदारपणे (?) परवानगी दिली.

माया १९७९ मध्ये अेस्. अेस्. सी. झाली. फार बुद्धीमान नसली तरी इंग्रजी, सायन्स या विषयात ५० % गुण मिळवलेले.

तरीही पुढं शिकण्याचा प्रश्नच नव्हता. झालं हेच फार अशी स्थिती.

तिच्या 'दोनाचे चार' करण्याचीच घरच्यांना घाई.

१९८१ मध्ये आशिष तिवारीबरोबर तिचं लग्न झालं.

आशिष तिवारीला पोस्टात मेसेंजर म्हणून नोकरी.

दोन वर्षात माया एका मुलाची आई झाली.

चंद्रपूरच्या जिल्हा रुग्णालयाच्या नर्सेस ट्रेनिंग सेंटरद्वारा चालविल्या जाणाऱ्या परिचारिकेच्या ट्रेनिंग कोर्सच्या प्रवेशासाठी मायाने आपला अर्ज पाठवला. जाहिरातीतल्या विवाहित महिलांनी आपल्या अर्जासोबत त्यांच्या पतीची या कोर्सच्या प्रवेशासाठी परवानगी असल्याचा लेखी दाखला पाठवावा, या अटीनुसार मायाने आपल्या पतीची परवानगी असल्याचा दाखलाही अर्जासोबत पाठवला.

मुलाखत झाली, आवश्यक पात्रता असल्याने प्रवेशासाठी अडचण नव्हती. मायाची कोर्ससाठी निवड झाली.

१५-८-८५ ला हजर होण्यासाठी व नियमाप्रमाणे ३००० रु. बाँड करून देण्यासाठी मायाला चंद्रपूरला बोलविण्यात आले. दरम्यान तिचा पती आशिष तिवारी याचा विचार बदलला होता. मायाला आधी दिलेली लेखी परवानगी त्याने रद्द केली. सिव्हिल सर्जनना पत्र लिहून त्याने कळवले.

'कोर्स संपल्यावरच माया परत येणार असल्याने आणि या कोर्ससाठी मला व मुलाला सोडून जाणार असल्याने आमचे कौटुंबिक जीवन विस्कळीत होणार आहे. म्हणून तिला परवानगी देण्यात येवू नये.'

सिव्हिल सर्जन यांनी मायाला तिच्या पतीच्या पत्राची कल्पना दिली. आणि पतीचे 'ना हरकत' प्रतिज्ञापत्र दाखल केल्याशिवाय कोर्ससाठी परवानगी देण्यात येणार नाही असे बजावले.

आपल्यावरच्या अन्यायाची दाद मागण्यासाठी मायाने हायकोर्टाकडे धाव घेतली. महाराष्ट्र सरकार, सिव्हिल सर्जन चंद्रपूर आणि आशिष तिवारी यांना प्रतिवादी करण्यात आले.

कोर्ससाठी अर्ज केल्यानंतरच्या काळात मायाचे आणि पतीचे संबंध कौटुंबिक कलहामुळे ताणले गेले. पतीच्या असहनीय वाईट वागणुकीमुळ मायाला त्याच्याबरोबर जगणं असह्य झाल होतं.

मायाची ही तक्रार पती आशिषने नाकारली असली तरीही पतीबरोबरच्या तिच्या वैयक्तिक वादासाठी किंवा पतीने पुढं केलेल्या अन्य कोणत्याही कारणासाठी तिचा शिक्षणाचा, रोजगाराचा हक्क कसा नाकारला जाऊ शकतो? वेळ घालविण्यासाठी असू दे, किंवा आर्थिक उत्पन्न मिळावे म्हणून, गरज आहे म्हणून आर्थिक स्वावलंबनासाठी स्त्रीने नोकरी करायची ठरवली, स्वतःच्या पायावर उभं रहायचा निर्णय घेतला आणि नवऱ्याला हे मंजूर नसेल तर तो आडकाठी आणू शकतो ? केवळ तो नवरा आहे म्हणून? त्याच्या लहरीवर आयुष्य अवलंबून ? केवळ लिंगभेदामुळे हा जादा अधिकार पुरुषांना का म्हणून ?

अशा किती तरी प्रश्नांचा विचार कोर्टाला करावा लागणार होता.

दोन्ही बाजूच्या अटीतटीच्या युक्तीवादानंतर कोर्टाने फैसला सुनावला,

'केवळ नवरा-बायकोच्या दरम्यानची ही केस पूर्ण वैयक्तिक आहे आणि नवऱ्याने आधी संमती दिल्यानतर ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

अर्थात त्याच्याशी संस्थेचा, काम देणाऱ्याचा काहीच संबंध नाही.

वैवाहिक आयुष्यात असे न टाळता येणारे ताण-तणाव निर्माण होत राहाणारच. केवळ यामुळे किंवा या शक्यतेमुळे कोणाचाही मूलभूत हक्क डावलता येणार नाही.

स्त्रियांनी शिकून आर्थिकदृष्टया स्वतःच्या पायावर उभे रहायला हवे.

आजच्या सामाजिक समस्यांवर अनेक उपायांपैकी तो एक उपाय आहे.

त्यासाठी त्यांना उत्तेजन द्यायला हवे. घटनेने स्त्रिया, मुले, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासलेल्यांची विशेष दखल घेतली आहे.

सरकारने यासाठी विशेष प्रयत्न करावेत अशी अपेक्षा आहे.

घटनेने समानतेची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे घालून दिलेली आहेत—

तेव्हा माया तिवारी यांना पुन्हा संमतीपत्र दाखल करावयास सांगणे एवढीच गैरबाब नाही तर जाहिरातीत अशी अट घालणे हीच समानतेच्या मूलभूत हक्कावर आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालणारी बाब आहे.

माया तिवारीला पूर्ववत ट्रेनिंग कोर्ससाठी परवानगी देऊन आणि जाहिरातीतली ही अट रद्द ठरविण्याचा आदेश कोर्टाने दिला.

माया तिवारीला न्याय मिळाला.

तिने तो मिळवला.

घटनेने दिलेली संधी प्रत्यक्षात कशी मिळणार ?

घटनेचे पालन कुणी करायचे ?

आणि ज्याने करायचे तोच अडवू लागला तर ?

अशी अडवणूक झाली तर झगडण्याचं बळ प्रत्येकात कोठून येणार ?

की अपरिहार्य म्हणून अशांनी गपगुमान सामोरं जायचं ?

—विनय गुणे
संगमनेर

# नमनाला घडाभर आणि जन्तेचा पाय फाटक्यात !

डॉ. अनिल सहस्रबुद्धे, नगर

'उर्ध्व प्रवरा प्रकल्प' – 'निळवंडे धरण' नामक प्रकल्पाचे गेली तब्बल दहा–अकरा वर्षे 'भिजत पडलेले घोंगडे' मा. मुख्यमंत्री श्री शंकररावजी चव्हाण आसनाधिष्ठित होताच, वादाच्या डबक्यातून (राजकारणातील स्वार्थवाद) बाहेर निघून पुन्हा एकदा वापरण्यासाठी काढले खरे ! 'उद्यापासून 'निळवंडे धरणा'च्या कामाला (पूर्वीचे 'म्हाळादेवी') सुरवात होईल !' अशी भविष्यकालीन ऐतिहासिक घोषणा सी. एम साहेबानी केली आणि आम्हाला अगदी बरे वाटले; मोकळे मोकळे वाटले !

बरे आणि मोकळेमोकळे वाटले अशा करिता की, गेली अकरा वर्षे 'म्हाळादेवी की निळवंडे की डिंगबर', पुढे 'म्हाळादेवी की निळवंडे', त्यापुढे फक्त 'निळवंडे' या वरील वादात खर्ची पडलेल्या नऊसाडेनऊ मुख्यमंत्री, सुमारे तितकेच पाटबंधारेमंत्री, सुमारे चारशेवर मंत्री, कित्येक गल्लीपासून दिल्लीपर्यंतचे पुढारी आणि त्यामध्ये सर्वाधिक महत्त्वाचे म्हणजे खर्ची पडलेला 'जन्तेचा' खुर्दा, आम्ही याचि देही याची डोळा पाहताना गुदमरून गेलो होतो.

'उर्ध्व प्रवरा प्रकल्प' होणे आवश्यक आहे. कॅचमेंट एरिया आणि धरण बांधकाम यात नुकसान पोहचणाऱ्या लोकांचे पुनर्वसन होणे आणि तेही योग्यरीतीने, हे आम्हास मान्य आहे. परंतु केवळ स्वतःच्या मतदार संघात लाभ क्षेत्र किती, ह्यासाठी चाललेली रस्सीखेच तब्बल तपभर चालावी ? 'उर्ध्व प्रवरा प्रकल्प' योजना ब्रिटिश कालातील तज्ञानीच खरे तर सुचविलेली. म्हणजे सुचवून अर्धशतक तरी झाले– (म्हाळादेवी डॅम) एवढा पूर्वसूचित प्रकल्प असून तो इतके दिवस लोळत घोळत पडावा ? हा लोकशाहीचा परिणाम म्हणायचा की स्वार्थप्रणित पुढशाहीचा ? आज या क्षणालासुद्धा एक आमदार महोदय 'निळवंडे धरण होऊ देणार नाही !' असे म्हणत शड्डू ठोकून उभे आहेतच.

अशाप्रकारे वाजतगाजत होणारा 'उर्ध्व प्रवरा प्रकल्प' हा त्याच्या नशिबाने केव्हा व्हायचा तो होईल; पण त्या निमित्ताने घडलेल्या आणि घडत असलेल्या एका विचित्र प्रकाराकडे आम्हाला सर्वांचे लक्ष वेधावेसे वाटते. शासन प्रकल्प करणारच याची खात्री सुरुवातीपासूनच धरणग्रस्ताना पटली म्हणून त्यानी 'आधी पुनर्वसन आणि मग धरण' अशी स्लोगन देत आदोलनाला सुरवात केली. मागणी रास्त आहे याबद्दल कोणाचेही दुमत होण्याचे कारण आम्हाला दिसत नाही या गोष्टीचा फायदा धरण लावणीवर टाकायला पुढाऱ्यानी घेतला ही गोष्ट सर्वज्ञात आहेच. तर या पुनर्वसन प्रकरणाकडे आम्हाला लक्ष वेधायचे आहे.

पुनर्वसनात एकूण तीन प्रकार अपेक्षित आहेत.

१) जी गावे उठतील किंवा वस्त्या उठतील किंवा कुटुंब उठतील त्याना दुसरीकडे वसतीसाठी पर्यायी जागा देण

२) ज्याना पर्यायी जमिनी हव्या असतील त्याना त्या तोलामोलाच्या जमिनी देणं (योग्य जमीन).

३) ज्याना पर्यायी जमिनी नको असतील त्यांना दिनमानाप्रमाणे योग्य व्यवहार्य अशी जमिनीची किंमत देण.

याशिवाय त्यातील लोक, जे दुय्यम धंदा म्हणून मजुरी करनात, त्याना त्यांच्या योग्यतेनुसार नोकरी, रोजगार उपलब्ध करून देण.

आता यात गैर असे काहीच नाही. शासनाची भूमिका पाहिली तर १९७६ पूर्वी असा पुनर्वसन कायदा अस्तित्वातच नव्हता त्यात १९७६ साली अस्तित्वात आलेल्या कायद्याची अमलबजावणी मजुरी सप्टेंबर १९८१ मध्ये झाली. म्हणजे १९७६ पूर्वी आवश्यक त्या जमिनी सरकारी सार्वजनिक कामासाठी ताब्यात घ्यायच्या– १८९४ च्या लॅंड ॲक्विझेशन कायद्याखाली आणि सरकारला योग्य वाटते अशी त्या जमिनीची कमीत कमी किंमत मालकाला देऊन मोकळे करायचे. आज स्वरूप फारसे वेगळे आहे असे नाही. आज १) तीन ते पाच वर्षातील परिसरातील खरेदीविक्री व्यवहारातील किंमतीची सरासरी काढून जमिनीच्या मगदुराप्रमाणे तिची किंमत ठरवून किंमत मालकाला देऊन टाकायची. २) पाच एकरपर्यंत तशा प्रकारची पर्यायी जमीन त्याला द्यायची ती कुठे द्यायची ते शासनाने ठरवायचे ३) त्याची राहण्याची सोय करायची असेल तर त्याला शासनाने ठरविलेल्या एकाच डिझाइनच्या मर्यादित किंमतीच्या घरात रहावे लागणार. तेवढे गावठाण त्याच्या वसतीसाठी देणार

सकृद्दर्शनी न्याय्य वाटणारी ही गोष्ट धरणग्रस्ताना किती नुकसानीत आणणारी आहे पहा १) येथील परिसराचा विचार करता लोकानी येनकेन प्रकारेण आपल्या जमिनी बहुताशी बागायती केल्या आहेत. जवळजवळ सर्व जमिनी चागल्या आहेत येथे अशा बागायती जमिनीचा बाजार एकरी चाळीस ते साठ हजार, किंबहुना काही वेळा जास्तच आहे. परंतु खरेदीची कागदपत्र करताना लोक अनेक वेळा खऱ्या किंमतीचा दस्तऐवज ( स्टॅंप ) करीतच नाहीत असे ऐकतो (आता या गोष्टीला लेखी स्वरूपात वा जाबजबाबाने पुरावा मिळणार नाही हे खरे, परतु ही वस्तुस्थिती आहे ) त्यामुळे प्रत्यक्ष जमिनीचे आज व्यवहार केले असते तर ज्या जमिनीची किंमत एकरी चाळीस हजार आली असती तिची किंमत सरकार नऊ ते अकरा हजाराएवढी देणार. म्हणजे पहिल्याच फटक्यास एकरी पचवीस तीस हजार रुपयांना फटका ! २) शिवाय सिलींग कायद्याचा बडगा आहेच. आणि १९७६

पासूनच परिसरातील खरेदीविक्री आणि खातेफोड प्रकार बद केलेले आहेत. त्यामुळे त्यातून होणारे प्रचड नुकसान ३) परिसरात ऊसाची लागवड करणारे आहेत. उत्तम जमीन, ऊसाचा पैसा. त्यामुळे घरदारं चागली केलेली, बांधवदिस्तीतही भरपूर पैसा ओतलेला. ते सगळे 'शासनार्पणमस्तु' म्हणून, शासन सागेल तेथे वसतीला जायचे

एकूण काय तर पुनर्वसन होत असताना 'आवळा देऊन भोपळा घेण्याचा' उद्योग होणार हे धरणग्रस्ताना दिसते आहे त्यामुळे ते पुन्हा धरण होऊ द्यायचे नाही या पवित्र्यात आहेतच ! समजा 'सत्तेपुढे शहाणपण चालत नाही' या हिशेबानेच पुनर्वसन करून घ्यावे लागत असेल तर अकोले आणि सगमनेर तालुक्यातल्याच जमिनी किंवा गावे पुनर्वसनासाठी मिळावी अशी त्याची रास्त मागणी आहे आणि शासनाने ती पुरवायला पाहिजे.

सुदैवाने मा. शकररावजी काळे याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली आहे ह्या समितीची एक बैठक झाली आणि त्यात वरील गोष्टीचा विचार सहानुभूतीपूर्वक झाला. आता समितीची दुसरी सभा अकोले मुक्कामी होईल. नगर जिल्ह्यातील पुढील मडळी समितीत असल्यामुळे आणि त्यात मा. आ. पिचड, मा दशरथ सावत हे अकोले तालुक्यातील दोन वाघ त्या समितीत असल्याने ते जास्तीत जास्त न्याय मिळविण्याचा प्रयत्न करतीलही परतु उपरोक्त क्र. १ मध्ये होणारे नुकसान ते भरून काढणे शक्य नाही हे आजच उघड आहे.

## दाने दाने पर

आता एका दुसऱ्या मुद्याकडे आम्हाला लक्ष वेधावेसे वाटते. अकोले, सगमनेर, श्रीरामपूर आणि कोपरगाव या तालुक्यांमधील पुनर्वसनासाठी आवश्यक वाटणारी जमीन ताब्यात घेण्यासाठी, सिलींग कायद्याचा विचार करून आठ एकरपेक्षा जास्त जमीन १९७८ पूर्वी ज्या व्यक्तीच्या नावावर आहे अशा जमीन मालकाच्या जमिनीपैकी कोणाची दोन एकर, कोणाची चार एकर अशा जमिनी पुनर्वसनासाठी घेणार असल्याबद्दलच्या नोटिसा पचवीस एप्रिलपूर्वी बजावण्यात आल्या. आता ह्या जमिनी अर्थातच वर उल्लेखित, सरकारला योग्य वाटणारी जमिनीची योग्य किंमत देऊन ताब्यात घेतल्या जाणार म्हणजे सध्या त्या धरणग्रस्ताची सोय लावण्यासाठी असे आणखी 'धरणग्रस्त' लोक तयार झाले आहेत. या 'धरणग्रस्ता'च्या बाबतीतील गमती अशा की, १९७८ साली ज्याच्या नावावर जमिनी होत्या त्यातील कोणी स्वर्गवासी झालेले, कोणी त्या जमिनीचो खातेफोड करून नोंदी केलेल्या, कोणी त्या जमिनी लोकाना विकून टाकलेल्या. कोणी नॉन अॅग्री. करून तेथे घरे बांधलेली, काहीच्या जमिनीवर तीन तीन चार चार व्यवहार होऊन त्या हस्तातरीत झालेल्या आता त्यात पचवीस मे पूर्वी; ज्या जमीन मालकाना जमिनी देणे मान्य नसेल त्यानी अपील करायचे होते. कोण सुखासुखी आपली जमीन देईल ? त्यामुळे अपिले लिहिण्याचा सपाट सुरू झाला. त्यात वकीलमडळी आणि रेव्हेन्यूमधील काही अनुभवी मडळी अशी अपिले लिहिण्यासाठी सरसावली. या अपील लेखनाचा आणि सादर करण्याचा भाव फुटला, एकरी एक हजार रुपये सुमारे दोन ते अडीच हजार एकर जमिनीना अशा नोटिसा लागलेल्या आहेत. म्हणजे धरणग्रस्ताना पुढे जमिनीची शासनाच्या 'योग्य किंमत धोरणा' मुळे मुळात किमत अल्प मिळणार, त्यातला लोण्याचा गोळा मधल्यामधे वकिलाच्या मुखात गेला ! 'दाने दाने पर लिखा है खानेवाले नाम' हेच खरे !

आता आणखी एका मुद्याकडे आम्हाला लक्ष वेधायचे आहे. अकरा वर्षांपूर्वी, उर्ध्व-प्रवरा प्रकल्प' करायचे ठरविले आणि तेव्हापासूनच पूर्ण एक डिव्हिजन एवढी तंत्रज्ञ, कर्मचारी याची तुकडी सगमनेर आणि अकोले मुक्कामी डेरेदाखल झाली आणि त्याच वेळेपासून उपरोक्त वादाना सुरुवात झाली. त्यामुळे त्या लोकाना थोडीशी धावपळ, बराच आराम आणि पुष्कळ करमणूक वाट्याला आली 'आपण शाततावादी आहोत त्यामुळे आपल्याला युद्ध करावं लागणार नाही, त्यामुळे सैनिकाना खेळणी बनविण्यास हरकत नाही' असे म्हणण्यापैकीच प्रकार घडला त्यातील काही लोकाना चारपाच वर्षे वाट पाहूनही येथाल काम सुरू होत नाही, असे पाहून अन्य प्रकल्पावर पाठवावे लागले अशा सर्व प्रकारामध्ये निळवंडे प्रकल्पासाठी आणलेल्या या डिव्हिजनवर पगार, कॉलनी, गोडाऊन्स, वर्कशेडस् करण्यात अतोनात पैसा खर्च झाला. निळवंडे धरण झालेच नाही ! शिवाय त्यावेळच्या प्लॅन एस्टिमेटप्रमाणे लागणारा खर्च आणि आज किंवा इथून पुढे लागणारा खर्च यात अनेक पटीनी वाढ झाली एव्हढे होऊन आम्हाला अजूनही इतिहास लक्षात घेता धरण होईल असे वाटत नाही.

गेल्या दहा वर्षांच्या काळात अकोले तालुक्यात नदी किनारी असलेल्या गावातील लोक गप्प बसलेले नाहीत त्यानी लक्षावधी रुपयाच्या लिफ्टयोजना नदीच्या पाण्यावर मजूर करून घेतल्या, सुरू केल्या ( काहीतर अनधिकृत आहेत असे बोलले जाते) त्याना धरणाचा काही उपयोग नाही. त्यात अकोले तालुक्याचाच विचार केला तर नित्याप्रमाणे अकोले तालुका 'सवतीचं पोर'च ठरतो. धरणग्रस्त होऊन नुकसान पोचणाऱ्या गावाची सख्या एकूण नऊ आणि याच तालुक्यात लाभक्षेत्र म्हणून फायदा मिळवणाऱ्या गावाची सख्या दहा, म्हणजेच विचार केला तर अकोले तालुक्याचा तोटाच तोटा ! 'तालुक्यापेक्षा देश मोठा आहे !' हे आम्हाला मान्य आहे, परंतु होणाऱ्या नुकसानीचा न्याय्य दृष्टिकोनातून विचार होणार की नाही ? अशा परिस्थितीत लाभक्षेत्रातील लोकानी पुनर्वसनासाठी केलेल्या सूचना जरूरी वाटणे साहजिकच आहे,

केवळ स्थानिक पातळीवरून पायापुरता विचार करणाऱ्या पुढाऱ्याच्या कारवायामुळे अकरा वर्षे केवळ कागदावर असलेल्या धरणाने किती बाजूनी सार्वजनिक पैशाची चक्क उधळण केली आहे हे ध्यानी येऊ शकेल. त्यात या पुढाऱ्याचे, मत्र्याचे दौरे, बैठका, भेटीगाठी यात खर्च झालेला पैसा लक्षात घेतला पाहिजे; म्हणजे जनतेचे केवढे नुकसान झाले हे ध्यानी येईल. खर्च होणारा प्रत्येक पैसा जनतेचा आहे, आणि तो जनकल्याणासाठी योग्य तऱ्हेने उपयोगी आला पाहिजे, हे लोकशाहीचे गमक म्हटले, तर आम्ही कोठे आहोत ?

ज्याचे पुनर्वसन करावयाचे त्याचे पैसाही नुकसान होता कामा नये, असे आमचे स्पष्ट मत आहे. आणि तसे खरेतर शक्यही असते. कोणताही प्रकल्प राबविताना हे ध्यानात

ठेवले पाहिजे. आता वेळ निघून गेलेली आहे. अशा परिस्थितीत नुकसान केवळ धरण-ग्रस्तांच्या माथी मारता कामा नये. झळ पोचणार असेल तर ती समान प्रमाणात सर्व नागरिकांना पोचली पाहिजे. त्याला इलाज नाही ! कारण जनतेच्या पैशाची अशी फाजीलपणाच्या वादात उधळण होत असताना जनता शांत बसली आहे !

वास्तविक तंत्रज्ञ आणि कर्मचारी यांना रिकामपणे पोसण्यात खर्च झालेला पैसा,वाढलेल्या किंमतीमुळे एस्टिमेटमध्ये झालेली वाढ वाद माजविण्यात झालेला खर्च या सगळ्याचा विचार केला तर, पुनर्वसन तर विना नुकसान झाले असतेच, शिवाय नव्या ठिकाणी वसतीसाठी गेल्यामुळे पुनर्वसितांना वर काही अनुदानसुद्धा देता आले असते. शिवाय धरणाची किंमतही वाढत गेली नसती. पण नमनाला घडाभर तेल ओतून अंधारात गोंधळ घालणाऱ्या पुढाऱ्यांच्या तालावर 'जन्तेला' नाचायची सवय लागलीये. त्यामुळे जन्तेचा पाय फाटक्यातच जाणार असे आम्हास वाटते.

झालेल्या नुकसानीला आणि होणाऱ्या नुकसानीला जनता आणि जनतेचे नेते जबाबदार असल्याने आता धरणग्रस्त आणि धरणत्रस्त यांच्या सर्व प्रकारे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे असे आमचे मत आहे. धरणग्रस्त आणि धरणत्रस्त यांना एकाकी पाडून त्यांना व्यक्तिगत पातळीवर झुंज देत बसावी लागू नये. नाहीतर आमच्याच राज्यात आम्हाला 'अंधेर नगरीत' जगल्यासारखे वाटेल.

□

---

## पुस्तके

# अक्षरहास्य : चिं. वि. जोशी

**म**राठी साहित्यावर ज्यांनी हसरे मुखवटे चढवले, त्यात गडकरी–कोल्हटकरांच्या बरोबरीनं चिं. वि. जोशी यांचं नाव घेतलं जातं. गडकरी–कोल्हटकरांच्या विनोदाची जातकुळी जवळ जवळ सारखी, काहीशी आक्रमक पण चिं. विं. ची त्याहून पूर्ण वेगळी ! जोश्यांनी महाराष्ट्राला निर्मळ विनोद दिला. स्वतःवर विनोद करणं हे प्रगल्भ विनोदाचं लक्षण मानलं तर ते प्रथम चिं. वि. जोशींनी केलं हे मान्य करावं लागेल. महाराष्ट्रानं चिमणराव या जोश्यांच्या वाङ्मय पुत्रावर मनापासून प्रेम केलं. हा चिमणराव म्हणजे स्वतः जोश्यांचाच वाङ्मयीन अवतार. या चिमणरावाला म्हणजे एका अर्थानं जोश्यांनी स्वतःलाच विनोदाचं लक्ष्य बनवलं. त्यांचा सोज्वळ विनोद आजही ताजा टवटवीत वाटतो. कारण चिमणराव ज्या परिस्थितीत वावरतो, ती परिस्थिती थोड्याफार फरकाने आजही कायम आहे. जरी ती बदलली, तरी त्यातली मानवी स्वभाव वैशिष्ट्येही शाश्वत आहेत. म्हणूनच चिं. विं. ची चिमणराव, गुंड्याभाऊ, काऊ, ही पात्रं अजरामर झाली आहेत.

या पात्रांचा जन्मदाता, त्या पात्रांचा जन्म आणि चिं. विं. च्या एकूण वाङ्मयामागची प्रेरणा याबद्दलचं कुतूहल या पुस्तकामुळे पूर्ण होतं.

चिं. विं. चे वडील पत्रकार. पत्रकारिता त्या काळात एक व्रत म्हणून आचरलं जायचं. वडिलांकडे अभिप्रायासाठी काही पुस्तकं येत. चिं. वि. ती पुस्तकं सगळी वाचून काढत. त्यातून वाचनाची गोडी वाढीस लागली. शाळेत 'हुषार' म्हणून नव्हे, तर मार्मिक विनोद करणारा म्हणून त्यांची ख्याती होती. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी अध्यापकी केली. पाली भाषेचाही त्यांनी अभ्यास केला होता. त्यांच्या लिखाणाला तशी सुरुवात महाविद्यालयात असतानाच झाली. त्यांनी 'एका विद्यार्थ्याची रोजनिशी' लिहिली. त्यातून अभावितपणेच 'चिमणराव'चा जन्म झाला. त्यांचं उपलब्ध वाङ्मय पाहिलं तर त्यातल्या विविधतेनं आश्चर्य वाटतं. वीस विनोदी पुस्तक, सहा बालवाङ्मयाची पुस्तकं, चरित्र, निबंध, रूपक, स्थलवर्णनं, नाटकं, अभंग अशी विविध ग्रंथरचना त्यांनी केली. शिवाय ऐतिहासिक पत्रांचे नऊ खंड आणि पालीचे तीन खंड संपादित केले. बौद्ध धर्मविषयक गंभीर लिखाण आणि विनोदी लिखाण अशा दोन्ही विरोधी आघाड्या त्यांनी सांभाळल्या.

तत्त्वनिष्ठा आणि सौजन्य या दोन गुणांचं मोल त्यांनी नेहमी जाणलं आणि ते गुण आयुष्यभर जोपासले त्यांनी आपल्या विनोदाची उभारणी वास्तव जीवनावर केली. विनोदाला बुद्धीची जोड लागते ही त्यांची धारणा होती आणि विनोदबुद्धीचा मार्मिकपणा कशात आहे ? तर ज्या मापाने आपण इतरांना मोजतो, त्याच मापाने स्वतःला मोजायच ! चिं. वि. उपरोध आणि उपहासापेक्षा परिहासाचेच पुरस्कर्ते आहेत. परिहास हे सहयोगी हास्य असते. चिं. वि. नी केवळ विनोदच केला नाही, तर विनोदाची तात्त्विक चर्चा करून विनोदाच्या इतिहासाचा आढावाही घेतला आहे.

विनोदाच्या क्षेत्रात चिं. विं. चं स्थान निश्चित करण्यासाठी विद्युल्लता वैद्य यांनी संपूर्ण विनोदाचा प्रांतच प्रथमपासून तपासून पाहिला आहे. अगदी संस्कृत साहित्यातसुद्धा विदूषक हे पात्र विनोद निर्मितीसाठी असायचं असं सांगून प्राचीन मराठी वाङ्मयात, अगदी संतकाव्यातसुद्धा, ज्ञानेश्वर, तुकाराम, मुक्तेश्वर यांचा विनोद त्या उकलून दाखवतात. इंग्रज अंमलातल्या लिखाणातही श्री. कृ. कोल्हटकर, शि. म. परांजपे, आगरकर, टिळक यांचा उपरोध-उपहास उठून दिसतो. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी मात्र मराठी वाङ्मयात विनोदाला स्वतंत्र स्थान मिळवून दिलं.

चिं. विं च्या समकालीन शामराव ओक, ना. धों. ताम्हणकर, डॉ. वर्टी, वि. वि. बोकील हे होते. शिवाय अत्र्यांसारखा विनोदाचा धबधबा होताच ! 'एरंडाचे गुऱ्हाळ' ही चिं. विं. च्या विनोदी लेखनाची सुरुवात.

यातले बहुतेक विषय साहित्यक्षेत्राशी सबंधित आहेत. प्रारंभीचा हा काल उपहास आणि विडंबनाकडेच दिसतो आणि लिखाणावर कोल्हटकराचा प्रभाव जाणवतो. चिं वि. चे मुळात व्यक्तिमत्त्व गंभीर प्रकृतीचे आहे. म्हणूनच की काय त्याचा विनोद खदखदून हसवणारा नाही. तो सौम्य आहे जीवनाच्या अखेरपर्यंत विनोदाला समांतर असा त्याचा गंभीर आणि चिंतनशील लिखाणाचा प्रवाह होताच. हा प्रवाह डावलून चिं. वि. चा विचार केला तर फार मोठी उणीव राहून जाईल असं लेखिकेनं आवर्जून म्हटलं आहे.

चिमणरावाचं जनकत्व त्याना कसं लाभलं? समाजाचं निरीक्षण करताना, त्यातल्या विसंगती टिपताना त्याच्या डोळ्यासमोर पांढरपेशा मध्यमवर्ग होता. चिं. वि. देखील याच वर्गाचे प्रतिनिधी होते. पु ल देशपांडे म्हणतात, आपण सारे चिमणरावच असतो! या उद्‌गारात मोठं मर्म आहे. सामान्य माणसाच्या अंगी असणारे सगळे गुणावगुण चिमणरावात आहेत. त्याच्यावर येणारे प्रसंग, त्यानं ओढवून घेतलेली संकट, त्याच्या इच्छा—आकांक्षा सगळं सामान्यच आहे या चिमणरावाचं नेमकं शब्दचित्र लेखिकेन रंगवलं आहे. 'चिमणराव एक साधासुधा माणूस. काळाच्याही पुढे धावणारा. तो सुधारक नाही आणि सनातनीही नाही. तो लक्ष्मीपुत्र नाही, तसाच घाम गाळणारा श्रमिकही नाही त्याला सर्व गोष्टींची अतोनात हौस आहे कोणतेही वैशिष्ट्य नसलेला तो नायक आहे. पण कोणतेही वैशिष्ट्य नसणं हेच त्याचं वैशिष्ट्य! तो घरगुती, अघळपघळ अस्ताव्यस्त आहे त्याची हजरजबाबी वृत्ती सतत जागृत आहे. स्वभावं निरूपद्रवी, भावनाप्रधान आणि सोशिक. त्याचं सरळमार्गी सामान्य आयुष्य त्याला कधीकधी कंटाळवाण वाटतं. कोणी त्रास दिलाच तर तो सामर्थ्यानुसार प्रतिकार करतो.'

या चिमणरावाच्या माध्यमातून जोश्यानी समाजातली व्यंगं, ढोंग याची चांगली हजेरी घेतली आहे. चिमणरावाचं चऱ्हाट, आणखी चिमणराव, तिसऱ्यांदा चिमणराव आणि चौथे चिमणराव या चार पुस्तकामधून चिं. वि. नी चिमणराव उभा केला आहे. या व्यक्तिरेखेचा लेखिकेन विस्तृत आणि अभ्यासपूर्ण परामर्ष घेतला आहे.

गुंड्याभाऊ ही सहाय्यक व्यक्तिरेखा. किंबहुना गुंड्याभाऊ चिमणरावाचं व्यक्तिमत्त्व अधिक आकर्षक बनवतो. दुसऱ्याशिवाय पहिला अपूर्णच वाटतो. अंगापिंडान मजबूत, हातात सदैव सोटा, आईविना आणि ब्रह्मचारी तोही जरासा भाबडा, व्यवहाराचा पोच नसलेला असाच आहे

चिं. वि. च कथाविश्वही मोठं आहे विनोदी, अद्‌भुत, रहस्य, विडंबन, चातुर्य, करूण अशा प्रकारच्या सगळ्या कथा त्यानी लिहिल्या

सर्वात महत्त्वाच म्हणजे चिं. वि. च्या विनोदाच मूल्यमापन. ते लेखिकेन अतिशय संयमानं केलं आहे. निर्मळ, निर्भेळ आणि वास्तवाधिष्ठित विनोद त्यांनी मराठीला दिला. त्यानी चिमणरावाला म्हणजे पर्यायाने स्वतःलाच हास्यविषय बनवल्यामुळे कोल्हटकर—गडकरी याच्याप्रमाणे त्याच्यावर टीका झाली नाही. कोल्हटकराचा हेतू समाजसुधारणेचा होता. पण अतिरिक्त कल्पनाविलासामुळे तो कितपत साध्य झाला, शंकाच आहे. गडकऱ्यांचा हेतू मनोरंजनाचा असला तरी अतिशयोक्ती, कल्पनाचमत्कृती आणि शाब्दिक कोटयांमुळे तो विनोद फार पुस्तकी वाटतो या पार्श्वभूमीवर चिं. वि. चा साधा सरळ विनोद फार उठून दिसतो.

वास्तवाचा आधार असलेलं मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवन प्रथम चिं. वि नीच रंगवलं. विनोद निर्माण होण्यासाठी काही विकृती किंवा वेगळी परिस्थिती लागते असं नव्हे, तर सामान्य परिस्थिती, सामान्य माणूसही विनोदाचा जनक असू शकतो हे त्यांनी सिद्ध केलं. त्यानी उपहासाकडून मराठी वाङ्मयाला परिहासाकडं नेलं ही त्यांची मोठी देणगी.

विनोद आणि कारूण्य यांचं त्यांनी कधी मिश्रण केलं नाही. सरळ सरळ करूणकथा लिहिल्या. विनोदी कथेला मात्र त्यानी स्वतःचा वेगळा आकार दिला. याआधीच्या विनोदकारांनी विनोदासाठी लेखांचा वापर केला. पण चिं. वि. असे होते की, ज्यानी विनोदासाठी कथा लिहिल्या. पहिली विनोदी कथा कॅ. लिमये यांनी लिहिली. ते विनोदी कथेचे जनक तर जोशी तिला पूर्णत्वाला नेणारे. जोश्यांच्या आधीचो विनोदी पात्रं— सुदाम, बंडूनाना, बाळकराम, दाजी हे मूर्खपणा, विक्षिप्तपणा अशा गुणानी युक्त होते. चिं वि. चा चिमणराव भाबडेपणामुळे लोकप्रिय झाला तो हास्यकारक प्रसंगाची मालिकाच (खरं म्हणजे गोंधळ) निर्माण करतो. त्याच्या स्वभावात कडवटपणा अजिबात नाही. त्यामुळे तो इतराना दुखवत नाही. कोणालाही न दुखवता केलेला विनोद मराठी वाङ्मयाला नवीन होता. उपरोध, उपहास, शाब्दिक कोटया, सूक्ष्म टीका, टोमणे, चुटके, वक्रोक्ती या पूर्वप्रस्थापित मार्गांचा आधार न घेता चिं. वि नी आपला विनोद वेगळ्याच मार्गावरून नेला.

स्वतःची फजिती स्वतःच मजेन अनुभवणं ही गोष्ट त्यानी शिकवली. यासाठी चिमणरावाकरिता विविध सिच्युएशन्स तयार करण्यात ते कुठही कमी पडले नाहीत. अशा कल्पक सिच्युएशन्स निर्माण करणं, त्याही दरवेळी वेगळ्या, त्यामुळे साचेबंदपणा टाळणं, शिवाय हे करत असताना पात्राचे ठरलेले स्वभाव जपण ही कौशल्यं चिं. वि.नी सहज पार पाडली.

अक्षरहास्य . चिं. वि. जोशी
लेखिका · विद्युल्लता वैद्य
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पृष्ठे : २८४, किंमत : ३५ रुपये

# अभयारण्य

कै. नरहर कुरुंदकर यांच्या असंकलित साहित्याची सात पुस्तकं प्रकाशित करण्याचा संकल्प नरहर कुरुंदकर साहित्य प्रकाशन संस्थेनं सोडला आहे. त्यातलं हे पहिलं पुस्तक. कुरुंदकरांच्या मृत्यूनंतरही त्याची सात पुस्तकं निघू शकतात त्यावरून या विद्वानाच्या व्यासंगाची आणि लिखाणाची कल्पना यावी. त्याचं लिखाण नेहमीच विचारपरिप्लुत असतं. या पुस्तकात निरनिराळ्या मासिकामधून प्रसिद्ध झालेले त्याचे लेख आणि निमित्तवशात् त्यानी दिलेली भाषण याचा समावेश आहे.

कोणताही विषय कुरुंदकरांच्या आवाक्याबाहेरचा नव्हता. ते मनुस्मृतीवर अधिकारवाणीनं बोलत, तसंच बिहारमधल्या वेठबिगारी आणि गुलामीवर बोलता बोलता बुद्ध महावीरापासून बिहारचा सगळा इति-

ह्रास जिवत करत. समीक्षा आणि कलामूल्यं हा तर त्याचा खास विषय. समाजवादावर बोलायला जशी त्याना तयारीची गरज लागली नाही, तशी नाट्यशास्त्रावर बोलायलाही लागली नाही. ज्ञानेश्वरीच रसाळ विवेचन एक दिवस ऐकाव तर दुसऱ्यादिवशी ते स्त्रीमुक्ती या विषयाचा चारी बाजूनी फडशा पाडताना दिसायचे! नवोदित कवीच कौतुक कराव ते कुरुंदकरानीच नवीन कवीच ते प्रेरणास्थान तर मुरब्बी साहित्यिकाना त्याचा धाक आणि दरारा! समीक्षेच्या कात्रीत कस सापडलं जाऊ ही भीती!

या पुस्तकात एकूण अकरा लेखापैकी सात लेख 'स्वातत्र्य' या विषयाला वाहिलेले आहेत. स्वातत्र्य ही कल्पना किती व्यापक आहे समाज अस्तित्वात आल्यापासून व्यक्ती-स्वातत्र्य, धार्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैचारिक आणि हल्लीच स्त्री-स्वातत्र्य अशी अनेक सदर्भातली स्वातत्र्य ही सकल्पना कुरुंदकरानी तपासली आहे. शिवाय कलाव्यवहारातील स्वातत्र्य हे वेगळंच प्रकरण! स्वातत्र्य हा शब्द ऐकायला लोभस असला तरी त्याचा अर्थ चक्रावून टाकणारा! कुरुदकर अशा वेळी संकल्पनेच्या अगदी मुळाशी जाऊन तत्त्वज्ञान, मानवी इतिहास, राजकारण, कलामूल्य, अध्यात्म, समाज या सर्व गोष्टीचा, तर्कशुद्ध विवेचनाद्वारे परामर्ष घेतात. विचारवतानी स्वातंत्र्य म्हणजे काय याच्या दानशे व्याख्या नोदवल्या आहेत. तेव्हा स्वातत्र्य या विषयाची गुतागुत किती असेल याची कल्पनाच केलेली बरी. पण हे सगळ पचवण हा कुरुदकराचा लीलया खेळ. शिवाय हातावर शेवटी काढून ठेवलेल स्वत च्या स्वतत्र मताचं सार आहेच.

स्वातत्र्याची दुसरी बाजू कोणत्याही स्वरुपाचं बधन आणि ते बंधन नसणं म्हणजे स्वातंत्र्य यातली स्वातत्र्य ही भावरूप कल्पना आणि बंधन ही नकारात्मक कल्पना असं वर्गीकरण त्याना मान्य नाही. विचार–स्वातंत्र्य हे महत्त्वाचं स्वातत्र्य आहे अस त्याना वाटत, इतकच नव्हे तर ती सर्व स्वातत्र्याची परिपूर्णता आहे असही ते मानतात मानवी इतिहासातल्या एका गमतीदार सत्याविषयी ते म्हणतात, 'मानवी इतिहासात वेळोवेळी असे दिसले आहे की, माणसाने स्वातत्र्य आणि सुरक्षितता असा प्रश्न निर्माण झाला, तेव्हा चमत्कारिक वर्णन केले आहे. माणसाची सुरक्षितता मावळत जाते, तसतसा तो गुलाम होतो. सुरक्षितता काढून घेऊन देण्यात येणारे स्वातत्र्य हे गुलामीचेच दुसरे नाव असते. सुरक्षितता हे नाव घेऊन येणारे दास्य आणि स्वातत्र्य हे नाव घेऊन येणारे दास्य यात माणसाला निवड करता येत नाही. कारण दास्यात त्याला सुरक्षितता आणि स्वातत्र्य दोन्ही गमवावे लागते. म्हणून सुरक्षितता आणि स्वातत्र्य यातून तो सुरक्षिततेची निवड करतो.'

## मुद्देसूदपणा हा विशेष

स्वातत्र्याची कल्पना ही समाजनिरपेक्ष असूच शकत नाही. प्रत्यक्ष व्यवहारात स्वातंत्र्य उपभोगता येईल अशी समाजरचना आपण करत असतो ज्या समाजात विचार-स्वातत्र्य काढून घेतले जाते, त्या समाजात क्रमाक्रमाने अधद्धा वाढत जाते. स्वातंत्र्य हे आहे अस कुरुदकर मानतात. त्यामुळे या मूल्याचे जतन मात्र परिस्थिती निरपेक्ष व्हायला पाहिजे असा आग्रह ते घरतात.

स्वातत्र्य हे कलामूल्य आहे अस मानायला कुरुदकर तयार नाहीत. एखादी कलाकृती केवळ स्वतंत्र आहे म्हणून ती श्रेष्ठ ठरत नाही. स्वातत्र्य ही जीवनाची प्रेरणा आहे, ती कलेची प्रेरणा नाही.स्वातंत्र्य हे जीवनमूल्य आहे यानतर प्रश्न येतो कलावंताच्या स्वातंत्र्याचा. स्वातंत्र्याचा विचार करताना काही मडळी अशी भूमिका घेतात की कलावंताचे स्वातंत्र्य कोणी द्यायचे नसते. कलानिर्मितीच्या प्रक्रियेत ते स्वातंत्र्य गृहीतच असते. स्वातत्र्य नसेल तर कलावंताला आपल्या अनुभवाशी प्रामाणिक राहून आविष्कार करणे अशक्य झाल्यामुळे चांगल्या कलाकृतीची निर्मिती अशक्य होते. म्हणून स्वातत्र्याचा आग्रह पण आपल्या अनुभवाशी प्रामाणिक राहाव हे बधन त्याच्यावर असतच! म्हणूनच सगळी बधने स्वातंत्र्यविरोधी नसतात असा निष्कर्ष कुरुदकर काढतात.

स्त्री स्वातत्र्याचा प्रश्न त्यांनी असाच अभ्यासपूर्ण रीतीने माडला आहे. स्त्री समाजात स्वतत्र असली पाहिजे असे मानणारे कुरुदकर आहेत. तेही स्त्री ही स्त्री आहे म्हणून नव्हे तर माणूस म्हणून तिला स्वातत्र्याचा हक्क आहे. कायदा स्त्रीच्या स्वातत्र्याला साह्यकारी होतो. तिच्यावरची बंधने सैल करतो पण कायद्यान जे दिलं, ते व्यवहारात नेहमीच उपभोगता येईल असं नाही. यासाठी सपूर्ण समाजाची आणि स्त्री व पुरुष दोघांचीही मनोवृत्ती बदलण आवश्यक आहे, अस त्यांना वाटतं. ज्या समाजात पती आपल्या पत्नीला मालकीची वस्तू मानतो तोपर्यंत स्त्री स्वतत्र होणार नाही. ज्या समाजात भोग विकत मिळतो आणि स्त्री ही उपभोग्य वस्तू असते, त्या समाजात विवाहित स्त्री देखील सुरक्षित नसते आणि अविवाहित स्त्री बेवारशी वस्तू असते! विवाह होण ही स्त्रीच्या दृष्टीन जीवनाची सार्थकता आणि पुरुषाच्या दृष्टीन एक आनुषगिक घटना असेल तर विवाहामुळे आपलं जीवन सार्थकी लागल अस मानणारी स्त्री ही दुय्यमच राहणार. स्वातंत्र्य हे शेवटी सास्कृतिक मूल्य आहे आणि ते मूल्य मानणारे सुसस्कृत मन आपण समाजात किती प्रमाणात निर्माण करू शकतो, हे महत्त्वाचं आहे

स्वातंत्र्य या सकल्पनेविषयी असे सुस्पष्ट आणि झळझळीत विचार कुरुदकरानी माडले आहेत निष्कर्षाप्रत येण्यासाठी मात्र ते ज्या सदर्भाच्या आणि ज्ञानाच्या, विचारांच्या आणि मतामताच्या निबिड अरण्यातून घेऊन जातात, त्यावेळी मात्र दमछाक होते. डोकं गरगरायला लागतं. कुरुदकराचे लेख वाचण्यापेक्षा त्याच भाषण ऐकणं हा आनददायी अनुभव होता. कारण बोलताना ते एकेका मुद्याची उकल करत व्यवस्थित पटवून द्यायचे. मुद्देसूदपणा हा त्याच्या लिखाणाचा विशेष त्यामुळे सार लक्षात ठेवायला अडचण जात नाही.

कुरुंदकर स्वत: समाजवादी त्यामुळे समाजाच्या संदर्भात माणूस हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय माणसाने माणसाला माणसासारखे वागवावे हे त्याच्या जीवननिष्ठेचं सार आहे पण ही गोष्ट प्रत्यक्ष आचरणास येताना समाजात दिसत नाही. माणसानेच माणसाला स्वार्थ आणि स्वत च्या सोयीसाठी हीन करून टाकलं आहे. गुलामगिरी हा त्यातूनच निर्माण झालेली हीन व्यवहार गुलामगिरी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अशी तीन प्रकारची नसते अस सांगून कुरुदकर म्हणतात की, राजकीय आणि सामाजिक गुलामगिरी ही आर्थिक गुलामगिरीच्या व्यवस्थेची दोन रूप असतात. सामाजिक गुलाम-

गिरी ही भारतात परंपरेनं चालत आलेली आहे आणि आजही आर्थिक गुलामगिरीचा प्रश्न राजकारणाशीच निगडित आहे.

समाजवादाचा अतिशय खोलात जाऊन कुरुंदकर विचार करतात. ते म्हणतात, समाजवादाच्या मांडणीला मार्क्सपासून प्रारंभ होतो. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तीन गोष्टींचं आश्वासन फ्रेंच जनतेला दिल. ते प्रत्यक्षात आलं नाही म्हणून मार्क्सवादाचा जन्म झाला. समाजवादाकडे बघताना जनतेच्या प्राथमिक गरजाचे प्रश्न सोडवणारे तत्त्वज्ञान म्हणून त्याकडे बघणे चुकीचे आहे. समाजवादाला अर्थरचना आणि समाजरचना दोन्ही बदलायचे आहे. त्यातही आधी अर्थरचना. अनुषंगाने समाजरचना बदलेल. नैतिकतेचं दोहोंना अधिष्ठान आहे. समाजवाद हा जीवनातल्या सर्व दुःखावरचं औषध नाही. समाजव्यवस्था आणि अर्थव्यवस्था ह्यानी जी सामाजिक दुःख निर्माण केली, त्यातलीही जी दुःखं प्राथमिक गरजाशी निगडित आहेत, त्यांच उत्तर म्हणजे समाजवाद.

कुरुंदकरांच विचारधन अफाट आहे. या पुस्तकातून जे मौलिक विचार व्यक्त झाले आहेत, ते आनंददायक तर आहेतच, पण त्याहूनही मोहक आहे त्यांची विचार करण्याची पद्धत. एक मात्र खरं की, त्यांचे विचार समजायला वाचकांजवळ किमान माहितीचा साठा असावा ही अपेक्षा असते. त्यांनी श्रोत्यांची किंवा वाचकांची एक विशिष्ट पातळी गृहीत धरलेली असते. याहून सोपं करून त्यांना सांगता येत नसावं. विचारांसारखीच भारदस्त भाषा हेही त्यांच्या लिखाणाचं वैशिष्ट्य. इतपत क्लिष्टता पेलवली तर त्यांच्या लिखाणात अवगाहन करणं यापरता आनंद नाही.

—आशा कर्दळे

अभयारण्य
नरहर कुरुंदकर
नरहर कुरुंदकर साहित्य प्रकाशन संस्था, नांदेड
पृष्ठे : ९२, किंमत : वीस रुपये

# भविष्यवेत्त्याची आत्मकहाणी

आपण सारे वर्तमानकाळात जगत असलो तरी सुद्धा भविष्य काळाची चिंता, उत्सुकता व भूतकालाबद्दल खेद वा हळहळ आपल्याला सतत डाचत असते. झाले ते होऊन गेले, आता यापुढे काय होणार याची उत्सुकता प्रत्येक थरातील व्यक्तीला असते. राजकारणी, श्रीमंत वा गरीब, व्यापारी, नोकरवर्ग, शिक्षक, लक्षाधीशापासून ते भिक्षाधीशापर्यंत सारे जण भविष्याचा वेध घेत असतात.

पूर्वीच्या काळात राजज्योतिषाला फार महत्त्वाचे स्थान होते. आताही मंत्री, महामंत्री ज्योतिषाशी सतत सल्लामसलत करून पुढची पावलं टाकीत असतात, असे आपण ऐकतो वाचतोही. Life is an accident and Death is a certainty. या दोन्ही टोकाच्या सापटीत सापडलेली आजच्या विज्ञानयुगातील माणसं ज्योतिषाच्या कल्पनेनं भारावून जातात. यात अनेक बुद्धिवादी लोकही आपल्याला दिसतात. ज्योतिषावर काडीचाही विश्वास न ठेवणारी माणसं या जगात आहेत; पण त्यांचं प्रमाण फार अल्प. भविष्य जाणून घेणारी व त्यावर विश्वास ठेवणारी व त्या अनुषंगाने वागणाऱ्या माणसाची संख्या किंवा प्रमाण फारच मोठे आहे.

ज्योतिषातही तीन प्रकार पडतात. फलज्योतिष म्हणजे कुंडली ग्रहमानावरून वर्तविलेले मुद्राज्योतिष ( FACE READING ) व हस्तसामुद्रिक ( Palmistry ) हस्तरेषा हेही एक शास्त्र आहे. यात सांख्यशास्त्राचा समावेश आहे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरकाळात व विसाव्या शतकाच्या सुरुवातीला मान्यवर पावलेला व ज्याला जागतिक कीर्ती लाभली असा एक हस्तसामुद्रिक इंग्लंडमध्ये तळपू लागला. त्याचं टोपण नाव कीरो ( CHEIRO ) या भविष्यवेत्त्याची ही आत्मकहाणी.

कीरोने या आत्मवृत्ताला स्वतःच मर्यादा घालून घेतल्या आहेत. व्यावसायिक आठवणी व अनुभव हा या ग्रंथाचा मुख्य विषय आहे. त्यामुळे या गृहस्थाचे नाव, काय जन्मस्थान व तारीख कोणती वगैरे गोष्टी गुलदस्त्यातच रहातात. स्वतःच खाजगी आयुष्य याने संपूर्ण झाकून ठेवल आहे. त्यामुळे वाचकाची जिज्ञासा या ग्रंथाने पुरी होत नाही. त्यामुळे ही आत्मकहाणी नसून व्यावसायिक कहाणी आहे. तरीसुद्धा अनेक ठिकाणी दुवे साधताना याची थोडी फार माहिती हाती लागते. कीरोची आई ग्रीक व फ्रेंच रक्ताची व वडील ( बहुधा ) इंग्रज असावेत. ख्रिस्तधर्म व मूर्तिपूजा या विरोधी वृत्तीचे मिश्रण. ज्योतिषगूढ आणि सैतानी विद्येचा अभ्यास करण्याची जबरदस्त महत्वाकांक्षा, आईला ज्योतिषाची आवड आणि नाद त्यामुळे बालपणीच ज्योतिषविद्या सांख्यशास्त्र व हस्तसामुद्रिकाची गोडी. वयाच्या दहाव्या वर्षीच आईचं ग्रंथालय हाती पडलं.

कीरोच्या मते हस्तसामुद्रिक ही बंदिस्त आत्म्याची भाषा. हातावरील रेषा हा वाचावयास सोपा असा जीवनलेखच. वडिलांचे थोडे पैसे व भरपूर आशीर्वाद घेऊन बालपणीच त्यानं घराला कायमचा रामराम ठोकला. घराचं सुरक्षित बंदर सोडून त्याची जीवननौका उघड्या जगाच्या अफाट दर्यावर हाकारू लागली. प्रथम त्यान लंडन शहर गाठलं. भावी घटनांची चाहूल त्याला अगोदरच लागली. लिव्हरपूल स्टेशनवर दृष्टीस पडलेलं हस्तसामुद्रिकेचं पुस्तक, त्यामुळे झालेल्या एका मोठ्या माणसाचा परिचय-इथूनच खऱ्या अर्थानं कीरोचं हस्तसामुद्रिकाचं जीवन सुरू झालं.

### भारतात आगमन

हस्तरेषाच्या वास्तवतेची कीरोला खात्री पटली. त्यानं आत्तापर्यंत जे थोडे फार हात पाहून भविष्य वर्तवल होत ते ततोतंत खरं ठरलं होतं. जर्मनशास्त्रज्ञ मेनसर याच्या मते हाताच्या बोटाच्या अग्रभागात एका चौरस इंचाला १०८ अतिसूक्ष्म कण असतात. या कणांना चारशे अग्रे असतात. त्यांची कंपन संख्या प्रकृतिमान विचार व भावना यावर अवलंबून असते. गुन्हेगाराच्या आंगठ्याचे ठसे घेऊन गुन्ह्याचा तपास लावण्याची पद्धत जगातील सर्व देशात आता रूढ झाली आहे. या विषयावरील असंख्य पुस्तके स्कॉटलंड

यार्डने आपल्या संग्रहालयात ठेवली आहेत. कीरोने हातावरील रेषाचा सतत अभ्यास घेतला होता. त्या दिशेनच त्याची पावलं पडत होती लंडन येथील थेम्स नदीच्या काठान टिलबरी गोदी विभागात तो येऊन दाखल झाला व एका अज्ञात मालवाहू बोटीत त्यान पदार्पण केल. ही बोट कुठे जाणार हेही त्याला माहीत नव्हत. पण या सागरी वाटेन बाहेर पडावं आणि अथाग दर्यापलीकडील अज्ञात गूढ दुनियेला सामोरं जाव अस त्यान ठरवलं.

पण नियतीनेच कीरोला भारतात येण्याची संधी दिली. ती मालवाहू बोट मुंबईच्या किनाऱ्याला 'गेट वे ऑफ इंडिया'ला निघाली होती भारताबद्दल विलक्षण कुतूहल कीरोच्या मनात होतं, नियतीन त्याला भारतात यायची संधी दिली हे त्याचं परमभाग्यच. कीरोन भारतात दोन वर्षे राहून गूढविद्येचा अभ्यास केला. गेटवे ऑफ इंडिया इथं त्याची एका ब्राह्मण माणसाशी ओळख झाली व त्याच्यामुळेच गूढ विद्या उपासकाच्या मेळाव्यात रहाण्याची आणि ती विद्या शिकण्याची संधी कीरोला मिळाली.

हा ब्राह्मण गृहस्थ कोण ? किरो, कुठे व कोणत्या साधुच्या मेळाव्यात राहिला होता, या कुठल्याच गोष्टीचा उलगडा त्यान केलेला नाही किंवा तो करावा अशी त्याची इच्छा नाही याविषयी तो लिहितो.

'मी भारतात दिवस कसे घालवले. तिथं मला काय अनुभव आले याविषयी सविस्तर लिहिण मला निश्चितच आवडेल; पण माझ्या मते ती वेळ अजून आली नाही आणि ती वेळ जेव्हा येईल तेव्हा एक स्वतंत्र ग्रथच माझ्या हातून लिहून होईल.'

भारताच्या प्रवेशद्वाराशी कीरोला भेटलेला ब्राह्मण माणूस. हस्त सामुद्रिकाचा पिढ्यान पिढ्या अभ्यास करत असलेल्या 'जोशी' घराण्यात त्याचा जन्म झाला होता, एवढीच माहिती कीरोने आपल्या आत्मकथनात सागितली आहे. या जोशी घराण्यातील ब्राह्मण व त्याचे सहकारी व गूढ विद्येचा अभ्यास हे सारं वाचकाना अज्ञातच आहे.

या ब्राह्मण उपासकांच्या मेळाव्यात दोन वर्षे घालवून कीरो लंडनला परत आला तो एका योगायोगामुळेच; पण भारतात कीरोने जो अभ्यास केला त्याचा तपशीलही त्यानं दिला नाही; पण हा अभ्यास करीत असताना त्यान मनान एका अर्थानं शपथ घेतली होती ती अशी की,

'या गूढ विद्येचा त्यातल्या त्यात हस्तसामुद्रिकाचा उपयोग द्रव्य प्राप्तीच्या उद्देशान किमान २१ वर्षे तरी करणार नाही. एक धार्मिक सेवाभावी वृत्ती याच दृष्टीने या विषयाकडे पाहीन.'

## रंजक अनुभव

भारतातून परत आल्यानंतर इजिप्त कीरोची भ्रमती, तेथील प्राचीन राजाची थडगी, मदिर पाहून कीरो लंडनला परत आला, त्यावेळी त्याच्या स्वत.च्या इस्टेटीची विल्हेवाट लागून तो कफल्लक झाला होता. त्यावेळी हस्तसामुद्रिकाच्या त्याच्या अभ्यासाचा उपयोग 'व्यवहारासाठी' करायचा अस त्यान ठरवल. मग त्या शपथेच काय झालं ? याचा खुलासा कीरोनं कधीच केला नाही. जी गूढविद्या तो सेवाभावी वृत्तीसाठी वापरणार होता, ती त्यानं एक श्रीमती व्यवसाय करण्यासाठी वापरली.

खरं तर त्यापूर्वीच जवळचे पैसे सपल्यानतर कीरोने लोकाचे हात पाहून पैसे जमा केले होते व तो लंडनला आला होता. त्याच सुमारास लंडनच्या इस्टएन्ड विभागात रहस्यमय खुनाच एक प्रकरण उद्भवल होत. खुनी माणसाच्या 'रक्तरंजित' ठशाचा एक हस्तसामुद्रिक म्हणून कीरोने उलगडा केला व सागितल की, हा ठसा खुनी माणसाच्या जवळच्या नातेवाइकाचा किंबहुना त्याच्या मुलाचाच असावा ते भाकित पोलिसांना फारच उपयोगी पडलं व त्यानी त्या खुनाचा शोध लावला.

किरोला लेखनाची फारच आवड होती. पण त्यावेळी त्यान जे जे लिखाण केलं ते सपादकाकडून साभार परत आल. मग मात्र त्यान एका ज्यू माणसाच्या सहाय्यानं आपली पहिली व्यावसायिक कचेरी उघडली. त्यान या ज्यू माणसाशी करार केला की, त्याला यात जे पैसे मिळतील त्यातले निम्मे त्या ज्यू पार्टनरला द्यायचे. एका स्कॉच महिलेची जागा भाड्यान मिळाली. कीरोची *व्यवसाईक कचेरी प्रथम इथे सुरू झाली*. पुढे त्या ज्यू माणसाशी झालेला करार काही तात्रिक कारणामुळे मोडला गेला व कीरो मुक्त झाला.

आता कीरोनं स्वतःच नवं कार्यालय उभं करायचं ठरवल. नाव काय द्यायचं हा प्रश्न होता. मग ग्रीक आणि इंग्लिशमधील ठळक नाव डोळ्यापुढे झळकू लागलं कीरो CHEIRO -Cheir हा ग्रीक शब्द त्याचा अर्थ हात. व Cheiro म्हणजे हस्तविषयक ही व्यावसायिक नावाची पाटी कार्यालयाच्या रस्त्याकडील दरवाज्यावर लावल्यानतर ग्रीक भाषेत गती असणारं एक पहिलंच गिऱ्हाईक कीरोच्या ऑफिसात आल. त्याचा हात पाहून त्यान त्याच ततोतत भविष्य वर्तविल त्यानंतर लौकरच कीरोच्या कार्यालयावर गिऱ्हाइकाची झुम्मड उडाली.

एकदा नामवत हस्तशास्त्रज्ञ म्हणून कीरोची किर्ती लंडन शहरात पसरल्यावर मोठमोठी मडळी त्याला भेटायला आणि हात दाखवून भविष्य जाणून घ्यायला उत्सुक झाली त्यात इग्लंडचे सम्राट सातवे एडवर्ड, बेल्जियमचे राजे दुसरे लियोपोल्ड ग्लॅडस्टन, ऑस्कर वाइल्ड, डब्लु टी. स्टीड, मार्कटवेन अशा महान व्यक्तीचा समावेश आहे या साऱ्याच रसभरित वर्णन व त्याला आलेले अतिशय रजनीय अनुभव त्यानं आपल्या रसाळ वाणीन आणि लोभस व्यक्तिमत्वानं *आणि शैलीन आत्मकथेत वर्णन केले आहेत*. मृत्यूची त्याची सारी भाकित तंतोतत खरी ठरली आहेत. ती वाचत असताना कीरो हा एक असामान्य भविष्यवेत्ता होता यात तिळमात्रही शंका वाटत नाही. या मोठ्या लोकाच्या भेटी–गाठी त्याच्याशी अनुभवलेले प्रसग खरोखरच वाचनीय आहेत.

कीरोन व्यवसाय म्हणून खूपच प्रवास केला. त्यात रशियातील आठवणी व भेटलेल्या व्यक्तीची वर्णन फारच समर्पक आहेत. रासपुतीनची कहाणी आणि हकिगत रोमहर्षक आहे रशियातील वास्तव्यात कीरोला आलेले अनुभवही मोठे गमतीशीर व चमत्कारिक आहेत या साऱ्या अनुभवाच एक वेगळेपण वाचकाला जाणवतं. त्यानं एका गिऱ्हाईकास त्याचा हात पाहून 'आणखी थोड्याच वर्षांत दारू पिऊन तुम्हाला मरण येणार आहे' अस स्पष्टपणे सागितल होत. खोदकाम करण्यात तज्ञ असलेल्या एका इसमाला हिऱ्याची खाण मिळेल असा अदाज केला होता तो इसम दिवाळखोर होता.त्यानं मागितले म्हणून दोनदा पन्नास पौंड त्याला उसनेही दिले व्यवहारात फायदा झाला तर त्यातील निम्मी रक्कम द्यायचं कबूल केल. या व्यवहारात कीरोला अर्धा हिस्सा म्हणून हजारो पौंड मिळाले. १८९९ च्या बोअर

**यंदाचे विज्ञान ग्रंथालीचे पारितोषिक विजेते राजहंस प्रकाशन**

टारझनच्या हातात एक पुस्तक पडलं....
पांढऱ्यावर काळे विचित्र आकार पाहून तो
बुचकळ्यात पडला.
येत्या काही वर्षात आपण सगळेच टारझन ठरू
की काय ?
अनोळखी वस्तू, अनोळखी भाषा आणि गूढ
वाटणाऱ्या शक्ती असलेलं एक जग आपल्या
जगात घुसत चाललेलं आहे.
हे आहे कॉम्प्युटरचे जग.
एक लक्षात घ्या. या कॉम्प्युटरमध्ये काहीही
जादू नाही.
ते केवळ एक यंत्र आहे.
कर्ताकरविता माणूसच आहे.
या यंत्रात माहिती कशी घातली जाते इथपासून
ते हवी असलेली माहिती बाहेर पडेपर्यंत
प्रत्येक घटनेची माहिती सांगणारे आणि या
सगळ्याचा नेहमीच्या अनुभवांच्या आधारे
खुलासा करणारे पुस्तक

## या कॉम्प्यूटरमध्ये दडलंय काय ?

**लेखक : राजीव साने**

किंमत : रुपये तीस

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

C/o श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर
दादर (प.) मुंबई ४०० ०२८

दूरध्वनी : ४२२५४५५

युद्धात व्हिक्टोरिया क्रॉस मिळविलेल्या कॅप्टन बोलसच्या भ्याडपणाची व त्याच्या दुर्दैवी अंताची कहाणी करूणास्पद आहे. बेल्जियमचे राजे व प्रिन्सेस क्लेमल्टीनच्या सहवासातील आठवणी हृद्य आहेत. कॉटेसच्या प्रासादातील वैभव संपन्न दिवस व नियतीनं तिच्यावर उगवलेली सूडाची कहाणी अंगाचा थरकाप उडवते.

कीरोनं व्यवसाय म्हणून जगभर प्रवास केला, शेकडो व्याख्याने दिली व अमाप पैसा मिळविला.

कीरोच्या आत्मकहाणीच्या अगदी शेवटी त्यानं आपल्या लग्नाची कहाणी कथन केली आहे. तो म्हणतो, 'प्रेमभावनेचा फुलोरा माझ्या मनात कधी फुलतच नाही. त्यामुळे लग्नाचा विचार माझ्या मनात कधी आलाच नाही' लग्नविरोधी संस्थेचा तो सभासद होता. या संस्थेच्या सभासदांनी आपण आयुष्यात कधी लग्न करणार नाही अशी शपथ घेतलेली असते. त्या काळात या संस्थेचे पाचशे सभासद होते. प्रत्येक सभासदाकडून वर्षाला पाचशे पौंड घेतले जात. स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दल या सभासदांना आदर होता. स्त्रीजात ही पुरुषांची गुलाम नसून पुरुषांना मिळालेली ती एक दैवी देणगी आहे असा या सभासदांचा विश्वास होता. कीरो या संस्थेचा तीस वर्ष सभासद होता. खूपच उशीरा उतार वयात त्यानं या संस्थेचा राजीनामा देऊन एका विधवेशी लग्न केलं. कीरोच्या लग्नाची ही प्रेमकहाणी खरोखरच रोमांचकारी आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात गाजलेला हा असामान्य भविष्यवेत्ता होऊन गेला. याची ही आत्मकहाणी असली तरी तिची मर्यादा फक्त व्यावसायिक आठवणींपुरतीच असल्यामुळे वाचकांचे औत्सुक्य अनेक बाबतीत अपुरे रहाते.

या सुंदर पुस्तकाचा अनुवाद श्री. ग. रा. टिकेकर यांनी आपल्या सुरेख शैलीत मराठी भाषेत उतरविला आहे. या अनुवादाला इंग्रजी भाषेचा वासही येत नाही हेही या ग्रंथाचे वैशिष्टयच म्हणावे लागेल.

— रंगा मराठे

भविष्यवेत्त्याची कहाणी
लेखक : कीरो ( CHEIRO )
अनुवाद : ग. रा. टिकेकर
विश्वमोहिनी प्रकाशन
मूल्य रु. ८०–००

देशी–परदेशी पर्यटकाचं आकर्षण केंद्र असलेलं भारतातलं 'ताजमहाल' हे अप्रतिम वास्तूशिल्प. ताजमहाल त्याच्या संगमरवरी कलाकुसरीसाठी, अतिप्रगत वास्तुकलेसाठी जेवढा प्रसिद्ध आहे, तेवढाच प्रसिद्ध आहे तो शहाजहान–मुमताज याच्या प्रेमाच प्रतीक म्हणून. अशा या ताजमहालाची प्रतिकृती जगाच्या कोपऱ्यात कुठे तरी तयार होत आहे, ही कल्पना कशी वाटते ? आपल्याला तरी जगात एकच ताजमहाल असावा असं वाटत. पण आता लवकरच 'अमेरिकन ताजमहाल' तयार होणार अशी योजना चालू आहे. फ्लोरिडा इथल्या जगप्रसिद्ध डिस्नेवर्ल्डजवळच हा नवा ताजमहाल असेल. भव्य हॉटेल, आतरराष्ट्रीय बाजार केंद्र, म्युझियम, पोलो ग्राऊड, सास्कृतिक केंद्र असणाऱ्या भव्य कॉम्प्लेक्समध्ये 'ताजमहाल' ची ही प्रतिकृती १९८९ पर्यंत पुरी होईल असा अदाज आहे.

ही प्रतिकृती तयार करण्यासाठी अदाजे खर्च येईल १०० लाख डॉलर्स. नव्या ताजमहालची उची ७० फूट आणि मनोऱ्यांची उची १२० फूट असेल आणि भारतातल्याप्रमाणेच त्याच्यासमोर सुदर तळं आणि बागा असतील.

जगप्रसिद्ध 'ताजमहाल' ची प्रतिकृतीही तितकीच सुदर असेल आणि त्या वास्तूचं पावित्र्य जाईल अशी कोणतीही गोष्ट असणार नाही असा अमेरिकन वास्तुतज्ज्ञाचा दावा आहे.

ही प्रतिकृती तयार करण्याची कल्पना कशी सुचली ? तर जॉन मोनाहन हे या प्रकल्पातले प्रमुख म्हणतात, *'हा भारतीय सस्कृती, कला आणि इतिहासाला केलेला मानाचा मुजरा आहे. खरा ताजमहाल अमेरिकेतले फार थोडे लोक पाहू शकतात पण ही प्रतिकृती मात्र दरवर्षी पन्नास लाख लोकाना पहायला मिळेल.'*

जगातल उत्तम ते आपल्याकडे हव अशी महत्त्वाकाक्षा असणाऱ्या अमेरिकन लोकाचं लक्ष आता 'ताजमहाल'-सारख्या जगप्रसिद्ध वास्तूशिल्पाकडे जाणार अस म्हणायला हरकत नाही. १९८९ साली पूर्ण होणाऱ्या या प्रकल्पासबधी आपल्या वर्तमानपत्रातून अद्याप माहिती आलेली नाही; पण अमेरिकेतील वर्तमानपत्रात ही बातमी आली आहे.

ताजमहाल असा परदेशात गाजत असताना आपल्याकडे ताजमहाल ही 'मुमताजची कबर' की 'हिंदूचं मदिर' हा वाद चालूच आहे. ताजमहाल हिंदूंचं मदिर आहे हे पुराव्यानिशी सिद्ध करणारे वा. श. गोडबोले ( बेडफोर्ड ) याचं 'ताजमहाल' नावाचं पुस्तक इंग्रजीतून दोन महिन्यापूर्वी प्रसिद्ध झाल आहे. या पुस्तकाचा हा मराठी साराशलेख. लेखकानेच माणूसकडे लिहून पाठवलेला.

# ताजमहाल

## इंग्लंड–अमेरिकेतील तज्ज्ञही आता पुर्नविचार करू लागले आहेत

वा. शं. गोडबोले, बेडफोर्ड, इंग्लंड

ताजमहालाचा अभ्यास करताना एक गोष्ट पट्कन लक्षात येते. 'शहाजहानचे मुमताजवर फार फार प्रेम होते. तिचे स्मारक म्हणून त्याने ताजमहाल बांधला' ( असावा ) ह्या ब्रह्मवाक्यापेक्षा इतिहासकाराना काही म्हटल्या काहीही माहीत नाही. ताजमहालाचा शिल्पकार कोण ? त्याने ताजमहालाआधी असे कोणते काम केले की त्यामुळे शहाजहानने त्याला आमत्रण द्यावे ? काम केव्हा सुरू झाले, केव्हा सपले? काम पुरे केल्यावर शहाजहानने शिल्पकाराचा सत्कार केला का ? असल्यास केव्हा व कोठे ? काय बक्षीस दिले ? अशा अनेक प्रश्नाना कोणीही समाधानकारक उत्तरे देत नाही. मुमताज मेल्यापासून औरंगजेब मरेपर्यंत तब्बल पाऊणशे वर्षात कुठल्याही सरकारी कागदपत्रांत ताजमहाल हा शब्दसुद्धा सापडत नाही इतिहासकार जी काही तुटपुजी माहिती देतात ती सगळी प्रवाशाच्या वर्णनावरून. म्हणतात तरी काय हे प्रवासी ?

टॅव्हर्नियर नावाचा फ्रेंच प्रवासी शहाजहानच्या काळी हिंदुस्थानात आला होता. 'मी ह्या कामाची सुरवात आणि शेवट बघितला. तेथे २०,००० माणसे २२ वर्षे सतत काम करत होती.' असे मोघमपणे त्याने लिहून ठेवले आहे. त्यावरून आपली अशी कल्पना होते की, हा गृहस्थ ताजमहालासमोर तबू ठोकून बसला असावा आणि रोज मस्टर रोलवर सगळ्याची हजेरी लावत असावा. तसे अजिबात नाही. टॅव्हर्नियर हा हिरे, माणिक, पाचू, मोती, अशा वस्तूच्या व्यापारासाठी पाच–सहा वेळा आला होता. तो आग्ऱ्याला १६४०–४१ च्या हिवाळ्यात पहिल्यादा आला. कर्मधर्मसयोगाने मॅन्टिक नावाचा स्पॅनिश मिशनरीसुद्धा त्याच वेळी आग्ऱ्यात होता. पण त्याला ताजमहालाच्या जागी कोणी मिस्त्री, गवडी, पाथरवाट दिसले नाहीत. सगमरवरी दगड, विटा उचलताना कोणी दिसले नाहीत. फार काय सागावे, चुना कालवतानासुद्धा कोणी दिसले नाहीत. अदाजे १००० माणसे बागकाम करत होती एवढेच त्याने लिहून ठेवले आहे म्हणजे त्यावेळी बाधकाम काहीच चालू नव्हते. (इमारतीचे काम पुरे झाल्यावरच बागकामाला सुरवात होणार. ) शिवाय इतिहासकार सागतात, 'मुमताज मेली १६३१ साली. ताजमहालाचे काम सुरू झाले १६३२ साली. संपले १६५२–५३ साली. असे जर आहे तर टॅव्हर्नियरने कामाची सुरुवात कशी काय बघितली ? तो दुसऱ्यावा आग्ऱ्याला आला १६६५ साली. म्हणजे

ताजमहाल पुरा झाल्यावर १३ वर्षांनी. मग त्याने कामाचा शेवट कसा बघितला ? तरी सुद्धा गेली १५० वर्षे सगळे लेखक टॅव्हर्नियरचे वाक्यच प्रमाणभूत मानत आहेत. ह्याला काय म्हणावे ?

१६३८ साली ऑक्टोबर/नोव्हेंबरमध्ये मन्डेस्लो नावाचा प्रवासी आग्र्याला आला होता त्याच्या प्रवासवर्णनात 'शहाजहान आपल्या बायकोचे थडगे बांधत आहे' असा उल्लेख सुद्धा नाही. मग तपशीलाची गोष्टच नको हे कसे ?

जानेवारी १६३१ ते फेब्रुवारी १६३३ या काळात मंडी नावाचा वेल्श व्यापारी ईस्ट इंडिया कंपनीत कामाला असताना आग्र्याला होता. २० जून १६३१ रोजी बऱ्हाणपूर येथे मुमताज मेली. आता एवढा प्रजाहितदक्ष राजा. त्याची लाडकी बायको मेली तर ती बातमी ऐकून आग्र्यात हाहा:कार उडाला असेल. व्यापारधंदे चार-पाच आठवडे तरी बंद असतील, मुमताज कशी दयाळू होती ह्याचे लोक गुणगान करत असतील अशी आपली कल्पना असेल की नाही ? मंडीला तसे काहीही दिसले नाही. फार काय ती मेली एवढी बातमीसुद्धा त्याने ऐकली नाही. आता शहाजहानचे सुद्धा बघा— मुमताज मेली तिथच तिचे थडगे बांधायचे की नाही? बर आग्र्यालाच बांधायचे होते तर लगेचच दफनपेटी तिकडे न्यायची की नाही ? बऱ्हाणपुरला पुरून नतर सहा महिन्यानंतर उकरून कशाला काढली ? बरं ह्या वेळी तरी बरोबर जायचे की नाही ? तेही नाही. दफनपेटी आग्र्याला पोचल्यानंतर तब्बल सहा महिन्यानंतर शहाजहान तिथे गेला. तिचे थडगे जर तयार नव्हते तर प्रेत न्यायचे कशाला ? बरं नेल तर एखाद्या बेवारशासारखे एका बागेत का पुरले ? लालकिल्ल्यात का पुरले नाही ? नतर पुन्हा केव्हा तरी दफनपेटी उकरून थडग्यात ठेवली. हे काय गौडबंगाल आहे ? सगळ्यात कहर म्हणजे ताजमहालामध्ये मुमताज केव्हा मेली ही तारीखसुद्धा नाही. १०४० हिजरी साली मेली एवढाच उल्लेख आहे.

मंडीने चार ओळी लिहिल्या आहेत तेवढ्यावरच सगळे खूष. तो लिहितो, 'काम एकदम जोरात सुरू आहे. तिच्या थडग्याभोवती एक रत्नजडित सोन्याचा कठडा उभारला आहे सोने-चांदीचा सामान्य धातूप्रमाणे वापर होत आहे. संगमरवरी दगड सर्रास वापरत आहेत. इमारतीच्या दर्शनास आड येणाऱ्या टेकड्या सपाट करत आहेत.'

### थडग्यात रूपांतर

शहाजहान आग्र्याला आला १ जून १६३२ रोजी. त्यानंतरच काम सुरू झाले असे म्हणायला काहीच हरकत नसावी ताजमहाल आहे यमुनेच्या काठी. तिला वर्षातून दोनदा पूर येतो. एकदा पावसामुळे, एकदा हिमालयात बर्फ वितळल्याने. जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर ह्या महिन्यात यमुना नदी दुथडी भरून वाहात असते. तेव्हा ऑक्टोबर १६३२ मध्ये बांधकाम सुरू झाले असणार पुराच्या पाण्यातून सरक्षण करणाऱ्या भिंती प्रथम बांधल्या असतील की नाही ? पण त्याचा तर मंडी उल्लेखच करत नाही. शिवाय यमुनेचा काठ वर्षानुवर्षे वाहून आलेल्या गाळामुळे बनलेला आहे ७००–८०० फूट खोल गेल तरी दगड लागत नाही तरी सुद्धा खोल पायाच्या विहिरी बांधत होते असे मंडी म्हणत नाही बांधकाम सुरू झाल्याबरोबर एकदम रत्नजडित सोन्याचा कठडा कोठून आला ? सोने चांदीच्या वस्तू कशा आल्या? संगमरवरी दगड कोठून आले ? तेव्हा मंडीच्या वर्णनाचा खोलवर विचार केला पाहिजे.

जाट लोकानी १६९१ साली औरंगजेबाविरुद्ध बंड केल तेव्हा त्यानी ताजमहालातल सोननाणं लुटून नेल व दोन चांदीची दारे तोडली आणि वितळवलीही असा आरोप आजही केला जातो. त्यात कितपत सत्य आहे ते बघू.

१६६५ साली बर्नियर नावाच्या फ्रेंच डॉक्टरने ताजमहाल बघितला. त्याच्या वर्णनात तिथे चांदीची दारे असल्याचा किंवा सोने-चांदीच्या मौल्यवान वस्तू दिसल्याचा उल्लेख नाही. पण हाच डॉक्टर मोगलाच्या प्रत्येक परगण्यातून किती महसूल येतो ह्याचा तपशील मात्र देतो.

१६४०–४१ च्या हिवाळ्यात तिथे गेलेल्या मॅन्रिकच्या वर्णनातही सोनेचांदीचा उल्लेख नाही. वरील दोन्ही वेळेला तिथे गेलेल्या टॅव्हर्नियरच्या पुस्तकातही सोने-चांदीचा उल्लेख नाही. सगळ्या युरोपियन प्रवाशाना कावीळ झाली होती असे म्हणायचे काय ? हेच प्रवासी खिचडी कशी करतात, पान म्हणजे काय इतका बारीकसारीक तपशील देतात टॅव्हर्नियरच्या ९०० पानी पुस्तकात पैसा, पैसा, पैसा ह्याशिवाय दुसरे काहीही नाही. बैलजोडीची किंमत काय, हत्ती ठेवायला किती खर्च येतो, शिवाजीला एका किल्ल्याची डागडुजी करताना गुप्त धन कसे सापडले, मोगलाच्या खजिन्यात केवढे व कोणकोणते हिरे आहेत, हिऱ्याच्या खाणी कोठे आहेत, असा अनेक तपशील तो देतो. फार काय सांगावे, त्याच्या भावाच्या मर्तिकाला किती खर्च आला ह्याचाही हिशोब त्याने दिला आहे ! असा व्यापारी ताजमहालातल्या कसल्याही मौल्यवान गोष्टीचे वर्णन करत नाही हे कसे ?

आता प्रश्न असा की मंडीला दिसलेल सगळ सोननाणं १६३२ ते १६४० ह्या काळात कुठे गुडूप झाले ? शहाजहाननेच ते लुटून नेल असल पाहिजे. अर्थात्‌च ताजमहाल ही त्याने बांधलेली वास्तू नसणार. ती इमारत अस्तित्वात असलीच पाहिजे. म्हणूनच मंडीला पायाचे, पुराच्या पाण्यापासून सरक्षण करणाऱ्या भिंतीचे बांधकाम दिसले नाही त्या दुसऱ्या कोणाच्या तरी इमारतीचे थडग्यात रूपांतर करून त्याचे जगापुढे प्रदर्शन करायचे होते म्हणून आजूबाजूच्या टेकड्या सपाट करण्याचे काम चालले होते.

मंडीच्या पुस्तकात २०८/२०९ पानावर तो म्हणतो, '...आग्र्यात व आसपास प्रेक्षणीय वास्तू खालीलप्रमाणे— लाल किल्ला, अकबराचे थडगे, ताजमहालाचे थडगे, बागा आणि बाजार...' ह्याचा स्पष्ट अर्थ असा की १६३२ साली ताजमहाल अस्तित्वात होताच आणि लाल किल्ल्याइतकाच भव्य होता. 'थडग्याचे काम जोरात सुरू झाले आहे.' ह्या वाक्याचा अर्थ एवढाच की अस्तित्वात असलेल्या इमारतीचे थडग्यात रूपांतर करणे सुरू झाले होते. (कुराणातले उतारे कोरणे वगैरे) **मंडीचे २०८/२०९ पानावरचे वाक्य आजवर सगळ्या इतिहासकारांनी सफाईने टाळले आहे.**

आता ताजमहालाचा प्लॅन निरखून पाहिल्यास अनेक गोष्टी खटकू लागतात. आग्नेय कोपऱ्यात शहाजहानच्या पहिल्या बायकोचे— सरहाणी बेगमेचे थडगे आहे. वायव्य कोपऱ्यात सतिउन्निसा खानम् नावाच्या झनानखान्यावर देखरेख ठेवणाऱ्या दासीचे थडगे आहे ताजमहाल हे जर मुमताजचे मुद्दाम खास बांधलेले थडगे आहे तर तिथे ह्या बायांची थडगी कोठून आली ? ताजमहालात पहिल्या प्रथम शहाजहान व मुमताजची जी थडगी दिसतात ती खरी नसून २०–२५ पायऱ्या उतरून गेल्यावर तिथे खरी थडगी आहेत असे सांगतात. ही चक्क थाप आहे. बाहेर जाऊन नदीकाठी गेल्यास ह्या (तथाकथित) खऱ्या थडग्याखाली आणखी दोन मजले आहेत असे दिसते. शहाजहानच्या काळापासून ते बंद केलेले आहेत. ते आजही न उघडण्याचे कारण काय ? ८० वर्षांपूर्वी दोन जिने उघडकीस आले. २२ खोल्या साप-

डल्या. पण आजूबाजूच्या अनेक खोल्या अजून का बंद आहेत ? ताजमहाल हे जर खरोखरच थडगे असेल तर हे मजले व खोल्या उघडायला सरकार का घाबरत आहे ? 'हीथ टॅव्हल्स्' ह्या एडवर्ड हीथच्या १९७७ सालच्या पुस्तकात ९८–९९ पानावर हे मजले दाखवणारा सुंदर फोटो आहे.

### अस्सल पुरावा

१९०० साली एक इंग्रजसाहेब आणि दोन मुसलमान सहाय्यक ह्यानी ताजमहालाची पहिल्यांदा पाहणी केली. त्यांच्या प्लॅनमध्ये एक गोशाळा आहे (इंग्रजीतसुद्धा हाच शब्द वापरला आहे) आजही दोन नगारखाने आहेत. ताजमहाल हिंदू कारागिरानी बांधला म्हणून तिथे ॐ, शंख, कलश, नाग, घंटा अशी चिन्हे स्पष्ट दिसतात असे खुळेपणाने सांगितले जाते. (जगाच्या इतिहासात असे एकही उदाहरण नाही.) ते क्षणभर वादापुरते मान्य केले तरी थडग्यात नगारखाने व गोशाळा कशा येतील ?

नवीन नवीन पुरावे आले की इतिहासात बदल करावे लागतात. १६५२–५३ साली ताजमहालाचे काम पुरे झाले असे सांगतात. नेमक त्याचवेळी औरंगजेबाने शहाजहानला लिहिलेले एक पत्र आहे. अदाब-ए-आलमगिरी यादगार-ए-आलमगिरी ह्या दोन बखरीत हे पत्र होते. पण अनेक वर्षे त्याच्याकडे कोणी लक्ष दिल नव्हते. १९४६ साली भारताच्या पुराणवस्तू संशोधन खात्याने त्याचा अनुवाद प्रसिद्ध केला. औरंगजेब लिहितो 'थडग्यावरचा मुख्य घुमट दोन ठिकाणी गळत आहे. छोटे घुमटही गळत आहेत. दुसऱ्या मजल्यावरच्या गॅलऱ्या गळत आहेत. उत्तरेकडचे चार महालही गळत आहेत. तळमजल्यावरच्या सात मजल्याना तडे गेले आहेत. गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात मुख्य घुमटाची गच्ची गळू लागली होती. ती दुरुस्त केली आहे. येत्या पावसाळ्यात ही दुरुस्ती कितपत पक्की झाली आहे ते कळेल. गेल्या पावसाळ्यात मशीद आणि जमायतखाना (धर्मशाळा) ह्याचे घुमटही गळू लागले आहेत...'

एवढे सगळे असून औरंगजेबाने कोणाची सालडी सोलली नाहीत. कोणालाही हत्तीच्या पायी दिले नाही. कोणाचीही कानउघाडणीसुद्धा केली नाही. उलट तो म्हणतो, 'मी तात्पुरत्या दुरुस्त्या करून घेतल्या आहेत. तुम्ही पक्क्या दुरुस्त्या करून घ्याव्या.' ह्याचा स्पष्ट अर्थ असा की उस्ताद इसा आणि मंडळींना बऱ्याच लोकांनी मास्टर आर्किटेक्ट वगैरे जरी म्हटले असले तरी ते साधे मजूरच होते. त्यानी ताज बांधलाच नव्हता तर तो गळू लागल्याबद्दल त्यांना कसे जबाबदार धरता आले असते ? म्हणूनच औरंगजेबाच्या पत्रात एकाचेही नाव नाही. १६५२ पर्यंत ताजमहाल बराच जुना झाल्याने गळू लागला होता.

शहाजहानच्या कारकिर्दीच्या पहिल्या २० वर्षाची रोजनिशी लाहोरी नावाच्या लेखकाने ठेवली आहे. 'त्याच्या बादशहानाम्याच्या पहिल्या खंडात ४०३ पानावर शहाजहानने राजा जयसिंगाकडून जमीन विकत घेतली असा उल्लेख आहे.' असे सर यदुनाथ सरकार लिहितात. ह्या खोटारडेपणाला सीमा नाही. त्या पानावर लाहोरी लिहितो 'मुमताझ-उल् झमानीला पुरण्यासाठी राजा मानसिंगाचा महाल निवडला. (त्या वेळी) तो राजा मानसिंगाचा नातू राजा जयसिंग ह्याच्या ताब्यात होता. वडिलोपार्जित इस्टेट म्हणून त्याला त्या महालाचा फार अभिमान होता. पण मुमताजला पुरण्यासाठी त्याने तो महाल आनंदाने फुकट दिला असता. (असा कोण देईल ?) तसे करणे प्रशस्त न वाटल्याने त्याला महालाच्या बदली सरकारी जमिनीचा एक तुकडा दिला (कुठे ? केवढा ? हे मात्र दिले नाही) ..' दिल्लीचे श्री. पु. ना. ओक ह्यांच्या 'द ताजमहाल इज ए टेंपल पॅलेस' ह्या १९६८ सालच्या पुस्तकात वरील पानाचा शब्दशः अनुवाद दिला आहे.

आज आपण जो ताजमहाल बघतो तो राजा मानसिंगाचा महाल आहे. डच इस्ट इंडिया कंपनीचा एक डायरेक्टर डी ले जोन्स् ह्याने १६३१ साली 'द मुगल एम्पायर' नावाचे पुस्तक छापले. त्यात आग्रा शहराचे वर्णन आहे जोन्स् म्हणतो '...लाल किल्ला सोडल्यावर एक मोठा बाजार लागतो. नंतर खालील बड्या लोकाचे महाल लागतात. ते असे– मिर्झा अब्दुल्ला, डागा नौरस, झेहेना खान, मिर्झा चोरम्, महाबत खान, खान आलम्, राजा भरतसिंग आणि राजा मानसिंग...'

ह्या राजा मानसिंगाच्या महालात मुमताजला पुरली असे बादशहानाम्यात स्पष्ट म्हटले आहे. थोडा आणखी अभ्यास केल्यास ताजमहाल हे जुने शंकराचे देऊळ होते हे लक्षात येते.

एवढा सगळा अस्सल पुरावा असताना 'ताजमहाल हे शहाजहानने बांधलेले थडगे नसून तो हिंदूंचा प्रासाद आहे.' हे सत्य भारतीय इतिहासकार मान्य का करत नाहीत ? उत्तर सोपे आहे. पद्मिनीची कथा केवळ काल्पनिकच कशी आहे हे ठासून सांगण्यात जे शौर्य आहे ते 'ताजमहाल हे थडगे नसून हिंदूंचा प्रासाद आहे' हे सांगण्यात कसे असणार? शिवाय ताजमहालाचे सत्यस्वरूप मान्य केले की आग्रा–दिल्ली येथील लाल किल्ले, कुतुबमिनार, ठिकठिकाणच्या जामा मशिदी, विजापूरचा गोलघुमट अशा सगळ्याचाच पुन्हा विचार करावा लागतो आणि बुद्धी गहाण न टाकता तर्कशुद्ध विचार केला तर ह्या सगळ्या हिंदू राजानी बांधलेल्या वास्तु आहेत, मुसलमानानी फक्त जबरदस्तीने काबीज करून नावे बदलली, इस्लामी शिल्पशास्त्र अशी काही चीजच नाही हे लक्षात येते गेल्या १२०० वर्षांचा आपला इतिहास किती धादांत खोटा आहे हे कळते. खरा इतिहास लिहिण्याचा प्रचंड खटाटोप करण्यापेक्षा तीन शहाण्या माकडांप्रमाणे डोळे, कान व तोंड बंद करून घेणं सोपं.

ह्या पुनर्लेखनासाठी श्री. ओक आणि मित्रमंडळी ह्यानी एक संस्था १९६४ साली स्थापन केली. त्याचा पत्ता–

द इन्स्टिट्यूट फॉर रिरायटिंग इंडियन हिस्टरी
एन् १२८. ग्रेटर कैलास १
नवी दिल्ली ११००४८

आजीव सभासदत्वाची वर्गणी फक्त ३०० रु. आहे. इंग्लंडमध्ये रायली, मॅक्सवेल, लोमॅक्स ब्रॉडबेंट, क्रुस, क्रो हे शिल्पशास्त्राचे प्राध्यापक विचार करू लागले आहेत. अमेरिकेत प्राध्यापक मिलस् ह्यानी आमचे म्हणणे मान्य केले आहे. इस्लामी शिल्पशास्त्रातर तज्ज्ञ समजले जाणारे जगप्रसिद्ध सर ह्यू कॅसन हेसुद्धा विचार करू लागले आहेत. त्यानी आज्ञा केली की मग आमचे इतिहासकार जागे होणार. तशी आपली परंपराच आहे. □

# सेवानिवृत्तांचे प्रश्न

अंगम गलितम्, पलितम मुडम् दशन विहीन जातम् तुडम ।
वृद्धो याति गृहित्वा दण्डम्, तदपिन मुन्चलि आशा पिण्डम ।।

—अशा काव्यमय प्रकारे वृद्धत्वाचे वर्णन केले आहे आद्य शंकराचार्यांनी ! वृद्धत्व म्हणजे काय ? असे जर विचारले तर अनेक व्याख्या समोर येतील— दुसरे बालपण येथपासून ते जीवनाची सायकाळ. परंतु अनेक वृद्धाना या बालपणात रमण्यापेक्षाही उदासीन सायकालातच हरवून बसणे आवडते. नव्हे तशी त्याची प्रवृत्ती होते ! 'सध्या छाया भिवविती हृदया' या भा. रा. तांबे याच्या ओळीतच ते गुततात.

वृद्धत्व हे अटळ आहे, निसर्गक्रमाने येणारच आहे हे सारे तत्त्वज्ञान खरे आहे. पण या तत्त्वज्ञानाला सामोरे जाण्याची तयारी किती जणामध्ये असते ? वा कितीजण योजनापूर्वक त्याचे स्वागत करतात ? अपवादात्मक परिस्थिती सोडली तर अपरिहार्यपणे या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच येते आणि मग सुरू होतात त्या अनत समस्या ! या समस्या सोडविताना दमछाक होते, धापा लागतात. आलेल्या विविध अनुभवांमुळे 'जळो ते म्हातारपण' अशी प्रतिक्रिया कोणा वृद्धाकडून झाली तर नवल कसले ?

पुण्यातील सेवानिवृत्ताच्या समस्याचा आढावा घेताना वारवार जाणवत होतं की हे प्रश्न बिकट आहेत, बिकट बनू शकतात आणि या समस्याकडे समाजाची डोळेझाक कशी बेडरपणे चालू आहे !

हे प्रश्न कसे दुर्लक्षिले जात आहेत हे सांगताना ज्येष्ठ नागरिक श्री. पु. शं. पतके म्हणाले, 'वाढत्या जीवन स्पर्धेमुळे तरुणांना वेळ नाही आमच्या प्रश्नामध्ये काही सनसनाटी नाही म्हणून वृत्तपत्राचे दुर्लक्ष आणि राजकारण्याचा ओढा तर फक्त गठ्ठा मतांकडे !'

'मात्र आता आमचे मतदार सुधारत्या आयुर्मानामुळे वाढत आहेत आणि या पॉकेटकडे दुर्लक्ष करणे राजकारण्यांना निश्चितच जड जाईल !' अशी कोपरखळीही त्यानी मारली.

सेवानिवृत्ताचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पुण्यनगरीत साठी पुढचे किमान २ लाख तरी लोक आहेत आणि सेवानिवृत्तांचा यातील वाटा लाखाहून थोडा अधिकच आहे. म्हणजेच पुणेकराच्या ५.५% ते ६५% लोक निवृत्तीनतरचे आपले जीवन पुण्यात व्यतीत करत आहेत.

या लोकांच्या प्रश्नाचा मागोवा घेताना सहज जाणवले की ढोबळमानाने तीन प्रश्न आहेत आणि त्याभोवतीच सारे फिरत आहेत—

१) आर्थिक २) सामाजिक ३) आरोग्य— अ) शारीरिक ब) मानसिक

## निवृत्तीनंतर नोकरी

बहुताशी सेवानिवृत्त वृद्ध (ज्याना 'वृद्ध' म्हणण्यापेक्षा ज्येष्ठ नागरिक ( Senior Citizons) म्हटलेलं अधिक आवडतं !) आर्थिक प्रश्नाशीच सबधित आहेत आणि या प्रश्नावर बोलणच या मडळीना अधिक आवडत. साहजिक आहे— जगण्यासाठी पुरेसा पैसाच नसेल तर इतर प्रश्नाची काय पत्रास बाळगावी ?

निवृत्तापैकी अवघे १% लोक आर्थिक सुस्थितीत आहेत. त्याना दरमहा ८०० रु. पासून १००० रु. पर्यंत निवृत्ती वेतन मिळते. ४०% लोक ३०० रु.– ८०० रु. या श्रेणीत निवृत्ती वेतन घेतात आणि ५०% लोक असे आहेत की, त्याचे निवृत्तीवेतन अल्प आहे किंवा निवृत्तीवेतनच नाही. कापड दुकान, किराणा दुकान यातील विक्रेते, दिवाणजी कधीना कधी निवृत्त होतात आणि मालक देईल त्या थोड्या पुजीवर त्याना भागवावे लागते

निवृत्तीवेतनाबाबत सर्वात वाईट अवस्था आहे प्राथमिक शिक्षक व चतुर्थश्रेणी कर्मचारी याची ! अर्थात १९७९ नंतर जे निवृत्त होत आहेत त्याची अवस्था पूर्वीपेक्षा खूपच बरी असल्याचे लोक मान्य करतात. प्राथमिक शिक्षकाना १९६४ पासून निवृत्ती वेतन सुरू झाले. खाजगी प्राथमिक शिक्षकाना १९७९–८० मध्ये ते मिळाले तर प्राध्यापक वर्गाला त्यासाठी ८२ साल उजाडायची वाट पहावी लागली.

त्याआधी जे निवृत्त झाले त्याच्यासाठी adhock pension नावाचा एक क्रूरविनोदी प्रकार उपलब्ध होता. मायबाप सरकारने दयार्द्र बुद्धीने आपली कृपासृष्टी या पामरावर टाकली आणि प्रतिमहा रुपये ८० ते रु. १२० अशा भरगच्च श्रेणीत या साऱ्या मडळीना उपकृत केले. नुकतीच या श्रेणीत सरकारने सरसकट ३० रु. ची वाढ करून उपकाराचे ओझे वाढविले आहे. आता ११०–१५० रुपयात या लोकाचे कसे भागते देव जाणे ! adhock pensioners म्हणून बदनाम झालेले हे दुर्दैवी लोक पुण्यात ५०० च्या आसपास आहेत.

यातूनच गरज निर्माण होते ती सेवानिवृत्तीनतरही सवेतन काम करण्याची ! जवळपास ८०% लोक याबाबत आग्रही आहेत. कारण ४०% लोक कर्जबाजारी आहेत. यातील निम्म्या लोकाची तयारी कसलेही काम करण्याची आहे. वेळ घालवण्यासाठी नोकरी करू इच्छिणाऱ्याचे प्रमाण अल्प आहे. पण नोकऱ्या कमी, उमेदवार भरपूर हा प्रकार येथेही आहे ! याबाबत थोडे फार सुदैवी आहेत ते पोलीस व सैन्यदलातील निवृत्त १९६४ नतर पुणे आणि परिसरात औद्योगीकरणाची प्रचंड लाट आल्याने 'सुरक्षा अधिकारी' security guards यांची मागणी वाढली. मात्र इतराना फारसा वाव नाही मग कोठे तरी ८ तास कारकुनी करत २५०–३०० रु. मिळव, खाजगी शिकवण्या कर (त्याचीही संख्या आता so called Tution, Classes ने रोडावली आहे) अशी धडपड करून भागवाभागवी होते नोकरी हवी ही मागणी ६०–६५ याच वयोगटाची प्रामुख्याने आहे

'सेवानिवृत्ती वेतन मिळण्यास आता फारशा अडचणी येत नाहीत आमच्या सघटनेची ताकद वाढल्यामुळे अशा केसेस आम्ही 'वरपर्यंत' लढविनो.' महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशनचे श्री. खानवेलकर सागत होते. 'लाल फितीमुळे थोडाफार उशीर होतो खरा', पण ही प्रवृत्ती आता आपण मान्य केली पाहिजे अशी त्यांची धारणा होती.

आणि त्याच्या या म्हणण्याशी बहुतेक लोक सहमत होते. तांत्रिक त्रुटी, सेवा पुस्तिकेत नोंदी नसणे, रजा न मांडणे यामुळे थोडाफार उशीर होतो आणि एवढा उशीर सहन करण्यापर्यंत लोकांची सहनशक्ती वाढली आहे. 'सरकारी G. R. निघूनही अमलबजावणीस बराच उशीर होतो.' नवीन जाहीर होणाऱ्या विविध सवलतींना उशीर होतो अशी खत श्री. जोगळेकर (चिटणीस, महापालिका सेवानिवृत्त संघ) यानी व्यक्त केली.

## वृद्धाश्रम-दोन मते

सेवानिवृत्तीनंतर रिकाम्या वेळात काय करायचे ? हा प्रश्न कित्येकांना जाणवत आहे. त्यावर उपाय सुचविले जातात, समाज सेवा करा, छंद जोपासा इ. इ. हे सारे आदर्श आहेत–

कारण समाजसेवकांना सल्ला मिळतो, 'घरचं खाऊन लष्कराच्या भाकरी भाजायचं पुरे !' छंद जोपासणाऱ्यांना आहेर मिळतो. 'कसले छंद नी काय ? म्हातारचळ लागलाय !'

या परिस्थितीत 'आई जेऊ घालीना...' अशी अवस्था या ज्येष्ठ नागरिकाची होते. लहान जागेमुळे घरातही बसणे अशक्य होते. पुरुष बाहेर जाऊ शकतो पण खरी कोंडी होते ती स्त्रीची ! नवरा, मुले, सुना, नातवंडे या साऱ्याचा अहंकार तिला सांभाळावा लागतो. त्यातून नोकरदार सून असेल तर बातच नको. तिने पूर्वी नोकरी केली असेल तर त्यावेळीही तिला आराम नाही आणि आता तर मुळीच नाही अशा वातावरणात घरात कटकटी, कुरबुरी सुरू होतात आणि मग व्यथा सुरू होते वृद्धाश्रमाची !

खरे तर आपल्याकडील वृद्धाश्रम शाही आहेत. संपन्न लोकानाच ते परवडू शकतात. तरीही या प्रश्नावर दोन टोकाची मते व्यक्त झाली.

'भारतीय संस्कृतीत वृद्धाश्रम कसोटीला उतरणार नाहीत. सरकारचे धोरण ही वृद्धाश्रमाना प्रोत्साहन देण्याचे नाही आणि ही ब्याद आपल्याकडे नकोच !' श्री. पु. शं. पतके म्हणाले 'यावर तुमचा उपाय काय ?' असे विचारता Day care centre ची कल्पना त्यानी मांडली. अशा केंद्रात वृद्ध दिवसा एकत्र जमतील, हसतील, खेळतील हवे ते करतील आणि सायंकाळी आपापल्या कुटुंबात परत जातील. कौटुंबिक जीवनाची घडी न मोडताही वृद्ध आपले स्वतंत्र जीवन जगतील ही त्याची कल्पना !

एका निवृत्त आय. पी. एस. अधिकाऱ्याने थोडेफार असेच विचार व्यक्त केले. त्याची सूचना आहे की शहरांपासून थोडे दूर विश्रामगृहे हवीत अशी की जिथे सर्व स्तरातील ज्येष्ठ नागरिक ठराविक काळाने एकत्र येऊन तेथे राहून उत्साहाचा नवीन स्त्रोत घेऊन आपापल्या कुटुंबात परततील.

या दोन्ही प्रकाराना श्री. खानवेलकरानी वास्तवतेची कसोटी लावली. Day care centre मध्ये हे लोक ८–१० तास कसे बसणार ? त्यांना तेथे आणणार कोण ? आणि पुणे शहराची प्रचंड व्याप्ती बघून किती केंद्रे आपण उघडू शकतो ? विश्रामगृहाच्या कल्पनेत ही अशाच अडचणी आहेत. प्रवासखर्च, राहण्याचा खर्च किती जणाना परवडणार आहे ? सोबत, आजार यासारखे प्रश्न उद्भवणारच !

'दहा वर्षापूर्वी पाळणाघरे विशेष नव्हती, आज ही गरज आपण मान्य केली आहे. वृद्धाश्रम ही त्याच अवस्थेत आहेत. ती काळाची गरज आहे.' श्री. खानवेलकर सांगत होते, 'मात्र वृद्धाश्रम सर्वांना परवडणारे हवेत !'

या सर्वापेक्षा थोडी समतोल प्रतिक्रिया श्री. जोगळेकर यानी व्यक्त केली. 'वाढत्या दुराव्यामुळे आणि जागेच्या अडचणीमुळे वृद्धाश्रम हवेत.' वृद्धामध्ये समजुतीचा अभाव आहे आणि त्यामुळेच प्रश्न गंभीर आहे हे त्याचे मत. ८० ते ९०%मुले कृतघ्न नाहीत त्याना आई–वडलाची गरज आहे पण वृद्धच आपल्या प्रश्नाचा बाऊ करतात, एकाकीपणाचे भांडवल करतात !

वृद्धाश्रमाजवळ तरुणांची वसतीगृहे / अनाथ मुलांच्या बालवाड्या, गृहे असली तर दोन्ही एकमेकाना पूरक ठरतील, एकमेकाच्या अडचणी सोडविण्यास सहायभूत होतील, असे मत एका सद्गृहस्थानी व्यक्त केले. त्याच्या म्हणण्याप्रमाणे वृद्धांची भाजी आणणे, औषधे आणणे वगैरे कामे ही मुले करतील तर अभ्यासात मदत करणे, अनुभवाचा सल्ला देणे आणि थोडेसे प्रेम देणे ही मदत वृद्ध सहज करतील.

अशा प्रकारचा समन्वय हिंगण्याच्या तिसऱ्या आश्रमात साधला आहे. त्याच्या या गृहात फक्त स्त्रिया आहेत. त्याच्या सर्व कामाची जबाबदारी त्याच उचलतात. जोडीला पूरक बालवाडी आहे. या आश्रमात डॉ. चांदेकर, डॉ. मंगला पटवर्धन व डॉ. वाय. बी. फाटक याच्या सहकार्याने मोफत वैद्यकीय मदत पुरविली जाते.

'शतायु भवन' हा अत्यंत खर्चिक व महाग वृद्धाश्रम ! तर 'निवारा' अत्यंत बिकट अवस्थेत आहे. त्यात ८० माणसे असून सर्व सोयी मोफत आहेत. संजय निराधार योजनेचे माणशी ९० रु. हेच त्याचे मात्र साधन !

वृद्धाश्रम सर्वसामान्यांना परवडण्यासाठी सरकारने जागा देऊन थोडे सहाय्य करावे, ही मागणी प्रामुख्याने साऱ्यांचीच !

## आरोग्य

या वयात प्रामुख्याने शारीरिक त्रास होतो. मधुमेह, रक्तदाब, सांधेदुखी ही मंडळी दोस्ती करायला चिकटतात. आपल्याला काहीतरी होणार ही भावना पुष्कळाची !

तुटपुंज्या आर्थिक वेतनात ह्या औषधांचा खर्च कसा भागवायचा ? हा प्रश्न आ वासून उभा आहे काही सामाजिक संघटना मोफत आरोग्य शिबिरे भरवून आपला वाटा उचलीत आहेत.

श्री. जोगळेकर यांची शिक्षक संघटना ही अनुकरणीय कार्य करत आहे. डॉ. आपटे याच्या सहकार्याने अवघ्या १० रु. त तज्ज्ञ डॉक्टराकडून सभासदांची तपासणी करतात. तसेच डॉ. कुऱ्हाडे याच्याकडे तपासणी करून संघटनाच त्याचे शुल्क देते. Scentral Govt. Health Scheme सध्या फक्त ४ महानगरात आहे. त्याची व्याप्ती वाढविण्याची गरज आहे.

यावर उपाय म्हणजे स्वस्त सार्वजनिक आरोग्य सेवा ! '*आपल्याला काही होतय*' ही भावना घालविण्यासाठी ठराविक दिवसानी प्रकृती तपासणी करणे आवश्यक आहे.

रिकामा वेळ भरपूर असल्यामुळे विचार वाढतात. 'मृत्यू, परावलंबीपणा' याची स्वप्ने अधिक शैथिल्य आणतात. चिडखोर-

पणा, हट्टीपणा वाढतो, एकाकीपणाचे भांडवल होते !

### प्रसारमाध्यमांकडून अपेक्षा

या प्रश्नाचा अर्थच खूप जणांना कळला नाही. पु. शं. पतके यानी मात्र तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. हाजी हाजी करून आकाशवाणी दूरदर्शनवर प्रसिद्धी मिळेल पण ती त्याना नको आहे.

पेन्शनर्स असोसिएशनच्या मते 'सकाळ', 'महाराष्ट्र टाईम्स' याचा प्रतिसाद चागला आहे. दूरदर्शन वगैरेंकडून काही विशेष अपेक्षा ठेवाव्यात असे त्याचे मत दिसले नाही.

वृद्धासाठी आरोग्यविषयक व्याख्याने, लेख, आहारासबंधी मार्गदर्शन वाढले पाहिजे असे काहीनी मत व्यक्त केले.

एकदरीत साकल्याने विचार करता आर्थिक प्रश्नाचा सुकाळ आहे, पण त्यासंबंधात हळूहळू पण निश्चितपणे सुधारणा होत आहे. सामाजिक प्रश्नाची अद्याप पुरेशी जाणीव नसली तरी आर्थिक प्रश्न सपू लागल्यावर याची जाणीव होईल आणि तो प्रश्न गभीर बनेल यासाठी आतापासून पिढ्यामधील दुवा जपण्याची आवश्यकता आहे. ही जबाबदारी प्रसारमाध्यमे, समाजाने पार पाडणे आवश्यक आहे.

आरोग्यविषयक प्रश्न नाजूक आहे. 'मला काहीतरी होतंय' ही भावना घालविण्यासाठी आरोग्य तपासणी नियमित व अल्पखर्चात होणे जरूर आहे.

या सर्व जबाबदाऱ्या सरकारप्रमाणे आपणही पार पाडायला हव्यात. कारण मनुस्मृतीत म्हटले आहे–

'अभिवादन शीलस्य:
नित्यम् वृद्धोपसेविना
चत्वारितस्य वर्धनते,
आयुर्विद्या यशोबलम।'

–सतीश कुलकर्णी



## जगाला भेडसावणारी नवी व्याधी

# एड्स

सुखसमृद्धी आणि संपन्नतेची सर्वोच्च शिखरं सर करणाऱ्या अमेरिकेसारख्या सर्वाधिक श्रीमान देशाला पृथ्वीवरचा साक्षात स्वर्गच मानल जात. तस पाहिल तर या विधानात काहीही अतिशयोक्ती नाही. कठोर परिश्रम, खडतर तपश्चर्या याच्या जोरावर अमेरिकन लोकानी आपल्या मायभूमीच अक्षरश: नदनवन बनवल आहे. म्हणून तर पृथ्वीच्या पाठीवरील बहुतेक सर्व देशातल्या महत्त्वाकांक्षी तरुणाच्या मनात अमेरिकेत जाऊन स्थायिक होण्याची इच्छा असते. पण आपण समजतो तसं या 'नदनवना'तले लोक सर्वार्थान खरोखरच सुखी आहेत का? प्रकार नेमका उलटा आहे. अमेरिका म्हणजे एक सुरेख, सोनेरी सिहासन आहे आणि या सिहासनाच्या माथ्यावर केसानं टागलेल्या अनेक सुप्त तलवारी आहेत. जीवनातले सर्व आनद भरभरून उपभोगणाऱ्या सदाबहार अमेरिकन लोकाना सदैव कुठल्या ना कुठल्या भीतीन पछाडलेलं असत. सर्वविनाशी अणुयुद्धाचा अमेरिकन लोकानी इतका धसका घेतलाय की त्याना स्वप्नातही बेचिराख होणारी अमेरिका दिसत असते. तसच आतरराष्ट्रीय दहशतवादानं देखील अमेरिकन लोकाच्या मनात विलक्षण दहशत निर्माण केली आहे. पण या दोन्ही प्रकारच्या भीतीना मागं सारून अमेरिकन जनमाणसाला भयचकित करून सोडणारी एक निराळीच समस्या तिथं निर्माण झाली आहे. आजच्या घडीला ही विचित्र समस्या म्हणजे एड्स–AIDS (गर्द). ५ वर्षापूर्वी ज्या आजाराचं नावही ठाऊक नव्हत त्या आजाराची आज जगभर चर्चा सुरू झाली आहे. हा आजारच तसा भयकर आहे. या आजाराच्या मगरमिठीत सापडलेल्या माणसाला मृत्यू हाच सुखद पर्याय ठरू शकतो.

### एड्सचं आगर–अमेरिका

एड्स–AIDS म्हणजे 'अॅक्वायर्ड इम्युन डिफिशियन्सी सिंड्रोम.' या रोगाची बाधा ज्या व्यक्तीला झाली असेल त्या व्यक्तीची रोगप्रतिकार शक्ती पूर्णपणे नाहीशी झालेली असते. त्यामुळं किरकोळ वाटणारे इन्फ्ल्युएन्झा, हिवताप, सर्दी खोकला यासारखे आजारही या व्यक्तीच्या बाबतीत अतिशय उग्र स्वरूप धारण करतात. एरवी असे निरूपद्रवी आजार नुसत्या विश्रातीन वा अॅस्प्रो, अॅनासिनच्या गोळीन बरे होऊ शकतात. पण एड्सन ग्रासलेल्या व्यक्तीला औषधोपचार करूनही हे सामान्य आजार प्राणघातक ठरू शकतात. मोठ्या आजाराच तर विचारायलाच नको. न्युमोनिया, कावीळ, क्षय व कॅन्सर यासारखे गभीर स्वरुपाचे आजार एड्स् झालेल्या व्यक्तीवर पहाता पहाता झडप घालतात आणि चटकन् त्याचा बळी घेतात. या व्यक्तीवर कसलेही इलाज वा औषधोपचार लागूच पडत नाहीत. त्यामुळं एड्स् झालेल्या व्यक्तीला कोणत्याही लहानमोठ्या आजारानं ग्रासलं की तो मृत्यूची वाटचाल करू लागला असं खुशाल समजाव.

या आजाराच सर्वाधिक प्रमाण आढळतं ते अमेरिकेत. आज मितीला एड्सनं पछाडलेल्या व्यक्तीची सख्या अमेरिकेत सुमारे २० लाखाच्या आसपास आहे. त्या खालोखाल नबर लागतो तो युरोपीय राष्ट्रांचा. जर्मनी, फ्रान्स, इटली, इग्लड इत्यादी देशात मिळून सुमारे पाच लाख लोक एड्सनं ग्रासलेले आहेत. गेल्या वर्षी असं समजण्यात यायच की एड्स् ही पुढारलेल्या देशाची मक्तेदारी आहे. याच कारण म्हणजे सर्वसाधारणत: एड्स् हा रोग समलिंगी सभोग करणाऱ्या व्यक्तीनाच होतो. शिवाय नशा आणणारी औषध घेणाऱ्या व्यसनी व्यक्तीना या रोगाची लागण होते. समलिंगी सभोग आणि अमली पदार्थाचं सेवन याचा प्रसार जास्त करून पुढारलेल्या देशांतच आढळून येतो. त्यामुळं एड्सचे बहुसख्य रोगी तिथं असतात. पण भारतासारख्या आशियाई वा इतर तत्सम प्रगतीची वाटचाल करणाऱ्या

देशांना एड्सपासून मुळीच धोका नाही, असं परवा परवापर्यंत वाटत होत. आता मात्र हा गैरसमज दूर होत आहे. मद्रास, कलकत्ता व मुंबई या महानगरात करण्यात आलेल्या पहाणीत एड्सनं पछाडलेल्या व्यक्तीची संख्या १० हजाराच्या आसपास आढळली. अधिक चिकित्सेन पहाणी केल्यास ही सख्या लाखाच्या घरात जाईल अस तज्ज्ञाचं म्हणणं आहे.

अमेरिकेत एड्सच्या भयगडानं धुमाकूळ घातलेला असताना भारतीयाना या व्याधीचं नाव देखील ठाऊक नव्हतं. पण रॉक हडसनच्या अनपेक्षित आलेल्या मृत्यूच्या बातमीमुळं भारताचं नव्हे तर साऱ्या जगाच लक्ष एड्सनं आपल्याकडं वेधून घेतलं. अमिताभ बच्चनच्या मायस्थेनिया ग्रेव्हीस या असामान्य आजारानं जेवढी लोकाची उत्सुकता वाढवली होती त्याहून जास्त उत्सुकता एड्सन वाढवली.

मायस्थेनिया ग्रेव्हीसमुळं अमिताभची फिल्मी इमेजच संपुष्टात आली. तगडाताठा, बेभानपणे धावणारा अन् १०–१० लोकाशी एका वेळी मारामारी करणारा अमिताभ मायस्थेनिया ग्रेव्हीसमुळ जसा संपला त्या पेक्षा जास्त दारुण अवस्था एड्समुळं रॉक हडसनच्या वाटयाला आली. 'कम सप्टेंबर' या जगभर गाजलेल्या चित्रपटानंतर रॉक हडसनच नाव, 'जगातला सर्वात देखणा पुरुष' म्हणून गाजलं. त्या काळात जगातल्या कोटयवधी तरुणीच्या दिलाची धडकन बनला होता हा हडसन ! अशा या मदनाच्या पुतळयाची अखेरच्या अवस्थेतली छायाचित्रं पाहिली की अगावर काटा उमटल्याखेरीज रहात नाही.

## जीवघेणी लैंगिक व्याधी

एड्स हा आजारच तसा भयभीषण आहे. भल्याभल्याची त्यानं वाट लावून टाकली आहे. *लैंगिक मुक्तीच्या स्वैर लाटेवर* आरुढ झालेल्या अमेरिकन लोकानी रॉक हडसनच्या दयनीय मृत्यूनं एड्सचा भयंकर धसका घेतला आहे. मध्यतरी एड्स हा संसर्गजन्य रोग आहे, अशी बोलवा पसरल्यानतर समलिंगी संभोग करणाऱ्या होमोसेक्शुअल जमातीला अमेरिकेन जवळजवळ वाळीतच टाकलं. अशा व्यक्तींचं चुबनालिंगन घेण वा त्याच्याशी हस्तादोलन करणं अमेरिकन्स टाळू लागले. गेल्या २० वर्षाच्या काळात समलिंगी संभोगाला अमेरिकेत लोकमान्यता *राजमान्यता सारं काही मिळाल होत त्याचे* प्रतिनिधी अमेरिकन सिनेटवर निवडूनही आले अमेरिकेतल्या ६० लाख होमोसेक्शुअल लोकासाठी सर्व तऱ्हेच्या सोईसुविधा शासनानं उपलब्ध करून दिल्या. समलिंगी सभोग ही विकृती नसून नैसर्गिक लैंगिक प्रवृत्ती आहे, असं मानण्यापर्यंत अमेरिकेची मजल गेली. होमोसेक्शुअल लोकांना 'गे कम्युनिटी' ( आनदी पथ ) या विशेषणानं गौरवण्यात आलं. त्याच लोकांमुळं एड्सच्या व्याधीचा प्रसार होतो हे ध्यानात येताच हीच अमेरिका 'गे कम्युनिटीला' महारोग्यापेक्षा वाईट वागणूक देऊ लागली आहे. हे भय इतक विकोपाला गेल की टी. व्ही. च्या एका नेटवर्कनं एड्स् झालेल्या व्यक्तीची मुलाखत ठरवताच ऐन वेळी तिथला कर्मचारी वर्ग बेपत्ता झाला. समलिंगी सभोगाची पार्श्वभूमी असलेल्या सर्व व्यक्तीना मोठमोठ्या हॉटेलातून, हॉस्पिटलातून अन् सभा–समारभातून हद्दपार करण्यात आले. पत्नी पतीला, बहिण भावाला वा लोक स्नेही आप्तेष्टानाही घाबरू लागले. घराघरातून *एड्सच्याशिवाय चर्चेला दुसरा विषय*च उरला नाही. आज तरी अमेरिकन सुखसमृद्धीला एड्सनं खग्रास ग्रहण लावल आहे हे खर !

एड्सनं ग्रासलेल्या व्यक्तीची पहिली अधिकृत नोंद करण्यात आली ती १९८१ सालच्या सुरुवातीला लॉस एजल्स या शहरात. यापूर्वी अमेरिकेत अनेक माणस या व्याधीची शिकार बनत होती. पण या व्याधीचं नेमकं स्वरूप डॉक्टरना वा शास्त्रज्ञाना कळत नव्हत. तापानं फणफणलेले वा भयकर व्याधीग्रस्त, विकलाग अवस्थेत रुग्णालयात दाखल होत. तऱ्हेतऱ्हेचे अत्याधुनिक उपचार करूनही हा विशिष्ट नवा रोग न हटता वाढतच जात असे अखेरीस व्याधीग्रस्त व्यक्ती तडफडत तडफडत मृत्यूच्या आधीन होत असे अशाच व्याधीन ग्रस्त झालेल्या रुग्णांच्या नोंदी न्यूयॉर्क, बोस्टन, शिकॅगो इत्यादी शहरातूनही होऊ लागल्या. ज्या आजाराचं मूळ कारण सापडत नाही अन् ज्यावर औषधोपचार लागू पडत नाहीत, त्या व्याधीचं कोडं उकलण्यास तज्ज्ञ मडळी पुढं सरसावली.

एड्स ही व्याधी एका विशिष्ट विषाणू ( व्हायरस ) मुळं होते, असं तज्ज्ञानी शोधून काढले. व्याधीग्रस्त लोक बहुताशी समलिंगी संभोग करणारे असतात, अस आढळून आलं. जास्त सशोधन करता एड्सचे व्हायरस रक्त, लाळ, पुरुषांचे वीर्य, मातेचं दूध, अश्रू या द्रवाद्वारे शरीरात प्रवेश करतात अस दिसून आल. व्हायरस एकदा शरीरात शिरले की रक्तातील पांढऱ्या पेशीच्या विशिष्ट जातीवर ( T-4 ) हल्ला करून प्रतिकार शक्ती नष्ट करतात. त्यामुळे रुग्ण कोणत्याही इतर रोगाला सहजगत्या बळी पडतो.

एड्सचे व्हायरस सर्वसाधारणत: गुदमैथुनामुळं ( एनलइंटरकोर्स ) शरीरात प्रवेश करतात. त्यामुळं एड्सचे बहुतांशी रुग्ण पुरुषच असतात. पण स्त्रियांना एड्स होत नाही ही पूर्वीची समजूत नतरच्या काळात चुकीची ठरली आहे. उदा. एका पुरुषानं दुसऱ्या पुरुषाशी समलिंगी संभोग केला म्हणजे त्या दोघानाही एड्स होऊ शकतो. त्यानंतर त्यातल्या कुणीही एखाद्या स्त्रीशी सभोग केला तर तिच्या शरीरात योनीद्वारे एड्सचे व्हायरस प्रवेश करतात. आता अशा स्त्रीचा *निरोगी पुरुषाशी सबंध आला* तर त्या साऱ्याना इतर कोणत्याही लैंगिक व्याधी प्रमाणं एड्सची बाधा होऊ शकते याचा अर्थच एड्स् हा गरमी वा परम्यासारखा एक प्रकारचा गुप्तरोगच ( लैंगिक व्याधी ) म्हणायला हवा तस जर असेल तर या रोगाला एवढं घाबरायच कशासाठी ? जगात लक्षावधी लोकाना गुप्तरोग होत असतात. मग एड्सचा एवढा बाऊ कशाला ? याचं साधं अन् सोपं उत्तर अस की, बहुतेक सर्व गुप्तरोगावर उत्तम औषधं निघालो असून उपचारानं ते बरे होऊ शकतात. एड्स्वर मात्र अजून औषधच निघालेलं नाही त्यामुळं एड्सच्या व्याधीन पछाडल को रुग्ण बरा होण्याची शक्यताच नाही म्हणून एकवेळ कॅन्सर परवडला पण एड्स नको, असं अमेरिकन लोक म्हणू लागले आहेत शिवाय एड्स झाला को भयकर बदनामी होते ती वेगळीच. म्हणून तर रॉक हडसनसारखा हॉलिवूडचा टॉप हिरो एड्सच्या व्याधीनं पछाडला गेलाय, हे शेवटपर्यंत गुप्त ठेवण्याचा

आटोकाट प्रयत्न करण्यात आला. पण रॉकच्या इच्छेमुळं, तो गेली १५ वर्षे समलिंगी संभोग करत होता अन् त्यामुळं तो एड्सची शिकार बनला, हे जाहिर करण्यात आलं. आपल्या ज्वलंत उदाहरणामुळे लोक शहाणे होतील असं त्याला मनोमन वाटलं.

रॉक हडसननं आपल्या प्रचंड संपत्तीचा ½ हिस्सा एड्सच्या संशोधनासाठी देऊन टाकला आहे. रॉकच्या दयनीय मृत्यूमुळं विलक्षण अस्वस्थ झालेल्या एलिझाबेथ टेलरनं ( ती रॉकची चाहती व एकेकाळची प्रेमिका होती असं म्हणतात. ) एड्सच्या विरुद्धच्या जागतिक मोहिमेचं नेतृत्व स्वीकारायला आपण तयार आहोत, असं जाहीर करून टाकलय. यावरूनच एड्स या व्याधीची अनन्यसाधारण भयानकता लक्षात यावी. समलिंगी संभोगाविरुद्ध उघडलेल्या आघाडीत हॉलिवूडमधले अनेक नामवंत सितारेसुद्धा आता सामील झाले आहेत.

## संसर्गाची कारणे

एड्सचा प्रसार केवळ संभोगातूनच होतो असं नाही. ज्या व्यक्ती मादक वा अंमली पदार्थांचा वापर करतात. अशा लोकातही या व्याधीचं प्रमाण खूपच आढळून येतं. याची कारण दोन. एक म्हणजे मादक द्रव्याच्या सेवनामुळ शरीर मुळातच पोखरून निघालेलं असतं. त्यातून या लोकांच्यात लैंगिक स्वैरता नको इतकी जास्त असते. अर्थातच लैंगिक संबंधातून एड्सचा प्रसार सहज होऊ शकतो. दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे यातले अनेक नशाबाज लोक एकाच सिरिंजमधून मादक द्रव्य शिरेत टोचून घेतात. कोणतही इंजेक्शन देण्याआधी सिरिंज व सुई उकळून निर्जंतुक करून घ्यावी लागते नशाबाज लोक या गोष्टी कळण्याइतपत शुद्धीवर असतातच कुठे ? एका सुईमुळं एड्सच्या व्हायरसचा प्रसार एकावेळी २०–२० व्यक्तीत झाल्याचं तज्ज्ञाना आढळून आलं आहे.

एड्सच्या व्हायरसचा प्रसार लाळेद्वारे होऊ शकतो. तोंडात जखम झालेल्या व्यक्तीनं एड्सची बाधा झालेल्या व्यक्तीचं चुंबन घेतलं तर त्यालाही एड्सची बाधा होऊ शकते. असं म्हणतात की, कोणतीही भावना प्रदर्शित करण्यासाठी एकमेकांवर चुंबनाची खैरात करणारी अमेरिकन माणसं आजकाल एकेक चुंबन घेण्यासाठी शभरवेळा विचार करू लागली आहेत.

पुरातन काळात ग्रीक पुराणात एड्सचा उल्लेख आढळून येतो. ज्या काळात रोमन साम्राज्यात लैंगिक स्वैरता शिगेला पोहोचली होती त्या काळात काही व्यक्तींना एड्सच्या वर्णनाशी मिळत्या जुळत्या व्याधीनं पछाडल्याच, नोंदवून ठेवण्यात आलं आहे. मध्यंतरीच्या अनेक शतकात अनेक देशातल्या सैन्यातून या व्याधीचा प्रसार झाल्याचं आढळून आलं; पण व्याधीचं नेमकं स्वरुप माहित नसल्यामुळं अन् व्याधीग्रस्तांचं प्रमाण अल्प असल्यामुळं जगानं तिकडं कानाडोळा केला असावा. आता मात्र अत्याधुनिक संशोधनामुळ या आजाराची असाधारणता कळून चुकली आहे.

माणसांत या व्याधीचा प्रसार होण्याआधी मध्य आफ्रिकेतल्या माकडांत ही व्याधी पसरली होती. त्यानंतर या माकडांच्या सान्निध्यात येणाऱ्या जंगली लोकांना ही व्याधी जडली. युरोप अमेरिकेतल्या लोकांची आफ्रिकेतली रहदारी जसजशी वाढत गेली तसतशी या व्याधीची आयात या देशात होऊ लागली. तरीसुद्धा १९६० सालापर्यंत या व्याधीचं प्रमाण अत्यंत नगण्य होतं. पण युरोप अमेरिकेतल्या लैंगिक क्रांतीच्या चळवळीन जसा जोर धरला तसतसं या व्याधीचं प्रमाण पुढारलेल्या देशातून वाढत गेलं.

लैंगिक स्वैराचार अन् अमली पदार्थांचा मुक्त वापर, या दोन गोष्टींचा पुरस्कार करणाऱ्या काही अमेरिकन तरुणतरुणींचा हाईती बेट हा स्वर्ग समजण्यात येत असे. अशा लोकांची टोळकीच्या टोळकी हाईती बेटावर वसाहती करून राहिली होती. तिथून अमेरिकेत परतणारी माणसं हमखास एड्सची व्याधी होऊनच परततात, असं दिसून येताच अमेरिकेत एकच खळबळ उडाली. एकेकाळी सहलीसाठी सुप्रसिद्ध असलेली हाईती बेटं आता जवळजवळ निर्जन बनली असून दिवाळखोरीच्या मार्गावर आहेत. अशी किती पर्यटन केंद्रं एड्सच्या भीतीमुळं बंद पडतील हे सांगणे कठीण !

एड्सची बाधा केवळ मोठ्या माणसानाच होते हा ही एक गैरसमज आहे ज्यांचा लैंगिकतेशी काहीमात्र संबंध नाही, अशा लहान बालकांनाही व्याधी जडल्याचं आढळून आलं आहे. एड्सची बाधा झालेल्या माता वा पित्याचा निकटचा सहवास, हे या मागचं मुख्य कारण. यापेक्षाही वाईट गोष्ट म्हणजे गरोदर स्त्रीला जर एड्सची बाधा असेल तर तिला होणारं मूल एड्सची सोबत घेऊनच जन्मतं. मातेच्या दुधातूनही या व्याधीचा शिरकाव मुलात होऊ शकतो.

## व्यथा, व्याधी वा विकृती ?

एड्स झालेल्या व्यक्तीशी शरीरसंबंध आल्यानंतर ३ दिवसांपासून ३ वर्षापर्यंत केव्हाही हा रोग उद्भवू शकतो रोगाची सुरुवातीची लक्षणं म्हणजे अचानक ताप येऊ लागणं, अशक्तपणा वाढणं, उत्साह कमी होणं, निद्रानाशाचा विकार जडणं व भूक मंदावणं अशा तऱ्हेची असतात. अनेक तपासण्या करूनही रोगाचं निश्चित कारण कळू शकत नाही. कारण या व्याधीची वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण लक्षणं जशी नाहीत. तद्वतच त्यासाठी वेगळ्या तपासण्याही अजून सापडलेल्या नाहीत. पण अगदी अलिकडच्या काळात मायक्रोस्कोपमधून व्याधीग्रस्तांच्या रक्तातले एड्सचे व्हायरस पाहता येऊ लागले आहेत. त्यामुळं यावरील संशोधनाला जोरानं चालना मिळाली आहे.

एड्सनं पछाडलेल्या व्यक्तींपैकी ५०% व्यक्ती पहिल्या ५ वर्षात इतर कोणत्याही आजारामुळं हमखास मृत्युमुखी पडतात. बाकी ५० टक्क्यांपैकी ४०% व्यक्ती पुढील ५ वर्षात या ना त्या कारणानं मृत्यूच्या आधीन होतात. केवळ १०% व्यक्तीच साधारण १५ वर्षे जगण्याइतपत सुदैवी ठरतात; पण त्याचं जीवन सर्वार्थानं केविलवाणं अन् दयनीय होऊन गेलेलं असतं. जगण्यापेक्षा मृत्यू बरा, अशी त्याची स्थिती होते.

आफ्रिकेत हजार लोक हिवतापाच्या साथीमुळं मृत्युमुखी पडले, भारतात विषारी वायूच्या प्रादुर्भावामुळं २ हजार लोकांचा बळी गेला, इथोपियातल्या दुष्काळानं ५–७ हजार लोकाचा जीव घेतला, अशा बातम्या जगात जेवढ वादळ माजवतात, त्यापेक्षा कित्येक पटीनं अधिक वादळ, 'अमेरिकेत एड्समुळ १०० लोक प्राणास मुकले' ही बातमी माजवते. गरीबांची डोंगराएवढी दुःखं श्रीमंताच्या नखुरड्यापेक्षाही लहान असतात, हेच खरं.

अमेरिकन शासनान २ वर्षांपूर्वी कित्येक लक्ष रुपये एड्सच्या सशोधनासाठी मंजूर केले होते; पण एड्स्चा गाजावाजा जास्त होताच या कार्यासाठी लागणारी रक्कम कित्येक कोटींच्या घरात गेली आहे. एड्स विषयीच्या सशोधनासाठी धनिकांकडून मिळालेल्या खाजगी देणग्यांच्या सामर्थ्यावर अमेरिकन शास्त्रज्ञांनी एड्सला पराभूत करण्याचा निश्चय केला आहे. '१९८७ सालच्या अखेरीपर्यंत या व्याधीवर रामबाण उपाय आम्ही शोधून काढू शकू आणि १९९० पर्यंत या व्याधीवरचा प्रतिबंधक उपाय आमच्या हाती येईल.' असं अमेरिकन शास्त्रज्ञ छातीठोकपणे सांगू लागले आहेत.

काय गमत असते पहा! ज्या विकृत लैंगिक सबधातून एड्ससारख्या महाभयकर व्याधीचा जन्म झाला त्या लैंगिक विकृतीना प्रतिबंध करण्यापेक्षा अब्जावधी रुपये खर्चून या व्याधीवरचा उपाय शोधण्यात ही मंडळी गुतली आहेत. म्हणजे मुलाला खून दरोड्यासारखे गुन्हे करायला लावायचे अन मग त्याच्या गळ्याचा फास कसा चुकवता येईल यासाठी जीवाचा आटापिटा करायचा, यातलाच हा सारा प्रकार आहे.

—डॉ. श्रीकांत मुंदरगी

---

रंगभूमी

## मनोहर काटदरे लिखित 'माझ्या बिऱ्हाडी मीच वऱ्हाडी'

वि. भा. देशपांडे

'माझ्या बिऱ्हाडी मीच वऱ्हाडी' अशा आकर्षक शीर्षकाचे नाटक मनोहर काटदरे यांनी रूपांतरीत करून रगभूमीवर आणले आहे 'रन फॉर ए वाईफ' हे मूळचे इंग्रजी नाटक. नाटक परकीय कलाकृतीवर बेतले असावे, हे प्रयोग पाहताना काही वेळातच लक्षात येते, कारण त्यातली मूळ कल्पना त्या पद्धतीची आहे एका टॅक्सी ड्रायव्हरने दोन लग्ने केलेली आहेत. एकाच गावात दोन ठिकाणी त्याचे जाणे-येणे आहे. अशा धावपळीत जी धमाल होते, त्याचे चित्रण या नाटकात आहे. त्याच्या टॅक्सीला होणारा अपघात, पोलिसांची चौकशी आणि त्यामधून घडणारे मजेदार प्रसंग असे नाटकाचे स्वरूप आहे.

नाट्यकथानकाचे परकेपण एकदा मान्य केले म्हणजे पुढे नाटक पाहताना त्रास होत नाही. याचे कारण म्हणजे मनोहर काटदरे यांनी रूपांतर करताना जी संवादपद्धती वापरलेली आहे ती अतिशय सहज वाटणारी आहे. एक तर त्या सवादांना स्वत चे सत्त्व असणारे मराठीपण आहे आणि दुसरे म्हणजे नाटकाच्या हिशेबात जी गतिमानता अपेक्षित आहे, त्यातले चटपटीतपण अपेक्षित आहे, ते तिथे जाणवते. हे विशेष काटदऱ्यांच्या एकूणच नाट्यसंवाद-लेखनामध्ये आढळतात. 'घेतलं शिंगावर' किंवा 'आपलं बुवा असं आहे' ही दोन त्यांच्या नाटकाची महत्त्वाची उदाहरणे. काटदरे यांना उत्तम नाट्यसंवादशैली जशी अवगत आहे तसेच विनोदाच्या जाणकारीचे आणि तो अभिव्यक्त करण्याच्या कलेचेही अग आहे मराठी नाटककारात निखळ, अस्सल आणि सहजपणाने विनोदनिर्मिती करणारे जे थोडे नाटककार आहेत त्यामध्ये काटदरे हे एक आहेत याचा प्रत्यय याही नाटकात येतो. विशेषतः प्रसंगातून आलेला विनोद, काही स्वभावावर आधारलेला विनोद जाणकारीचा आहे. पण शाब्दिक कोट्या किंवा द्वर्थी विनोदात अडकून ते पडत नाहीत त्या प्रकारचा हव्यास त्यांना नाही. त्यामुळे त्यांच्या नाटकातील विनोद हा अभिरुचीपूर्ण माणसाने केलेल्या विनोदाच्या गुणवत्तेचा असतो. तसा प्रत्यय या नाटकात सतत येतो.

सहज विनोदनिर्मित नाटकाचा प्रयोग चागला होण्यासाठी तितकाच चागला कलाकारसघ लागतो. तसा तो या नाटकाला लाभला. अविनाश मसुरेकर, रमेश पवार, नयना आपटे, विलासराज, क्षमाराज, इर्शाद हश्मी आदी कलाकार या नाटकात आहेत. अर्थात केंद्रवर्ती भूमिकेमध्ये अविनाश मसुरेकर होता. हा एक गुणी कलावत आहे. पण त्याच्या गुणवत्तेच्या भूमिका-नाटके त्याला सतत मिळाली नाहीत असे ध्यानात येते. त्यानेच काटदरे यांच्या 'घेतलं शिंगावर' मध्ये केलेली भूमिका किंवा 'हॅण्डस् अप' मध्ये केलेली नायकाची भूमिका अनेकांच्या स्मरणात असेल. अविनाशला रगमंचावर नायकाचे अभिप्रेत असलेले व्यक्तिमत्त्व तर आहेच, पण वावरण्यातली सहजता, मुद्राभाव व्यक्त करण्याची ताकद मोठ्या प्रमाणात आहे. तो या नाटकात ज्या गतीने वावरला, विविध प्रसंगी त्याने जो मुद्राभिनय केला तो नाटकाच्या गुणवत्तेत भर टाकणारा होता. त्याने आपल्या वाट्याला आलेली भूमिका चोखपणाने केली.

त्याच्या व्यतिरिक्त लक्षात राहिला तो रमेश पवार, त्याला विनोदी, फार्सिकल नाटकाच्या लेखनाचा-अभिनयाचा बराच अनुभव आहे या गोष्टीचा प्रत्यय सतत येत होता. विनोदी नटाला शब्दफेकीच्या वेळेचा अचूक अंदाज असावा लागतो. तो त्याला असल्याने त्याच्या विनोदाचा योग्य परिणाम होतो क्षमाराज ही आता व्यावसायिक नाटकात एक आशादायक अशी अभिनेत्री होईल याची खात्री पटण्याइतकी आपली भूमिका तिने व्यवस्थित केली. तिचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आणि अभिनयाची जाण तिच्या भूमिकेची उंची वाढवण्यास कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी आहेत. तिने याआधी 'हसत हसत फसवुनी' मध्ये नायिकेला पूरक अशी भूमिका केली होती. त्यामध्ये तिचा प्रभाव कमी प्रमाणात पडला होता. पण 'बिऱ्हाडी' मध्ये ती लक्षात येण्याइतकी चागली आहे नयना आपटे ही सराईत कलाकार असल्याने तिच्याविषयी नव्याने लिहिण्याची गरज नाही, पण खटकले ते म्हणजे तिने या नाटकात आवाजाची उंच लावलेली पट्टी अनेकदा नाटकातला परिणाम उणावत होती. ती कमी करणे आवश्यक आहे

मॅम केरावाला हे मूळ इग्रजी नाटकाचे दिग्दर्शक आहेत त्यांनी या नाटकाचे बरेच प्रयोग केले आहेत. त्याचे दिग्दर्शन याही नाटकाला आहे, सहदिग्दर्शक म्हणून अविनाश मसुरेकर आहे दिग्दर्शनाचे एकच वैशिष्ट्य म्हणजे प्रयोग अतिशय गतिमान ठेवला आहे. त्यामुळे तो योग्य असा परिणाम साधतो. या प्रयोगाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नेपथ्य. दोन वेगळी घरे न दाखवता

काही वस्तूंच्या आधाराने रंगमंचाचे दोन भाग करून संपूर्ण रंगमंचाचा वापर केलेला आहे. हा प्रकार वापरायला आणि पाहायला मजेचा आहे. त्यातून साधलेली विनोद-निर्मितीही उत्तम आहे. तेव्हा अशा या ' बिन्हाडी ' आपणही एकदा जाऊन यायला हवे.

## □ दोन एकपात्री कार्यक्रम

यशवंत दत्तने मराठी नाट्यपरिषदेच्या वाढदिवसानिमित्ताने एक कार्यक्रम पेश केला. दीर्घकाळ स्मरणात राहावा असा हा कार्यक्रम होता. यामध्ये काही स्वगते, कविता, किस्से, शायरी, नकला आणि एकपात्रीची एक झलक असे बहुविध स्वरूप होते. हा संपूर्ण कार्यक्रम पाहात–ऐकत असताना यशवंतच्या बहुगुणांची खात्री पटत होती. या विविध प्रकारच्या गोष्टींसाठी मूळ आवाजाची देणगी असावी लागते,ती त्याच्याकडे उदंड प्रमाणात आहे. त्याच्या आवाजाला फिरत आहे, वजन आहे. तो आवाजाचे अनेक खेळ करू शकतो हे त्याने सिद्ध केलेले आहे.

' तरंग आणि अंतरंग ' या नावाचा एकपात्री कार्यक्रम करण्याचा त्याचा विचार आहे. त्यामध्ये गोविंद बल्लाळ देवलांपासून कानेटकरांपर्यंत ज्या नाटककारांवर शेक्सपिअरच्या शब्दांचा प्रभाव आहे अशांच्या नाट्यकृतीतील तीव्र स्वगतांचा हा कार्यक्रम असेल. त्याला वसंत कानेटकर निवेदन लिहून देणार आहेत. कदाचित हा कार्यक्रम द्विपात्रीही होईल. तो अशा अर्थाने की, भक्ती बर्वे यामध्ये सहभागी होईल. आत्ताच्या कार्यक्रमात ती नव्हती. पण पुढे असण्याची शक्यता आहे. तसे या कार्यक्रमाच्या वेळी जाहीरही झाले. या कार्यक्रमात यशवंतने आणखी एका एकपात्री कार्यक्रमाची झलक दाखविली ती म्हणजे ' पोलीसतपास ' या नावाची ! हा कार्यक्रम पाहून असे वाटले की, स्वगते आणि ' पोलीसतपास ' हे दोन्हीही जनमान्य होतील.

□

औरंगाबादच्या जयश्री गोडसे यांनी पुण्यातल्या महाराष्ट्र नाट्य संघ यांच्यासाठी एकपात्री कार्यक्रम पेश केला. गोडसेबाई औरंगाबादमधल्या महत्त्वाच्या कलाकार आहेत. त्यांनी हौशी किंवा स्पर्धेच्या स्तरांवर अनेक नाटकांतून महत्त्वाच्या भूमिका केल्या आहेत. पुण्यातल्या कार्यक्रमात त्यांनी सलगपणाने एखादा विषय न घेता निरनिराळ्या नाटकातल्या भूमिकांचा अंशत: भाग अभिनित केला. तो पाहात असताना असे वाटले की, या बाईची अभिनयाची ताकद अधिक चांगली आहे. त्यांनी असे तुकडे–तुकडे पेश करण्यापेक्षा सलग एखादा मोठा एकपात्री कार्यक्रम द्यावा. त्यांना रंगमंचासाठी आवश्यक असणारे प्रसन्न व्यक्तिमत्त्व आहे. शब्दांवर चांगली हुकमत आहे. मुद्राभिनयाची उत्तम जाण आहे. त्यांनी जर तास–दीडतासाचा एकपात्री ( बहुपात्री ) कार्यक्रम केला तर त्याचे स्वागतच होईल. निदान या कार्यक्रमाने त्या पुणेकरांना परिचित झाल्या.

□

---

चित्रपट

---

# करमदाता

## श्रीमंत–गरीब संघर्षाला वेगळी पार्श्वभूमी

---

शशिलाल नायर या तरुण दिग्दर्शकाचं नाव सध्या हिंदी चित्रपटसृष्टीत बरंच गाजतंय. फिल्म इंडस्ट्रीत एकेका नावाची क्रेझ असते. तसे सध्या शशिलाल नायरला बरे दिवस आलेले दिसताहेत. त्याचे एकामागून एक धडाधड चित्रपट सेटवर जाताहेत.

वास्तविक त्याचा पहिला 'बहू माँगे इन्साफ' हा चित्रपट चांगलाच आपटला होता. विषय चांगला असला तरी दिग्दर्शकानं तो काहीसा भडक पद्धतीनं घेतला होता. पण असं असलं तरीही तो एक 'प्रॉमिसिंग ' दिग्दर्शक म्हणून गणला गेला. आणि आता निर्माते त्याच्यामागं धावताहेत. शशिलाल नायर प्रॉमिसिंग असला तरी हिंदी चित्रपट सृष्टीत यश न मिळताही इतके चित्रपट मिळवणारा तो पहिलाच असावा.

' करमदाता ' या नायरच्या ताज्या चित्रपटात त्यानं आपली दिशा बदललेली दिसते. ' बहू माँगे...' या पहिल्याच चित्रपटात त्यानं हुंडाबळीसारखा विषय निवडला होता. आणि कलाकारही नासिरूद्दीन शहा, ओमपुरी असे कलात्मक चित्रपटातले निवडले होते. तो प्रयोग फसला म्हटल्यावर यावेळेस त्यानं दुसरा मार्ग निवडलाय. पूर्णपणे व्यावसायिक दृष्टिकोन स्वीकारून तशीच कथा आणि तसेच कलाकारही त्यानं निवडलेत.

' करमदाता ' ची कथा ही नेहमीच्याच श्रीमंत–गरीब संघर्षावर आधारित आहे. फक्त त्या संघर्षाला वेगळी पार्श्वभूमी आहे. सेठ रायसाहेब (शम्मीकपूर) ह्या श्रीमंत उद्योगपतीची नीता (स्वरूप संपत) ही एकुलती एक मुलगी. वडिलांचा विरोध पत्करून



ती अजित (शक्तीकपूर) या तरुणाशी लग्न करते. रायसाहेब तिच्याशी असलेले संबंध तोडून टाकतात. लग्नानंतर थोड्याच काळात अजित हा अतिशय वाईट स्वभावाचा असून केवळ पैशासाठी त्यानं आपल्याशी लग्न केल्याच तिला कळून चुकतं. हे सहन न झाल्यानं आपल्या मुलीला–पिंकीला आपल्या वडिलांकडे पोचवून ती आत्महत्या करते.

रायसाहेब पिंकीला (अमृतासिंग) अतिशय लाडानं वाढवतात. तिला त्यांच्याकडे राहू देण्याची किंमत म्हणून अजित त्यांच्याकडून सतत पैसे वसूल करत असतो. आपल्या मुलीला आलेल्या अनुभवामुळे रायसाहेबांचे मत अशा तरुणाबद्दल अतिशय वाईट बनलेले असते. पिंकीला तर ते अजितच्या दृष्टीलाही पडू देत नसतात.

एकदा घरात झालेल्या छोट्याशा भांडणामुळे पिंकी घर सोडून बाहेर पडते. ती अडचणीत असताना तिला गोविंदा (मिथुन चक्रवर्ती) हा टॅक्सी ड्रायव्हर वाचवतो. ती त्याच्या घरी येते आणि तिथच रहाते.

दरम्यान तिला शोधून आणण्यासाठी रायसाहेब आणि अजित दोघांनीही आपली माणसं पाठवलेली असतात. रायसाहेब तिला हुडकून घरी घेऊन येतात. पण पिंकी गोविंदाच्या प्रेमात पडली आहे हे कळताच संतापतात. गोविंदाही केवळ पैशासाठी हे नाटक करतो आहे अशी त्यांची समजूत होते.

अजित पिंकीला भेटून तिच्या मनात आपल्याबद्दल सहानुभूती निर्माण करून तिला घेऊन जातो. तिच्या बदल्यात रायसाहेबांकडून भरमसाट पैसे मिळविण्याचा त्याचा डाव गोविंदामुळे यशस्वी होत नाही. आणि शेवटी रायसाहेबांचाही गोविंदाबद्दलचा गैरसमज दूर होतो.


'करमदाता' शेवटी नेहमीच्याच ॲक्शन चित्रपटांच्या मार्गाने जातो. मात्र त्यातला श्रीमंत–गरीब संघर्ष एवढ्यासाठी वेगळा मानायचा की तो केवळ श्रीमंतीच्या अहंभावातून निर्माण झालेला नाही. त्याला वेगळी अशी पार्श्वभूमी आहे. शिवाय इथ खलनायक उगाचच नायक नायिकेमध्ये लुडबूड करणारा नाही तर नायिकेचे वडीलच आहेत. शशिलाल नायरनं चित्रपटाचा वेग छान ठेवला आहे, इथ घटनांची फारशी गर्दी नाहीये. त्यामुळे मध्यंतरापर्यंत दिग्दर्शकानं हवा तसा चित्रपट लांबवायचा आणि नंतर भराभर गुंडाळून टाकायचा हा प्रकार इथ झालेला नाही. घटना मोजक्याच आहेत आणि त्या कुठं संपवायच्या याच भान दिग्दर्शकाला आहे. त्यामुळ चित्रपटाला बरचसं आखीव स्वरूप आलय.

चित्रपटाचं छायाचित्रण, संकलन वगैरे तांत्रिक बाजू व्यवस्थित आहेत. मोठी उणीव राहून गेलीय ती म्हणजे संगीताची. अन्नू मलिकनं दिलेल्या संगीताचं 'भिकार' या एकाच शब्दात वर्णन करता येण्यासारखं आहे. या गृहस्थानं 'सोहनी–महिवाल' सारख्या चित्रपटात कधीकाळी बरं संगीत दिलं होतं हे आता आठवावं लागावं अशी त्याची परिस्थिती आहे. यातली मिथुन–अमृतावर चित्रीत झालेली दोन गाणी तर अगदी अनावश्यक आहेत. प्रेक्षकांना पाय मोकळे करण्यासाठी वेळ देण्याऐवजी ती गाणी काढून टाकली असती तर अधिक बरं झालं असत.

मिथुन चक्रवर्तीची भूमिका वरवर पहाता नेहमीचीच आहे. पण दिग्दर्शकानं त्याला थोडा वेगळा 'टच्' दिल्यासारखा वाटतो. विशेषत. त्याची एंट्री, आणि पहिल्या दृश्यात हे जास्त जाणवतं. गरीब पण स्वाभिमानी गोविंदा मिथुननं नेहमीच्याच सफाईनं रंगवलाय. तीच गोष्ट अमृताची. हट्टी, लाडावलेल्या भूमिका तिच्या वाट्याला सतत येत असल्या तरी ती अजूनही त्यात 'फ्रेश' वाटते हेच तिचं खरं यश. रायसाहेबांच्या भूमिकेत शम्मीकपूरनं छान काम केलं आहे. विशेषत: आपल्या चेहऱ्याचा त्यानं चांगला वापर केलाय. इतर भूमिकात दीना पाठक, शक्ती कपूर, ओमप्रकाश, स्वरूप संपत वगैरे आहेत.

'करमदाता' शशिलाल नायरबद्दलच्या अपेक्षा पूर्ण करणारा नसला तरी त्या वाढवणारा चित्रपट आहे एवढं निश्चित.

—सीमा कुलकर्णी



विज्ञान

## सर्पगंधेने धडा शिकवला

आज औषधांच्या जगात 'हर्बल' हा परवलीचा शब्द बनला आहे. ॲलोपथिक औषधांच्या वाढत्या दुष्परिणामामुळे नवे पर्याय शोधणाऱ्या वैद्यकशास्त्रज्ञांना हर्बलच्या रूपाने निसर्गाचे सारे भांडारच खुले झाले आहे. 'देता किती घेशील दो करांनी', अशी आज आपली अवस्था झाली आहे. प्रत्येक ॲलोपथिक औषधाला काष्ठौषधीचा अधिक परिणामकारक आणि सुरक्षित पर्याय मिळू लागला आहे या क्रांतीची सुरुवात 'सर्पगंधा' या छोट्याशा वनस्पतीने केली आहे हे विसरून चालणार नाही. इ. स. १९५३ मध्ये अमेरिकेतील 'स्क्वीब अँड सन्स' या कंपनीने राउडिक्सिन (Raudixin) हे नवे औषध बाजारात आणले. पुढे एका वर्षातच दोन डझन औषध कंपन्यांनी याच प्रकारचे औषध मोठ्या प्रमाणावर बाजारात आणले. इ. स. १९६० पर्यंत या औषधाचा खप सुमारे तीन कोटी डॉलर्स एवढ्या प्रचंड प्रमाणात वाढला. सल्फाड्रग्जच्या साईड इफेक्टस्च्या पार्श्वभूमीवर राउडिक्सिनने मोठीच क्रांती घडवून आणली. सुमारे दीड हजारपेक्षा जास्त संशोधनपर लेख या एकाच औषधीच्या संदर्भात प्रसिद्ध झाले.

अशा या दिव्य औषधीने जग जिंकले तरीही भारतीय वैद्यकशास्त्राने त्याची दखल घेतली नव्हती. आयुर्वेदाचार्य, ॲलोपथिक डॉक्टर्स आणि अन्य उपचार पद्धतीचा वापर करणारे वैद्य यांना राउडिक्सिनच्या झपाट्याची कल्पनाच आली नाही. असे हे राउडिक्सिन म्हणजे काय होते? तो केवळ राऊल्फिया सर्पेंटिना (Roulfia Serpentina) या वनस्पतीचा अर्क होता. सर्पगंधा या नावाने भारतीयांना आणि आपल्या पूर्वजांना हजारो वर्षे ज्ञात असलेली ही काष्ठौषधी होती. मूलतः भारतीय असलेल्या या छोट्याशा रोपट्याने जगात केवढी क्रांती घडवून आणली व दरवर्षी कोट्यवधी रोगी त्यापासून तयार केलेल्या औषधाचे सेवन

करून व्याधीमुक्त होऊन आराम व स्वास्थ्य मिळवू लागले हे कळले तेव्हा भारतीय वैद्यक क्षेत्रातच नव्हे तर जगभर खळबळ निर्माण झाली. पण भारतीयांच्या दृष्टीने हा काही नवा शोध नव्हता. ख्रिस्तपूर्व १००० वर्षे, चरक संहितेत सर्पगंधेचा पहिला उल्लेख आढळतो. सर्पदंश व वृश्चिक दंशावर वेदनाशामक म्हणून प्रभावी उपाय असा आयुर्वेदात उल्लेख आहे. सुश्रुत संहितेमध्ये 'अपराजिता' म्हणून निद्रानाश, मानसिक विकार आणि पचन संस्थेच्या अनियमिततेवर गुणकारी औषध म्हणून सर्पगंधेचा वापर सुचविला आहे.

सर्पगंधा ही देशी, सदाहरित, बारमाही वनस्पती आहे. हडकी, सर्पाक्षी, छोटा चाद, नाई, चद्रिका, मुंगुसवेल अशा अनेक नावांनी भारताच्या वेगवेगळ्या भागामध्ये ही वनस्पती ओळखली जाते. हिमालयाच्या पायथ्याशी, द. भारतीय डोंगराळ प्रदेशात, बिहारमधील छोटा नागपूर विभागात आणि कोकणात सर्पगंधा वाढते. इतर मोठ्या झाडांच्या सावलीत त्याची वाढ अधिक जोमाने होते. खाड जास्तीत जास्त एक मीटर ऊंचीचे व ग्रंथीमय असते, शाखा विस्तार अनियमित स्वरुपाचा असतो. पाने लांबट आकाराची हिरवी, खालच्या बाजूने थोडीशी फिक्कट रंगाची असतात. खोडावर पानांची रचना मंडलित (एकाच जागी सर्व बाजूनी दोन पेक्षा जास्त पाने) असते. मूळ पिवळसर लांबट व फुगीर असते. सर्पगंधेचे फूल पांढऱ्या किंवा तांबड्या रंगाचे असते. पांढऱ्या फुलाच्या पाकळ्या पांढऱ्या असल्या तरी पुष्पकोश मात्र तांबूस असतो. फळ काळ्या रंगाचे, द्वीभवत, चमकदार व अश्मगर्भी असते.

सुरुवातीला सर्पगंधेपासून तयार केलेल्या औषधाचे 'राऊव्हिल्झिन' असे जे नाव दिले आहे, ते या वनस्पतीच्या 'राऊल्फिया सर्पेन्टिना' या नावावरून देण्यात आले आहे. या नावाचा इतिहास मोठ्या गमतीचा आहे.

प्रसिद्ध फ्रेंच वनस्पतीशास्त्रज्ञ प्लूमीर याने या भारतीय वनस्पतीचे नामकरण करताना आपल्या एका मित्राला अजरामर केले आहे. डॉ. लिओनार्ड राऊल्फ हे त्या मित्राचे नाव, त्याचे नाव प्लूमीरने सर्पगंधेला कायमचे चिकटवून टाकले. सगळ्यात मजेची गोष्ट म्हणजे डॉ. राऊल्फने आपल्या हयातीत सर्पगंधा पाहिली नव्हती. जॉर्ज रंफने इ. स. १७५५ मध्ये या वनस्पतीचा 'स्नेकरूट' म्हणून उल्लेख केला होता. सापाचे विष बाधू नये म्हणून मुंगूस या वनस्पतीच्या मुळ्या खाते असाही शोध त्याने नोंदून ठेवला आहे. शिवाय उत्तर भारतात वेडेपणावर केल्या जाणाऱ्या उपचारात या औषधीला प्राधान्य दिले जाते अशीही त्याची नोंद आहे.

निसर्गातील जिवाणू आपल्या जीवन चक्रामध्ये इतर कोणत्याही प्रयोगशाळेपेक्षा जास्त कार्बनी द्रव्ये तयार करू शकतात हे माहिती नसल्यामुळे युरोपीय वैज्ञानिक इ. स. १९४७ पर्यंत देशी औषधे वापरण्याच्या विरुद्धच होते. वनस्पतींच्या औषधी गुण-




सर्पगंधेची फांदी

धर्मांचा उपयोग करून घेण्यासाठी व त्यावर संशोधन करण्यासाठी कलकत्ता येथे इ. स. १९२१ मध्ये पहिली प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली होती. पुढे इ. स. १९२६ पासून या प्रयोगशाळेस भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचे अनुदान सुरू झाले. सर्पगंधेमध्ये आजवर निरनिराळी ४० अल्कोलॉइड्स् असल्याचे सिद्ध झाले आहे. राऊल्फीन, अल्स्टेरॉल, सर्पेस्टेरॉल, रेसर्पीन, अजमॅलिन, अजमॅटिनीन, अजमॅलिसिन ही त्यातली काही महत्त्वाची आहेत. सर्व अल्कोलॉइडस्चे प्रमाण ०.८% ते १.३% पर्यंत आढळले आहे. सलिम व राफत हुसेन या दिल्लीच्या दोन केमिस्टस्नी इ. स. १९३१ मध्ये सर्पगंधेपासून नवी अल्कोलॉइड्स् मिळवली. त्यातल्या काहींना त्यांनी ज्या कॉलेजमध्ये संशोधन केले त्या कॉलेजच्या संस्थापकाचे म्हणजे अजमलखान यांचे नाव दिले. त्यावरूनच अजमॅलिन, अजमॅटिनीन व अजमॅलिसिन ही मालिका ओळखली जाते. बोस आणि सेन या कलकत्त्याच्या दोघा संशोधकांनी या अल्कोलॉइडस्चा सिडेटिव्ह व रक्तदाब कमी करणारे औषध म्हणून यशस्वी उपयोग करता येतो हे सिद्ध केले. आपले संशोधन त्यांनी इंडियन मेडिकल जर्नलमध्ये प्रसिद्ध केले. आपल्या देशात अशा विविध विषयांच्या जर्नल्समध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखांची दखल किती प्रमाणात घेतली जाते हा मुद्दा एक संशोधनाचा विषय होईल. चोप्राने सर्वप्रथम रक्तदाब कमी करण्यासाठी सर्पगंधेचा वापर करून औषध निर्मिती केली. इ. स. १९४० मध्ये लाखो भारतीयांनी रक्तदाबावर गुणकारी म्हणून हे औषध वापरण्यास सुरुवात केली. इंडियन सायन्स जर्नलमध्ये या संबंधी अनेक लेख लिहिले गेले. पण याच सुमारास पाश्चात्यांनी सल्फा औषधे व बारबिटयुरेटस यांचा एवढा उदो उदो केला की त्या पुढे भारतातल्या या छोट्याशा रोपट्याकडे सगळ्यांचे दुर्लक्ष झाले आणि त्याचा औषधी म्हणून केला जाणारा वापर इतिहास जमा होतो की काय असा प्रश्न निर्माण झाला.

इ. स. १९४९ मध्ये डॉ. रुस्तुम जाल वकील यानी सर्पगंधेच्या औषधी गुणधर्मावर एक लेख तयार केला आणि तो इंडियन मेडिकल जर्नल ऐवजी ब्रिटिश हार्ट जर्नल मध्ये प्रसिद्ध केला. हाच तो लेख ज्यामुळे सर्पगंधेची ख्याती एका रात्रीत त्रिखंडात पसरली. डॉ. रॉबर्ट विल्कीन्सने डॉ. वकील यांचा लेख वाचून भारतातून स्क्वीब कंपनी मार्फत औषध मागवून घेतले व ५० रुग्णांवर त्याचा परिणाम तपासला. सर्पगंधेच्या औषधी गुणधर्मांचा चमत्कार पाहून ते प्रभावित झाले. इ. स. १९५२ मध्ये त्यांनी न्यू इंग्लंड कार्डिओव्हॅस्क्यूलर सोसायटीला त्या विषयीच्या आपल्या निरिक्षणांचा अहवाल सादर केला. हाच अहवाल पुढे न्यू इंग्लंड जर्नल ऑफ मेडिसिन्स मध्ये प्रसिद्ध झाला आणि रक्तदाबावर परिणामकारक औषध म्हणून सर्पगंधेला जगभर मान्यता मिळालीच; परंतु त्याचबरोबर या वनस्पतीचा इतर अनेक रोगांवरील प्रभावी

उपचार म्हणून उपयोग स्पष्ट झाला. विशेषत. या औषधाच्या अंगी रोग्याला शांत करण्याचा विलक्षण गुणधर्म आढळला. नियंत्रणाबाहेर गेलेल्या, अस्वस्थ झालेल्या मनोरुग्णाला क्षणात नियंत्रणाखाली आणणे या औषधामुळे शक्य होऊ लागले वेड्याच्या इस्पितळात काम करणाऱ्या डॉक्टर्सना तर हे औषध म्हणजे वरदानच ठरले. निद्रानाश, रक्तदाब, भ्रमिष्ट अवस्था इ. विकार आटोक्यात आणणे सहजशक्य झाले. सर्पगंधेचा परिणाम वर्णन करण्यासाठी वेड्याला स्वास्थ्य प्राप्त करून देणारा अशा अर्थी 'Tranquilliser' हा शब्द प्रथमच वापरण्यात आला त्याचबरोबर या औषधाच्या परिणामाने फ्रॉइडियन सिद्धांताला धक्का दिला मानसिक वर्तनातील अनियमितता ही मेंदूमधील जीव–रासायनिक द्रव्याच्या घटनेतील बदलामुळे निर्माण होते व जीव–रासायनिक बदलावर योग्य ती औषधयोजना केल्यास मनोरुग्ण बरा होतो हे सिद्ध होऊन लक्षावधी रुग्णाना दिलासा मिळाला.

इ. स. १९५२ पर्यंत 'रिसर्पाइन' औषध लोकप्रिय झाले. इ. स १९५३ मध्ये सीबा कंपनीने 'सर्पासिल' ची निर्मिती मोठ्या प्रमाणावर करायला सुरुवात केली. त्यासाठी देशातील सर्पगंधेच्या रोपट्यावर संक्रांत आली. असंख्य झाडे ओरबाडली गेली, अगदी मुळासकट सर्पगंधेशी साम्य असणारी झुडपेसुद्धा तोडली गेली आणि मोठ्या प्रमाणावर निर्यात सुरू झाली. देशातून या वनस्पतीचे समूळ उच्चाटन होते काय अशी भीती



सर्पगंधेची मुळं

निर्माण झाली. त्यामुळे शासनाने या वनस्पतीच्या निर्यातीवर बंदी घातली. अमेरिकन औषध-कंपन्यांच्या औषध निर्मितीला धोका निर्माण झाला. या कंपन्यांचे अधिकारी बंदी उठविण्यासाठी प्रयत्न करू लागले. पुढे सर्पगंधेची लागवड करून भरपाई करण्याच्या मुद्यावर ही बंदी उठविण्यात आली. परंतु दरम्यानच्या काळात भारतीय सर्पगंधेला ( राऊल्फिया सर्पेंटिना ) पर्याय शोधण्याचे प्रयत्न चालूच होते. आफ्रिकेतील राऊल्फिया वोमिटारिया या जातीचा पर्याय उपलब्ध झाला. सर्पगंधेच्या जगभर सुमारे शंभर जाती आहेत. त्यातल्या कित्येकाची त्यावरील मर्यादित संशोधनामुळे फारच थोडी माहिती उपलब्ध आहे.

सध्या रिसर्पाइनला असलेले महत्त्व हळूहळू कमी होत चालले आहे आणि ते बरोबरच आहे संशोधन व विकास यामधील प्रगतीबरोबर अधिकाधिक गुणकारी व कमीत कमी साइडइफेक्टस् असलेली औषधे निर्माण केली जातात त्याचबरोबर काळाच्या ओघात जुनी औषधे मागे पडतात. सर्पगंधेपासून केल्या जाणाऱ्या औषधानासुद्धा पर्याय निघताहेत. आणखीसुद्धा अनेक पर्याय निर्माण होतील, पण त्यासाठी निसर्गाच्या अनमोल खजिन्यातील काष्ठौषधींना प्रथम पसंती दिली पाहिजे. वनस्पती जीवनाच्या औषधी गुणधर्मांची परीक्षा घेऊन असे पर्याय निवडले पाहिजेत, हा धडा सर्पगंधेने दिला आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि जागतिक आरोग्य संघटना यांनी संयुक्तपणे कोटयावधी रुपये खर्च करून वनस्पतींच्या औषधी गुणधर्मांवर संशोधन केले. लखनौची सेंट्रल ड्रग रिसर्च इन्स्टिटयूट व जम्मू येथील ड्रग रिसर्च लॅबोरेटरी, हेच काम करीत आहेत हा सर्व त्या लहानशा झुडपाच्या 'सर्पगंधे' च्या आश्चर्यकारक औषधी गुणधर्मांचा परिणाम आहे. नॉर्मन टेलरने, 'A faint whisper from the earth of India that roared through the medical world' असा केलेला उल्लेख किती अचूक आहे !

—डॉ सुभाषचंद्र सारंग


**राजहंस प्रकाशन**

# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईचं सुख ? तिला दुःख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे.
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

# संधी का संघर्ष ?

" देशातील मुस्लिमांना एक मोठी संधी प्राप्त झालेली आहे.
श्रीराम हे कोटयावधी हिंदूचं आराध्य दैवत आहे.
Muslims should graciously give up the Janmabhumi.
परस्पर विश्वासाचं एक नवं वातावरण तयार करायची ही
ऐतिहासिक संधी मुस्लिम समाजानं दवडू नये. "
–असं म्हणताहेत अलिगड विद्यापीठातले एक मुस्लिम प्राध्यापक
तर...
" मुस्लिम महिला विधेयकाची लढाई आपण जिंकली. आता पुढची
लढाई बाबरी मस्जिद " असं भडकवणारं वाक्य आहे
दिल्लीच्या एका उर्दू नियतकालिकात.

विधेयक तर संमत झाले. यानंतर दिल्ली-लखनौ-अलिगड भागातील
वातावरण आता कसे आहे ?
तेथील विचारवंतांच्या प्रतिक्रिया कोणत्या ?
राम जन्मभूमी आंदोलन हा केवळ हिंदू पुनरुत्थानवाद आहे की,
विधायक राष्ट्र उभारणीची एक नवी प्रेरणाही
या आंदोलनाद्वारे गतिमान होत आहे ?
प्रत्यक्ष दौरा करून घेतलेला शोध–

**अलिगड आणि अयोध्या**

# माणूस नवजागर विशेषांकात

या विशेषांकासंबंधीचा आणखी काही तपशील पुढील अंकी...